# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ शुक्रवार २२ मे २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०







## मै भी कॉकरोच म्हणत ग्रा.पं.सदस्याचे जि.प. मध्ये भीक मांगो आंदोलन




**गोंदिया /वृत्तसंस्था- :** सध्या सोशल माध्यमांवर मै भी कॉकरोचचे फॅड जोरदार सुरु आहे. याचे लोन आता गोंदिया जिल्ह्यातही पोहचले आहे. याचाच प्रत्यय गुरुवारी (दि.२१) येथील जिल्हा परिषद कार्यालयात आला. मनरेगा रोजंदारी कामाचे पैसे दोन वर्षांपासून थकल्याने एका ग्रा.पं. सदस्याने चक्क मैं भी कॉकरोचे बॅनर लावून थेट जिल्हा परिषद कार्यालय जावून भीक मागितले.या प्रकाराने जिल्हा परिषद कार्यालयात वेळ गोंधळ उडाला होता.

सुनील गिरडकर असे त्या आंदोलन करणाऱ्या ग्रामपंचायत सदस्याचे नाव आहे. गिरडकर हे आमगाव तालुक्यातील पिपरटोला ग्रा.पं.चे सदस्य आहेत. त्यांच्या गावात मनरेगा अंतर्गत दोन वर्षांपुर्वी काम करण्यात आले. या कामावर अनेक मजुरांनी काम केले. पण मागील दोन वर्षांपासून मजुरीचे पैसे थकले आहेत. थकीत पैसे मिळावे यासाठी वांरवार पंचायत समिती, जिल्हा परिषद कार्यालय व संबंधित विभागाकडे पाठपुरावा केला. पण यानंतरही मजुरीचे थकीत पैसे न मिळाल्याने संतापून ग्रा.पं.सदस्य सुनील गिरडकर यांनी गुरुवारी ☞(पान २

# पेट्रोल-डिझेल, एलपीजी आणखी महागणार?

### गीता गोपीनाथ यांचा मोठा इशारा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** पश्चिम आशियातील युद्ध आणि वाढता भू-राजकीय तणाव, याचा जगाच्या अर्थव्यवस्थेला मोठा हादरा बसला आहे. यामुळे याचा परिणाम भारतावरही होणे स्वाभाविकच आहे. यासंदर्भात आता आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या पहिल्या डेप्युटी मॅनेजिंग डायरेक्टर तथा प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ गीता गोपीनाथ यांनीही भाष्य केले आहे. त्यांनी भारतासाठी एक मोठा इशारा दिला आहे. 'जर हा संघर्ष जूनपर्यंत असाच सुरू राहिला, तर कच्च्या तेलाच्या किमती १४० डॉलर प्रति बॅरलपर्यंत पोहोचू शकतात आणि असे झाल्यास भारतातील पेट्रोल-डिझेलचे दर, महागाई वेगाने वाढू शकते,' असे गोपीनाथ यांनी म्हटले आहे.



खरे तर, भारत आपली ऊर्जा गरज पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मध्य-पूर्वेवर अवलंबून आहे. मध्यपूर्वेतून भारताला होणारा पुरवठा होर्मुझच्या समुद्रधुनीमार्गे होतो. मात्र, अमेरिका-इराण युद्धामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीत प्रचंड तणावाचे वातावरण आहे. परिणामी पुरवठ्यात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. याचा थेट परिणाम भारतावर होत आहे.

**कच्च्या तेलाचा भाव ११० डॉलरवरून १४० डॉलरवर जाऊ शकतो -**

यासंदर्भात गीता गोपीनाथ म्हणाल्या, 'हे केवळ महागड्या तेलापुरतेच मर्यादित नाही तर, 'सप्लाय शॉक'ची परिस्थिती निर्माण होत आहे. अर्थात, तेल, एलपीजी, एलएनजी आणि खतांच्या उपलब्धतेवरही मोठा परिणाम होऊ शकतो. ही सप्लाय चेन खंडित झाल्यास, ती पूर्ववत होण्यासाठी किमान २ ते ३ महिन्यांचा कालावधी लागू शकतो. सध्य स्थितीचा विचार करता, कच्च्या तेलाचा भाव ११० डॉलरवरून १४० डॉलर प्रति बॅरलपर्यंत जाऊ शकतो. यामुळे भारतातील वाहतूक, उत्पादन आणि शेतीचा खर्चही वाढू शकतो. परिणामी याचा थेट फटका सर्वसामान्यांच्या खिशाला बसू शकतो. अशा परिस्थितीत सरकार जनतेला पूर्णपणे दिलासा देऊ शकणार ☞(पान २ वर)

# धोनीची सीएसकेला सोडचिठ्ठी?

### जडेजा-सॅमसनच्या मुद्द्यावरून चेन्नईच्या गोटात ठिणगी; १८ वर्षांचे नाते...



**मुंबई/प्रतिनिधी :** चेन्नई सुपर किंग्स (CSK) आणि त्यांचे लाडके 'थाला' म्हणजेच महेंद्रसिंह धोनी यांच्यातील अतूट नाते आता संपुष्टात येणार की काय, अशी भीती निर्माण झाली आहे. आयपीएल २०२६ च्या पार्श्वभूमीवर एमएस धोनी आणि चेन्नई सुपर किंग्सच्या व्यवस्थापनात सर्व काही आलबेल नसल्याचे वृत्त समोर आले असून, या दोन्ही पक्षांमध्ये मतभेद झाल्याच्या चर्चांनी क्रिकेट जगतात मोठी खळबळ उडवून दिली आहे.

सोशल मीडिया आणि विविध प्रसारमाध्यमांमध्ये फिरत असलेल्या वृत्तानुसार, अनुभवी कर्णधार एमएस धोनी आयपीएल २०२६ च्या हंगामानंतर चेन्नई फ्रँचायझीसोबतचा आपला ऐतिहासिक प्रवास संपवू शकतो. दरम्यान, धोनी किंवा सीएसके व्यवस्थापनाकडून याबाबत कोणतीही अधिकृत पुष्टी करण्यात आलेली नाही.

सन २००८ मध्ये आयपीएलची सुरुवात झाल्यापासून धोनी आणि चेन्नई सुपर किंग्स हे समीकरण चाहत्यांसाठी एक भावना बनले आहे. त्यामुळे या दोघांमध्ये दुरावा येण्याची नुसती शक्यताही सीएसकेच्या चाहत्यांसाठी अत्यंत धक्कादायक आणि अकल्पनीय असल्याचे बोलले जात आहे.

गेल्या जवळपास दोन दशकांत धोनी आणि सीएसके यांनी मिळून अनेक आयपीएल विजेतेपदे पटकावली आणि एक अनोखी फॅन संस्कृती निर्माण केली. मात्र, सध्याच्या घडोमोडींवर विश्वास ठेवला, तर आयपीएल २०२६ हा 'थाला' आणि सीएसके व्यवस्थापनातील नाट्यमय ☞(पान २ वर)

# तामिळनाडूमध्ये शपथविधीवेळी काँग्रेस आमदाराने घेतले राहूल गांधींचे नाव!

### आमदार राजेश कुमार यांच्या कृतीवर राज्यपालांनी घेतला आक्षेप

**चेन्नई/वृत्तसंस्था-** तामिळनाडूमध्ये काँग्रेससाठी आजचा दिवस ऐतिहासिक ठरला. तब्बल ५९ वर्षांनंतर काँग्रेस पक्षाच्या एका नेत्याने राज्य सरकारमध्ये मंत्री म्हणून शपथ घेतली. १९६७ नंतर काँग्रेस पहिल्यांदाच तामिळनाडू सरकारच्या मंत्रिमंडळात सामील झाली आहे. मात्र, हा ऐतिहासिक क्षण एका वादाशिवाय पूर्ण होऊ शकला नाही. काँग्रेस आमदार एस. राजेश कुमार मंत्रिपदाची शपथ घेत असताना, त्यांनी



किलियूर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे आणि काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते असणारे राजेश कुमार हे, 'विजय' यांच्या नेतृत्वाखालील 'टीव्हीके' सरकार मध्ये मंत्री म्हणून शपथ घेतली. अधिकृत कागदपत्रावरून शपथेचा मजकूर वाचत असताना, शपथ पूर्ण होताच राजेश कुमार यांनी अचानक काँग्रेस नेते के. कामराज, राजीव गांधी आणि राहुल गांधी यांच्या नावाने घोषणाबाजी सुरू केली. काँग्रेस नेत्यांच्या ☞(पान २ वर)

# टोळक्याने गोळया घालून केली दोन भावांची हत्या


**उल्हासनगर/वृत्तसंस्था- :** उल्हासनगर येथील कल्याणी कॉलनी भागात गोळीबार झाल्याची घटना समोर आली आहे. भर रस्त्यात हा गोळीबार करण्यात आला असून या गोळीबारात दोघांचा मृत्यू आहे, तर यात काही जण जखमी आहेत. हा हल्ला बलवीर बिराजदार, शेखर बिराजदार, अजय राव, अजित शेख, देवेंद्र नाईक, सागर पाटील आणि त्यांच्या साथीदारांनी केल्याचा आरोप मयताच्या भावाने केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, कॅम्प पाच मधील कैलास कॉलनी चौकात सायंकाळी साडेसातच्या सुमारास १५ ते १६ जणांच्या टोळक्याने हातात शस्त्रे घेऊन हा हल्ला केला. ☞(पान २ वर)













# राज्य सेवा हक्क आयुक्त अरुण डोंगरे यांची मनपा आयुक्त लड्डा यांनी घेतली सदिच्छा भेट

**अमरावती/प्रतिनिधी:-** अमरावती विभागाच्या राज्य सेवा हक्क आयुक्तपदी नियुक्ती झाल्यानंतर अरुण डोंगरे यांची अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी गुरुवारी सदिच्छा भेट घेऊन अभिनंदन केले. यावेळी राज्य सेवा हक्क कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसह नागरिकांना शासकीय सेवा अधिक सुलभ, पारदर्शक व वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी विविध विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली.

भेटीदरम्यान नागरिकांना त्यांच्या हक्काच्या सेवा निर्धारित कालावधीत मिळणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत राज्य सेवा हक्क आयुक्त अरुण डोंगरे यांनी व्यक्त केले. प्रशासनातील उत्तरदायित्व वाढवून लोकाभिमुख व्यवस्था निर्माण करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सेवा वितरण प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करून नागरिकांच्या अडचणी कमी करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



यावेळी मनपा आयुक्त वर्षा लड्डा यांनी महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या विविध नागरी सेवांमध्ये राज्य सेवा हक्क कायद्याचे काटेकोर पालन करण्यात येत असल्याची माहिती दिली. नागरिकांच्या तक्रारीचे तातडीने निराकरण, ऑनलाइन सेवांचा विस्तार आणि पारदर्शक प्रशासनाला प्राधान्य देण्यासाठी महानगरपालिका सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी नमूद केले.

दोन्ही अधिकाऱ्यांमध्ये प्रशासनातील कार्यक्षमता वाढविणे, प्रलंबित प्रकरणांचा जलद निपटारा करणे तसेच नागरिकाभिमुख सेवा अधिक गतिमान करण्यासाठी विविध विभागांमधील समन्वय मजबूत करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. सामान्य नागरिकांना प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ करण्यासाठी संयुक्तपणे प्रयत्न करण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

राज्य सेवा हक्क कायदा हा नागरिकांना वेळेत सेवा मिळवून देणारा आणि प्रशासन अधिक जबाबदार बनविणारा महत्त्वपूर्ण कायदा असून त्याच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे शासनाच्या सेवांचा लाभ नागरिकांना अधिक सुलभतेने मिळत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

# पसंतीच्या दुचाकी क्रमांकासाठी सोमवारी अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती/ प्रतिनिधी:-** प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे परिवहनेत्तर (दुचाकी) संवर्गातील वाहनांसाठी नवीन वाहन मालिका सुरू करण्यात येत आहे. या मालिकेतील आवडते किंवा पसंतीचे क्रमांक मिळवण्यासाठी इच्छुक वाहनधारकांनी सोमवार, दि. २५ मे रोजी अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.


प्रादेशिक परिवहन कार्यालयात २५ मे रोजी सकाळी १० ते दुपारी २.३० वाजेपर्यंत खिडकी क्रमांक २५ अर्ज स्वीकारले जातील. यासाठी वाहन ज्या व्यक्तीच्या नावावर आहे, त्या व्यक्तीच्या नावाचा पुरावा, पत्त्याचा पुरावा, पॅन कार्ड आणि आधार कार्डशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक अर्जावर नमूद करणे अनिवार्य आहे. पसंती क्रमांकाचे विहित शुल्क अमरावती कॅम्प ब्रँच, ट्रेझरी ब्रँच कोड नं. ००३८६६ करिता देय असलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारे भरणे आवश्यक आहे. ज्या पसंती क्रमांकासाठी एकच अर्ज असेल किंवा एकापेक्षा जास्त अर्ज आले असतील, अशा क्रमांकांची यादी २५ मे रोजीच सायंकाळी ४ वाजता कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावली जाईल. एकाच क्रमांकासाठी दोन किंवा अधिक अर्ज आले असल्यास २६ मे रोजी दुपारी १.३० वाजेपर्यंत मूळ शुल्काव्यतिरिक्त जादा रकमेचा डिमांड ड्राफ्ट बंद लिफाफ्यात खिडकी क्र. २५ वर जमा करावा लागणार आहे. दुपारी ३ वाजता प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या दालनात लिफाफे उघडले जातील. सर्वाधिक रकमेचा डिमांड ड्राफ्ट असलेल्याला पसंती क्रमांक दिला जाईल. उर्वरित अर्जदारांचे डीडी परत केले जातील, असे प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी कळविले आहे.

# आदित्य भोजगढीया यांची NTA मध्ये संयुक्त संचालकपदी नियुक्ती

## केंद्र सरकारच्या उच्च शिक्षण विभागातील महत्त्वाची जबाबदारी

**मुर्तिजापूर/प्रतिनिधी:-** केंद्र सरकारच्या उच्च शिक्षण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या राष्ट्रीय परीक्षा संस्था (NTA) मध्ये संयुक्त संचालक पदावर मुर्तिजापूर येथील आदित्य राजेंद्र भोजगढीया (अग्रवाल) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने या नियुक्तीस मंजुरी दिल्याने मुर्तिजापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

भारत सरकारच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाने १६ मे २०२६ रोजी जारी केलेल्या कार्यालयीन ज्ञापनानुसार, आदित्य भोजगढीया यांची राष्ट्रीय परीक्षा संस्था (NTA) मध्ये संयुक्त संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा कार्यकाळ १६ मे २०२८ पर्यंत किंवा पुढील आदेश येईपर्यंत राहणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे.



आदित्य भोजगढीया हे यापूर्वी भारत सरकारच्या विविध विभागात कार्यरत होते. ते वृत्तपत्र व्यवसायातील ज्येष्ठ स्वर्गीय नंदलाल सागरमल अग्रवाल यांचे नातू असून राजेंद्र अग्रवाल यांचे चिरंजीव आहेत. त्यांच्या नियुक्तीमुळे मुर्तिजापूर शहरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. दरम्यान, आकाश जैन यांचीही NTA मध्ये संयुक्त संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.


# बुद्धिस्ट पर्सनल लॉ जनजागृती सभा अमरावतीत उत्साहात

## -देशभरातील मान्यवरांची उपस्थिती

**अमरावती/ प्रतिनिधी:** ऑल इंडिया ॲक्शन कमिटी फॉर बुद्धिस्ट पर्सनल लॉ दिल्लीच्या वतीने अमरावती येथील भीम टेकडी परिसरातील संबोधी हॉल येथे बुद्धिस्ट लॉ संदर्भात सहविचार व जनजागृती सभेचे नुकतेच यशस्वी आयोजन करण्यात आले होते. ९ मे २०२६ रोजी झालेल्या या विशेष सभेला अमरावतीसह देशाच्या विविध राज्यांतून आलेल्या बौद्ध धम्म अनुयायी आणि कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या जनजागृती सभेला मुख्य मार्गदर्शक म्हणून सुप्रीम कोर्ट दिल्लीचे ॲडव्होकेट शांती प्रकाश, ॲक्शन कमिटीचे राष्ट्रीय अध्यक्ष सतवीर बौद्ध (हरियाणा), राष्ट्रीय महासचिव सुनील बौद्ध (दिल्ली), राष्ट्रीय सदस्य तथा राज्य अध्यक्ष मधू बावलकर (कांबळे) आणि राष्ट्रीय कोषाध्यक्ष प्रदीप फुलझेले (कामठी) प्रामुख्याने उपस्थित होते. यासोबतच माजी शिक्षणाधिकारी एस. बी. खोबरागडे, दिनकरराव तुरकाने आणि गजानन इंगळे यांनीही कार्यक्रमात महत्त्वपूर्ण सहभाग नोंदवला. उपस्थित मान्यवरांनी बुद्धिस्ट पर्सनल लॉच्या कायदेशीर बाबी आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी सुरू असलेल्या देशव्यापी चळवळीवर सविस्तर प्रकाश टाकला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ॲक्शन कमिटीचे सदस्य, नियोजन व आयोजन समितीचे सर्व पदाधिकारी, तसेच अमरावती, नागपूर आणि मुंबई येथील ॲक्शन कमिटीच्या कार्यकर्त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले. या सभेला भीम टेकडी परिसर, राजेंद्र नगर, अमरनगर, राममोहन नगर, प्रशांतनगर, नया अकोला यासह संपूर्ण अमरावती शहरातून आणि परिसरातून मोठ्या संख्येने बुद्धिजीवी, नागरिक, बंधू आणि भगिनी उपस्थित होत्या.



एड.शांती प्रकाश (सुप्रीम कोर्ट दिल्ली) यांनी आपल्या भाषणात बौद्धांसाठी स्वतंत्र कायदा व्हावा यासाठी ऑल इंडिया ॲक्शन कमिटी फॉर बुद्धिस्ट पर्सनल लॉ चे वतीने युक्तिवाद करून पहिल्याच हियरिंग मध्ये निकाल ॲक्शन कमिटीच्या बाजूने मिळविला व तो लॉ कमिशनला पाठविल्याचे नमूद केले. तसेच याकरिता एड.शांती प्रकाश व त्यांची अकरा वकिलांची टीम कार्यरत असल्याचे सांगण्यात आले.

केंद्रीय अध्यक्ष सतवीर बौद्ध यांनी आपल्या भाषणात मागील बारा वर्षातील भारतातील विविध राज्यातील मंडळींच्या एकजुटीचा उल्लेख करून मिळवलेल्या यशावर प्रकाश टाकला.

ॲक्शन कमिटीचे केंद्रीय उपाध्यक्ष तथा कार्यक्रमाचे आयोजक मनोज छापाणी मोहन यांनी कमिटीच्या सोबत देशभरातील सभासदांना कसे जोडले तसेच आंदोलनाचा इतिहास आणि भारतातील विविध सभांचा उल्लेख आपल्या भाषणात केला. केंद्रीय सचिव सुनील बौद्ध यांनी संपूर्ण इतिहास मांडत महाबोधी महाविहार मुक्ती तथा बौद्धांच्या स्वतंत्र कायद्याकरिता काय करावे लागले याची माहिती दिली.

आला आहे. या आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता, पर्यावरण संरक्षण अधिनियम, सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम तसेच मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई अपर पोलीस उपअधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे आणि पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत ठाणेदार अमन सिरसट, पोलीस उपनिरीक्षक प्रशांत जाधव तसेच पोलीस कर्मचारी मनोज पंडीत, अनुप टिंगणे, विनीत क्षिरसागर आणि योगेश राखोंडे यांनी सहभाग घेतला.

# १ व १० वरील उर्वरित

### मै भी कॉकरोच म्हणत

मै हू कॉकरोच पार्टी नावाचे पोस्टर लावून येथील जिल्हा परिषद कार्यालया पोहचून भीक मांगो आंदोलन केले.गिरडकर यांच्या या आंदोलनाने जि. प. मध्ये काही वेळ तारांबळ उडाली होती. मै भी कॉकरोच सध्या सोशल मीडियावर मोठा फॅड आता गोंदिया जिल्ह्यातही पोहचले आहे.

'मागील दोन वर्षांपासून मनरेगाच्या थकीत मजुरीसाठी वांरवार पाठपुरावा केला मात्र त्याची दखल न घेतल्याने आज भीक मांगो आंदोलन करुन आपल्या भावना प्रशासनापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला.'

- सुनील गिरडकर, ग्रामपंचायत सदस्य

### पेट्रोल-डिझेल, एलपीजी

नाही -गोपीनाथ यांच्या मते, या स्थितीत सरकार जनतेला पूर्णपणे दिलासा देऊ शकणार नाही. काही बोजा सरकार नक्कीच उचलेल, मात्र वाढत्या किमतींचा थेट फटका जनता आणि कंपन्यांनाही सहन करावा लागेल. अर्थात पेट्रोल पंपांवर किमती वाढू शकतात. आपण अशा काळात प्रवेश करत आहोत जेथे महागाई सातत्याने वाढू शकते.'

याच वेळी, त्यांनी नागरिकांना न घाबरण्याचेही आवाहन केले आहे. कारण भारताची देशांतर्गत मागणी, पायाभूत सुविधांवरील खर्च आणि परकीय चलन साठा सध्या मजबूत स्थितीत आहे. मात्र, ही युद्ध परिस्थिती आणखी लांबल्यास, संपूर्ण जगासमोरच मोठे आर्थिक संकट निर्माण होईल.

### धोनीची सीएसकेला

आणि भावनिक घटस्फोटाची सुरुवात ठरू शकतो.

चालू हंगामाचा विचार केला तर, आयपीएल २०२६ सुरू होण्यापूर्वी धोनीच्या पायाच्या स्नायूंना दुखापत झाली होती, ज्यामुळे त्याने अद्याप या हंगामात एकही सामना खेळलेला नाही. दुखापतीतून सावरल्यानंतरही, संघाचे संतुलन बिघडू नये म्हणून या ४४ वर्षीय दिग्गज खेळाडूने अंतिम अकरा (ईल्ेिहु ६) मधून बाहेर राहणे पसंत केले होते.

विविध माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, सीएसकेच्या गोटात गेल्या काही काळापासून संघबांधणी, महत्त्वाचे निर्णय आणि धोनीनंतर फ्रँचायझीच्या भविष्यातील नियोजनावरून अंतर्गत तणाव निर्माण झाला आहे. धोनीचा थेट सहभाग नसताना संघ व्यवस्थापनाने काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्यामुळे तो नाराज असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. आयपीएल २००८ पासून धोनी आणि चेन्नई सुपर किंग्स ही दोन नावे एकमेकांत इतकी एकरूप झाली आहेत की, त्यांच्यातील वादाची बातमी चाहत्यांना पचवणे कठीण जात आहे.

जरी दोन्ही बाजूंनी यावर अद्याप कोणतेही जाहीर वक्तव्य केले नसले, तरी या हंगामातील काही असामान्य घडामोडींकडे चाहत्यांनी लक्ष वेधले आहे. आयपीएल २०२६ च्या काही टप्प्यांत धोनी रणनीती आखण्याच्या प्रक्रियेत फारसा सक्रिय नव्हता, तसेच वरिष्ठ व्यवस्थापन आणि भारताचा माजी कर्णधार यांच्यात संवाद तुटल्याच्या अफवांनाही इंटरनेटवर उधाण आले आहे.

जडेजा आणि सॅमसनचे ट्रेड ठरले वादाचे कारण?

या संभाव्य वादाच्या केंद्रस्थानी रवींद्र जडेजा आणि संजू सॅमसन यांच्या संदर्भातील 'ट्रेड' (खेळाडूंची अदलाबदली) संदर्भातील चर्चा असल्याचे सांगण्यात येत आहे. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या वृत्तानुसार, वरिष्ठ खेळाडू आणि संघाच्या भविष्यातील नेतृत्वाच्या नियोजनाबाबत अंतर्गत पातळीवर सुरू असलेल्या चर्चांमध्ये आपल्याला पूर्णपणे विश्वासात घेतले गेले नाही, यावर धोनीने तीव्र आक्षेप घेतला आहे.

यात रवींद्र जडेजाच्या मुद्द्याने पुन्हा एकदा जुन्या वादाला तोंड फुटले आहे. गेल्या काही हंगामांत जडेजा आणि सीएसके व्यवस्थापनातील संबंध चढ-उतारांचे राहिले आहेत. दुसरीकडे, राजस्थान रॉयल्सचा कर्णधार संजू सॅमसन याला चेन्नईच्या संघात आणण्याच्या हालचालींवरून, सीएसके व्यवस्थापन धोनीनंतरच्या काळासाठी आक्रमकपणे पावले टाकत असल्याचे संकेत मिळत आहेत. या दाव्यांची अद्याप स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नसली, तरी डिजिटल विश्वात याच मुद्द्यावरून क्रिकेटप्रेमींमध्ये मोठी चर्चा रंगली आहे.

चेन्नई सोडण्याच्या वृत्तावर एमएस धोनीची प्रतिक्रिया काय?

सध्या तरी एमएस धोनीने सीएसके सोडण्याच्या किंवा या वादाच्या व्हायरल वृत्तावर जाहीरपणे कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र, एका ताज्या घडामोडीने या चर्चांमध्ये आणखीच तेल ओतले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, धोनी चेन्नईहून थेट आपल्या रांची येथील घरी परतला असून, तो अहमदाबाद येथे होणाऱ्या सीएसकेच्या साखळी फेरीतील शेवटच्या सामन्यासाठी संघासोबत प्रवास करणार नाही. सीएसकेचा संघ जर आयपीएल २०२६ च्या प्ले-ऑफसाठी पात्र ठरला, तरच धोनी पुन्हा संघाशी जोडला जाईल, असे समजते.

जोपर्यंत धोनी किंवा चेन्नई सुपर किंग्स अधिकृतपणे यावर आपली भूमिका स्पष्ट करत नाहीत, तोपर्यंत या चर्चा थांबण्याची चिन्हे नाहीत. परंतु, एक गोष्ट नक्की की एमएस धोनी आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्यातील हे नाते कटू मोडावर संपण्याची शक्यता, हा आयपीएल २०२६ मधील आतापर्यंतचा सर्वात मोठा आणि धक्कादायक विषय ठरला आहे.

### तामिळनाडूमध्ये शपथविधीवेळी काँग्रेस

या जयघोषावर राज्यपालांनी काँग्रेस नेत्याला जागेवरच कडक शब्दांत आठवण करून दिली. राज्यपाल आर्लेकर यांनी हसतमुख चेहऱ्याने पण स्पष्ट शब्दांत सुनावले, 'हा तुमच्या शपथेचा भाग नाही.' या घोषणाबाजीवर राज्यपालांनी टोकल्यानंतर एस. राजेश कुमार यांनीही हसून दाद दिली आणि ते शपथेच्या कागदपत्रावर स्वाक्षरी करण्यासाठी पुढे गेले.

शपथविधी सोहळ्याचा व्हिडिओ व्हायरल

शपथविधी सोहळ्याच्या व्हिडिओमध्ये एस. राजेश कुमार हे, 'तामिळनाडूतील काँग्रेसचे दिवंगत दिग्गज नेते के. कामराज यांचे नाव अमर राहो', 'भारतरत्न राजीव गांधी अमर राहो' आणि 'लोकनेते राहुल गांधी अमर राहो', अशा घोषणा देताना दिसत आहेत. हा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

काँग्रेस 'टीव्हीके' सरकारमधील एक महत्त्वाचा घटक पक्ष

तामिळनाडू विधानसभेत ५ आमदार असलेली काँग्रेस 'टीव्हीके' सरकारमधील एक महत्त्वाचा घटक पक्ष आहे. अभिनेता विजय यांच्या नेतृत्वाखालील पक्षाला निवडणुकीत बहुमत न मिळाल्यामुळे काँग्रेसने त्यांना पाठिंबा दिला. काँग्रेसने आपली जुनी मैत्रीण असलेल्या 'डीएमके' (अ्श्ख) सोबतची युती तोडून सर्वात आधी 'टीव्हीके'ला पाठिंबा जाहीर केला होता.

मंत्रिमंडळात टीव्हीकेचे २१ आमदार

काँग्रेस गेल्या २० वर्षांपासून डीएमकेची मित्रपक्ष राहिली असली, तरी राज्यातील डीएमकेच्या मंत्रिमंडळात ते कधीही सामील झाले नव्हते.अभिनेते आणि नेते जोसेफ विजय यांनी १० मे रोजी मुख्यमंत्री म्हणून इतर ९ मंत्र्यांसह शपथ घेतली होती. त्यानंतर गुरुवारी त्यांनी आपल्या मंत्रिमंडळाचा विस्तार केला, ज्यामध्ये 'टीव्हीके'च्या २१ आणि काँग्रेसच्या २ आमदारांचा समावेश करण्यात आला आहे.

### टोळक्याने गोळया घालून

हा हल्ला बलवीर बिराजदार, शेखर बिराजदार, त्यांच्या साथीदारांनी केल्याचा आरोप मयताच्या भावाने केला आहे. घटनेची माहिती मिळताच हिललाइन पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. मयत आणि जखमींना उपचारासाठी मध्यवर्ती रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र जखमी अर्जुन चौहान याची प्रकृती गंभीर असल्याने त्याला पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान, पंधरा दिवसांपूर्वी हप्ता न दिल्याच्या कारणावरून एका टेम्पो चालकावर हल्ला करण्यात आला होता. याप्रकरणी हिललाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच टेम्पो पार्किंगच्या वादातून अनिल चौहान यांनी बलवीर बिराजदार आणि शेखर बिराजदार यांच्या विरोधात तक्रार दिली होती. या तक्रारीचा राग मनात धरून २८ एप्रिल रोजी आरोपींनी साथीदारांसह अनिल चौहान यांच्या घरी जाऊन लाकडी दांडक्याने मारहाण केल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर तडीपार असलेला कुख्यात गुंड सागर लक्ष्मण पाटील याने फिर्यादीचा मोठा भाऊ किशोर चौहान याला फोन करून धमकी दिली होती.

### भरधाव कारची दुचाकीला धडक;

सोनेरी येथील मदरशात गेले होते. तेथून तिघेही दुचाकी एम एच २७ डीएन २०८९ ने अमरावतीकडे परतत असताना लोणी गावाजवळ पाठीमागून येणाऱ्या एमएच-०५-सीएम-३९०० क्रमांकाच्या भरधाव कारने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की कारचा पुढील भाग पूर्णपणे चक्काचूर झाला. धडकेनंतर तिघेही रस्त्यावर फेकले गेले. मोहम्मद नौशाद यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर पत्नी आणि मुलगा जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच लोणी पोलीस स्टेशन चे पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी लोणी पोलिसांनी कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

### दर्यापुरातील मुलीवरील चाकू

त्यामध्ये घटनेच्या वेळेत कोणतीही संशयित मोटारसायकल दिसून आली नाही. यानंतर पुन्हा सखोल चौकशी करण्यात आली असता मुलीने धक्कादायक सत्य कबूल केले. आईने रागावल्यामुळे मानसिक तणावात असताना ती स्वयंपाकघरात भाजी कापत होती. त्यावेळी नकळत तिने स्वतःच्या हातावर आणि गळ्याजवळ चाकू फिरवला. रक्त पाहून ती घाबरली आणि आईला फोन करून घरी बोलावले. भीतीपोटी तिने दोन अज्ञात युवकांनी हल्ला केल्याची खोटी माहिती आईला दिली. आईनेही ती माहिती खरी समजून पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांच्या तपासात संपूर्ण घटना बनावट असल्याचे स्पष्ट झाले असून सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या चाकूहल्ल्याच्या बातम्यांना पूर्णविराम मिळाला आहे. ही सत्यता समोर आणण्यासाठी पोलिस अधिक्षक निकेतन कदम, दत्ता तोटेवाड तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुनिल वानखडे यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक नम्रता राठोड, पोलीस उपनिरीक्षक रोहित सोनटक्के तसेच महिला पोलीस कर्मचारी मोना इंगळे आणि शालिनी घुगे यांनी तपास केला.

### स्थानिक प्राधिकारी मतदारसंघात

स्तरावर मतदान केंद्र राहणार आहे. मतदारांची ड्राफ्ट यादी तयार झाली असून सर्व राजकीय पक्षांना ती पाठविण्यात येईल. यावरील हरकतीनंतर मतदारयादी अंतिम करण्यात येणार आहे. आचारसंहितेसाठी जिल्हा आणि तालुकास्तरावर समिती नेमणे आवश्यक आहे. त्यानुसार कारवाई करण्यात यावी. आचारसंहितेच्या कालावधीत कामे प्रस्तावित करण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहे. त्यानुसार मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली छाननी समिती स्थापन करण्यात आली आहे. कामे प्रस्तावित करणे आवश्यक असल्यास या समितीकडे पाठविण्यात याव्यात. मतदार कमी असल्याने त्यांना प्रलोभन देण्याचे प्रकार होण्याची शक्यता असल्याने याबाबत काळजी घेण्याची सूचना जिल्हाधिकारी येरेकर यांनी दिली.

### पोस्टमार्टमसाठी डॉक्टर नसल्याने

माहिती मिळताच फ्रेजपुरा पोलिसांनी तिथे पोहोचून पंचनामा केला आणि मृतदेह रात्री जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या शवागारमध्ये ठेवला. गुरुवारी त्याचे पोस्टमार्टम होणार होते. यामुळे सकाळपासूनच कुटुंबीय रुग्णालयात पोहोचले होते पण डॉक्टर तेथे उपस्थित नव्हते. विचारपूसमध्ये कर्मचाऱ्यांनी सांगितले की डॉक्टर कोर्टामध्ये गेले आहे. यामुळे कुटुंबीय संतापले. एकीकडे मुलाच्या जाण्याचे दुःख आणि दुसरीकडे प्रशासनाची उदासीनता यामुळे ते संतापले. तासंतास बसल्यानंतरही कोणीही न आल्याने शेवटी त्यांनी गोंधळ घातला. आक्रोश व्यक्त करत ते जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.विनोद पवार यांच्याकडे गेले आणि तक्रार दाखल केली. प्रकरणाचे गांभीर्य पाहून त्यांनी दुसऱ्या डॉक्टरला पोस्टमार्टम करण्याची जबाबदारी दिली. यानंतर मृतक वीरेंद्र गवळी याचे पोस्टमार्टम करण्यात आले आणि मृतदेह कुटुंबीयांना देण्यात आला.

### रेती तस्करी : ट्रकसह ५०.७०

आली. पोलिसांनी ५० लाख रुपये किमतीचा ट्रक आणि ७० हजार रुपये किमतीची रेती असा एकूण ५० लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी चालक यश मनोहर उईके (वय २७, रा. निंभी, ता. मोर्शी), गिरी दिगांबर मडावी (वय २४, रा. खेड, ता. मोर्शी) तसेच ट्रक मालक मंगेश जानराव लांडे (वय ४४, रा. प्रविणनगर, अमरावती) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात

### ७ अवैध वरली मटका अड्ड्यांवर

जप्त करण्यात आले. येथूनच अर्जुन चंद्रपाल पांडे (वय ३२,वडाली )याला १ हजार २१० रुपयांचे साहित्यासह अटक केली. नागपुरी गेट पोलीस ठाणे हद्दीत कमेला ग्राउंड परिसरातून आरोपी शेख नईम शेख फईक (वय ४०,अकबर नगर) याला ताब्यात घेतले तर पठाण चौक परिसरातून मोहम्मद सलीम मोहम्मद हनीफ (वय ५३, सागर नगर ) याला जुगार साहित्यसह अटक केली. तसेच गाडगे नगर पोलीस ठाणे हद्दीतून शेगाव नाका परिसरातून आरोपी निखिल नंदकुमार थोरात (वय २५, शेगाव ) याला १३८० रुपयांचे जुगार साहित्यसह ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी सात कारवाईमध्ये १० हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून ८ आरोपींना ताब्यात घेतले आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त श्याम घुगे, रमेश धुमाळ, सहाय्यक आयुक्त शिवाजीराव बचाटे यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात पथकाने केली.

### गहाळ ४७ मोबाईलचा शोध

व्यक्त करत गाडगेनगर पोलिसांचे आभार मानले. ही संपूर्ण कारवाई वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गाडगेनगर पोलीस स्टेशनच्या डी.बी. पथकाने केली. यामध्ये पोलीस उपनिरीक्षक सागर ठाकरे, पोलीस कर्मचारी प्रकाश मेश्राम, निलेश जुनघरे, अमोल यादव, विनोद मालवे, आशिष ठाकरे, सिद्धार्थ शृंगारे आणि सचिन गौरखेडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

### सोशल मीडियावरील पोस्टवर

उपस्थित होते. पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकारीही बैठकीत सहभागी झाले होते. बैठकीदरम्यान बकरी ईद उत्सव काळातील पाणीपुरवठा, वीजपुरवठा, स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन यांसह विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. संबंधित विभागांना आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या. दररोज पाणीपुरवठा करणे शक्य नसल्याने नागरिकांनी पुरेशा प्रमाणात पाण्याची साठवण करून ठेवावी, असे आवाहन पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात आले. दरम्यान, पशुसंवर्धन विभागाने कुर्बानीपूर्वी जनावरांची वैद्यकीय तपासणी करून अधिकृत परवानगी घेणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. तसेच राज्यातील गौहत्याबंदी कायद्याचे पालन करण्याचे आवाहन करत गोवंशाची कत्तल करू नये, असेही सांगण्यात आले. यावेळी बोलताना पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी अमरावती हे शांतताप्रिय शहर असून हिंदू-मुस्लिम समाजाने नेहमीच सौहार्द जपले असल्याचे नमूद केले. आगामी काळातही सर्व नागरिकांनी भाईचारा कायम ठेवत कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे त्यांनी आवाहन केले. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या भडकाऊ पोस्ट, अफवा किंवा समाजात तेढ निर्माण करणाऱ्या संदेशांची माहिती तातडीने पोलिसांना द्यावी, असे सांगत अशा पोस्टवर सायबर पोलिसांची करडी नजर राहणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला. शहरातील शांतता भंग करण्याचा प्रयत्न करणाऱ्या समाजकंटकांची माहिती पोलिसांनी संकलित केली असून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सोशल मीडियावरील दिशाभूल करणाऱ्या पोस्टमुळे तरुणांकडून अनुचित प्रकार घडत असल्याचे नमूद करत पालकांनी व नागरिकांनी तरुणांचे योग्य समुपदेशन करण्याचे आवाहनही करण्यात आले. बैठकीच्या शेवटी पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी सर्व नागरिकांना बकरी ईदच्या शुभेच्छा देत शहरातील शांतता, सलोखा आणि सामाजिक ऐक्य कायम राखण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

### अमरावती परिक्षेत्रीय पोलीस

परीक्षण, बॅलिस्टिक, नार्कोटिक्स आणि केमिकल ॲनालिसिस या विविध फॉरेन्सिक शाखांची सविस्तर माहिती देण्यात आली. गुन्हे तपासात वैज्ञानिक पुरावे न्यायालयीन प्रक्रियेत अत्यंत विश्वासार्ह मानले जात असल्याने पुरावे योग्य पद्धतीने संकलित करून त्यांचे वैज्ञानिक विश्लेषण करणे आवश्यक असल्याचे वक्त्यांनी स्पष्ट केले. विशेषतः इंटरनेट आणि डिजिटल माध्यमातून होणाऱ्या गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेता सायबर फॉरेन्सिक्सचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. मोबाईल फोन, सोशल मीडिया, डिजिटल व्यवहार, सीसीटीव्ही फुटेज, ई-मेल आणि आयपी लॉग्स यांसारख्या डिजिटल पुराव्यांचे संकलन, जतन आणि विश्लेषण यामध्ये सायबर फॉरेन्सिक्स विभागाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे सांगण्यात आले. तसेच आधुनिक तपास पद्धती आणि तांत्रिक साधनांचा प्रभावी वापर करून गुणवत्तापूर्ण तपास करण्याचे आवाहन पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना करण्यात आले. नव्या कायद्यांनंतर शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनवर कार्यरत अधिकाऱ्यांनीही कार्यशाळेत सहभाग घेतला. या कार्यशाळेत अमरावती परिक्षेत्रातील अमरावती, वाशिम, यवतमाळ, अकोला आणि बुलढाणा येथील सुमारे २६० वरिष्ठ पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यशाळेचे आयोजन निकेतन कदम यांच्या आदेशानुसार व दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अमरावती ग्रामीण पोलीस दलाने केले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ शुक्रवार, २२ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर जिल्हा परिषद प्रशासन 'ॲक्शन मोड'वर

## घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ ची गावागावात जनजागृती सुरू

■ प्रतिनिधी | वाशिम ■

*स्वच्छ पर्यावरण हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार असून गावातील घनकचऱ्याचे व्यवस्थापन करणे ही स्थानिक स्वराज्य संस्थांची अर्थात ग्रामपंचायतींची जबाबदारी असल्याचे स्पष्ट निर्देश न्यायालयाने दिल्यानंतर जिल्हा परिषद प्रशासन आता 'ॲक्शन मोड'वर आले आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाभरात जनजागृती मोहीम सुरू करण्यात आली आहे.*



जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी सर्व गटविकास अधिकारी यांना याबाबत सविस्तर संयुक्त पत्राद्वारे निर्देश दिले आहेत.

या पार्श्वभूमीवर बुधवारी वाशिम तालुक्याचे गटविकास अधिकारी रवींद्र सोनोने यांनी तोंडगाव, आडोळी आणि तामसी या गावांना भेट देऊन स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सुरू असलेल्या घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या कामांचा आढावा घेतला. यावेळी नाडेप खत खड्डे, कचरा विलगीकरण केंद्र तसेच गावातील स्वच्छता व्यवस्थापन सुविधांची पाहणी करण्यात आली. गावात उघड्यावर कचरा टाकू नये तसेच ओला आणि सुका कचरा वेगळा करून त्याचे शास्त्रोक्त व्यवस्थापन करावे, अशा सूचना ग्रामपंचायतींना देण्यात आल्या. यादरम्यान जिल्हा परिषदेचे राम श्रृंगारे, तोंडगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच वंदना भगवानराव गोटे, उपसरपंच श्री गोटे, ग्रामपंचायत अधिकारी ज्ञानेश भांडारकर, आडोळी ग्रामपंचायतीचे उपसरपंच भगवान इढोळे, परमेश्वर इढोळे, शाळा व्यवस्थापन समितीचे सतिश इढोळे आणि दिपक इढोळे, ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन, तामसी ग्रामपंचायतीचे अमोल कवर, लिंबाजी लांडगे तसेच गट समन्वयक वसंता इंगोले उपस्थित होते.

### जनजागृतीसाठी पोस्टर व माहिती पुस्तिकांचा वापर

घनकचरा आणि सांडपाणी व्यवस्थापनाबाबत ग्रामस्थांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी विशेष पोस्टर आणि माहिती पुस्तिकांचा प्रभावी वापर करण्यात येत आहे. यामध्ये घरगुती कचऱ्याचे वर्गीकरण, नाडेप खत खड्ड्यांचा वापर, सांडपाणी व्यवस्थापन तसेच गाव स्वच्छ ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची माहिती देण्यात येत आहे.

### जिल्ह्यातील २१ बाजारपेठेची गावे टार्गेटवर

घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्ह्यातील ५ हजारांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या २१ बाजारपेठेच्या ग्रामपंचायतींना प्राधान्याने लक्ष्य करण्यात आले आहे. यामध्ये वाशिम तालुक्यातील काटा, तामसी, तोंडगाव, अनसिंग; मालेगाव तालुक्यातील मुंगळा, किन्ही राजा, शिरपूर, मेडशी; रिसोड तालुक्यातील वाकद, रिठद, हराळ, केनवड; मंगरुळपीर तालुक्यातील वनोजा, शेलूबाजार; कारंजा तालुक्यातील उंबर्डा बाजार, पोहा, धामणी खडी, धनज बुद्रुक, कामरगाव तसेच मानोरा तालुक्यातील पोहरादेवी आणि शेंदुर्जना आढाव या गावांचा समावेश आहे. ग्रामीण भाग स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक करण्यासाठी ग्रामपंचायतींसह नागरिकांनीही सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# खाद्यतेल उत्पादनात आत्मनिर्भरतेसाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांकडून प्रस्तावांचे मागविले

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राष्ट्रीय खाद्यतेल अभियान - तेलबिया अंतर्गत जिल्ह्यात तेलबिया पिकांची उत्पादकता वाढवण्यासाठी आणि मूल्य साखळी मजबूत करण्यासाठी कृषी विभागाने कंबर कसली आहे. आगामी वर्षासाठी जिल्ह्यात मूल्य साखळी समूह विकसित केले जाणार असून, यासाठी मूल्य साखळी भागीदार म्हणून काम करण्यास इच्छुक असणाऱ्या पात्र शेतकरी उत्पादक कंपन्या आणि सहकारी संस्थांकडून जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयाने अर्ज मागविले आहेत.

या अभियानांतर्गत निवडल्या जाणाऱ्या भागीदार संस्थांना जिल्ह्यात प्रमाणित बियाणे वितरण करणे, पात्र शेतकऱ्यांची मृद चाचणी करून घेणे, शासनाच्या कृषी नोंदणी प्रणालीवर शेतकऱ्यांची नोंदणी करणे, तसेच शेतकरी प्रशिक्षण आणि शेतीशाळा यांसारखे महत्त्वपूर्ण घटक राबवावे लागणार आहेत.

### या संस्थांना मिळणार प्राधान्य

कमी उत्पादकता असणाऱ्या तालुक्यांमध्ये कार्यरत असणाऱ्या संस्था, सरकारकडून अनुदान प्राप्तकर्ते शेतकरी उत्पादक संघ, तसेच नाफेड, एनएससी, महाबीज, नाबार्ड, माविम आणि राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांसारख्या शासकीय संस्थांशी संलग्न कंपन्यांना निवडीमध्ये प्राधान्य दिले जाईल. या प्रक्रियेत पात्र शेतकरी कंपन्या किंवा सहकारी संस्था उपलब्ध न झाल्यासच अटी व शर्तींच्या अधीन राहून सार्वजनिक किंवा खाजगी संस्थांचा विचार केला जाईल. जिल्हा कार्यकारी समितीद्वारे प्राप्त अर्जांची सखोल पडताळणी केली जाईल. यामध्ये कार्यरत वर्षे, संलग्न शेतकरी संख्या, सरासरी महसूल आणि बाजार जोडणी या निकषांवर गुण आधारीत पद्धतीचा अवलंब करून अंतिम निवड होईल. दोन संस्थांना समान गुण मिळाल्यास, कमी उत्पादकता असणाऱ्या तालुक्यात काम करणाऱ्या संस्थेला प्राधान्य दिले जाईल.

### काय आहेत पात्रता निकष?

अर्जदार कंपनी किंवा सहकारी संस्थेची नोंदणी माहे मार्च २०२३ पूर्वीची असावी, म्हणजेच त्यांना किमान ३ वर्षांचा कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. संस्थेमध्ये किमान २०० नोंदणीकृत शेतकरी सभासद असावेत आणि मागील ३ वर्षांतील त्यांची सरासरी वार्षिक उलाढाल ९ लाख रुपयांपेक्षा जास्त असणे बंधनकारक आहे. शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या बाबतीत शेतकऱ्यांचा किमान ३ लाख रुपयांचा समभाग असावा, तर सहकारी संस्थांच्या उपविधीमध्ये तेलबिया पिकांविषयीच्या कामकाजाची नोंद असणे आवश्यक आहे.



### २८ मे पर्यंत अर्जांची मुदत

जिल्ह्यात मूल्य साखळी भागीदार म्हणून काम करण्यास उत्सुक असलेल्या पात्र शेतकरी उत्पादक कंपन्या आणि सहकारी संस्थांनी आपले सविस्तर प्रस्ताव दिनांक २८ मे २०२६ पर्यंत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, वाशिम येथे सादर करणे अनिवार्य आहे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केले आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त संस्थांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असेही प्रशासनातर्फे सांगण्यात आले आहे.

## महिलांसाठी आता जिल्हास्तरावर 'पीसीओडी क्लिनिक' सुरू

**अकोला :** महिलांच्या हार्मोनल व प्रजनन आरोग्य समस्यांवर उपचार सुविधांसाठी जिल्हा स्तरावर 'पॉलीसिस्टिक ओव्हेरियन डिसीज (पीसीओडी) क्लिनिक' सुरू करण्यात आली आहेत. सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या संकल्पनेतून सार्वजनिक आरोग्य विभागाने महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

महिलांमध्ये वाढत्या प्रमाणात आढळणाऱ्या पीसीओडी समस्येवर वेळेत निदान, उपचार आणि समुपदेशन उपलब्ध करून देण्यासाठी हा नवीन विशेष उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या सुविधेचा जास्तीत जास्त महिलांना लाभ घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

# लिंग गुणोत्तर प्रमाण वाढविण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे -डॉ. अनिल कावरखे

### जिल्हा सल्लागार समितीची बैठक

■ प्रतिनिधी | वाशिम ■

कन्याभृणहत्या आणि बिघडते लिंग गुणोत्तर हा समाजासमोरील गंभीर प्रश्न असून, या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्हा प्रशासनाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि लिंग निवडीस प्रतिबंध घालण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी जर लिंग निदान प्रतिबंधक व गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र (पीसीपीएनडीटी कायदा) किंवा वैद्यकीय गर्भपात अधिनियम (एमटीपी कायदा) अंतर्गत गर्भलिंग तपासणी करणाऱ्यांविषयी खात्रीशीर माहिती दिली.आणि त्या आधारे गुन्हा उघडकीस आला, तर संबंधित



माहितीदारास रु. १ लाखांचे बक्षीस देण्यात येणार आहे.

ही योजना सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविली जात असून, तिचा उद्देश कन्याभ्रुणहत्या थांबवणे, लिंग गुणोत्तर सुधारणे आणि महिला सक्षमीकरणाला चालना देणे हा आहे. नागरिक, आरोग्य कर्मचारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. दि.(१९) मे रोजी जिल्हा रुग्णालयात पीसीपीएनडीटी जिल्हास्तरीय सल्लागार समितीची बैठक पार पडली. यावेळी जिल्हास्तरीय सल्लागार समिती अध्यक्षा डॉ. अलका मकासरे, जिल्हा शल्य चिकित्सक तथा जिल्हा समुचित प्राधिकारी डॉ. अनिल कावरखे , अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पुरी, ॲड. डॉ .शिवनंदा आम्ले, डॉ.जया बिबेकर, डॉ.जे.एस.बाहेती, ॲड. गोवर्धन गंगावणे, डॉ.उज्वला गिऱ्हे, विधी सल्लागार ॲड. राधा नरवलिया आदी उपस्थित होते. गर्भधारणेपूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्रज्ञान (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा किंवा वैद्यकीय गर्भपात कायद्याअंतर्गत राबविलेल्या यशस्वी कारवाईबाबत माहिती देणाऱ्या नागरिकास एक लाख रुपये बक्षीस दिले जाईल. माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल आणि संबंधिताची ओळख सुरक्षित राहील.

नोंदणीसाठी https://amchimulgimaha.in या संकेतस्थळावर अर्ज करता येईल. **संपर्कासाठी :** राज्य पीसीपीएनडीटी टोल फ्री क्रमांक १०४, १८००२३३४४७५ वर संपर्क साधता येईल. सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून सजग राहा. तुमच्या माहितीद्वारे एका चिमुकल्या जीवाला जीवनदान मिळू शकते.

# वाशिम वासंतिक व्याख्यानमाला-२०२६ ला उत्साहात प्रारंभ

### समृद्ध ऐतिहासिक वारशाला वैचारिक पर्वणीची जोड

■ प्रतिनिधी | वाशिम ■



समृद्ध ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक परंपरा लाभलेल्या वाशिम शहरात अधिकारी-कर्मचारीवृंद यांच्या पुढाकारातून आयोजित 'वाशिम वासंतिक व्याख्यानमाला-२०२६' ला (दि.२०) मे रोजी उत्साहात प्रारंभ झाला. स्व. बाळासाहेब ठाकरे शेतकरी प्रशिक्षण केंद्र (आत्मा) येथे सुरू झालेल्या या पाच दिवसीय व्याख्यानमालेस रसिक नागरिकांचा पहिल्या दिवशी उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

उद्घाटन प्रसंगी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, जिल्हा पोलीस अधीक्षक नितेश खाटमोडे, अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील तसेच निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांची प्रमुख उपस्थिती होती. व्याख्यानमालेच्या पहिल्या पुष्पात 'शिवछत्रपतींचे किल्ले जागतिक वारसा... एक प्रवास' या विषयावर मुंबई येथील पुरातत्त्व व वस्तूसंग्रहालय संचालनालयाचे संचालक डॉ. तेजस गर्गे यांनी प्रभावी व्याख्यान दिले. स्वराज्यातील १२ ऐतिहासिक किल्ल्यांचा जागतिक वारसा यादीत समावेश करण्यासाठी नामांकनापासून ते मानांकनापर्यंतचा प्रवास, तसेच शासन आणि पुरातत्त्व विभागाने केलेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी यावेळी दिली.

जागतिक वारसा दर्जा मिळाल्यामुळे महाराष्ट्र जागतिक पर्यटनाच्या नकाशावर ठळकपणे झळकणार असून भविष्यात विदेशी पर्यटकांची संख्या वाढून स्थानिक रोजगार निर्मितीला चालना मिळेल, असा विश्वास डॉ. गर्गे यांनी व्यक्त केला.

यावेळी त्यांनी वाशिम जिल्ह्याच्या ऐतिहासिक वारशाचाही विशेष उल्लेख केला. वाशिम ही प्राचीन आणि ऐतिहासिक भूमी असून येथील नद्या, पुरातन वास्तू आणि सांस्कृतिक वारशाचा आपण अभ्यास केलेला असल्याचे त्यांनी सांगितले. या क्षेत्रात भविष्यात अधिक संशोधन होण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात बोलताना जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी वासंतिक व्याख्यानमालेच्या माध्यमातून पुढील चार दिवस विविध साहित्यिक, विचारवंत आणि अभ्यासकांचे विचार ऐकण्याची पर्वणी वाशिमकरांना मिळणार असल्याचे सांगितले. नागरिकांनी या व्याख्यानमालेचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

### मूळ पावती हरवले आहे

सर्वत्र लोकांना सूचित करण्यात येते की श्री प्रकाशराव नवनाथराव वाघ राहणार गाव मैंराळडोह पो. एरंडा ता. मालेगाव जि.वाशिम यांचे सोयाबीन ३७(सदतीस कट्टे) १८ क्विंटल अंदाजी किंमत ७२००० हजार रुपये इतकी असून पावती क्र. ६३७७०० हे बुलढाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी शाखा शेलुबाजार ता. मंगरूळपीर जि. वाशिम शेतमाल पावती हरवली आहे ज्यांना सापडली असेल (विनंती द्वारे) त्यांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा

**संपर्क :- श्री प्रकाशराव नवनाथराव वाघ.**
ह.मु. मैराळडोह
मो. ९९२२५८१९८५.

# इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

**मालेगाव :** येथील तहसील कार्यालया जवळील श्री व्यंकटेश सेवा समिती वाशिम द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या द्वारे आयोजित शिष्यवृत्ती परीक्षेत दरवर्षी प्रमाणे याही वर्षी निकालाची परंपरा कायम राखत गौरवित यश संपादन केले. या परीक्षेमध्ये शाळेतील इयत्ता पाचवी मधील ५२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी ३२ विद्यार्थी उत्तीर्ण/पात्र झाले.या सर्व विद्यार्थ्यांना हे यश शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल भिसडे यांच्या मार्गदर्शनात व परीक्षा विभाग प्रमुख अनिलकुमार सरकटे यांच्या सहकार्याने संपादन केले. सर्व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे शाळेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड.विजयराव जाधव, सर्व शाळेचे प्राचार्य, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक वृंद, शिक्षक इतर कर्मचारी व त्यांचे पालक यांनी शुभेच्छा दिल्या व कौतुक केले.




# सिटी हॉस्पिटलला आग सुदैवाने जीवितहानी नाही

## फायर ऑडिटचा प्रश्न ऐरणीवर; हॉस्पिटलसमोरील अतिक्रमणामुळे बचावकार्यालाही अडथळा

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील रामदास पेठ परिसरातील सिटी हॉस्पिटलमध्ये गुरुवारी दुपारच्या सुमारास भीषण आग लागल्याने एकच खळबळ उडाली. आयसीयू विभागात लागलेल्या या आगीत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांमध्ये प्रचंड घबराट निर्माण झाली. काही रुग्ण व नातेवाईकांनी जीव वाचवण्यासाठी हॉस्पिटलच्या गॅलरीमधून उड्या मारण्याचा प्रयत्न केल्याची माहिती समोर येत आहे.

अकोला जिल्ह्यात तापमान ४६ अंशांच्या जवळ पोहोचले असताना आगीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. अशातच सिटी हॉस्पिटलमध्ये अचानक आग लागल्याने परिसरात एकच धावपळ उडाली. आगीमुळे हॉस्पिटलच्या काही भागाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून घटनास्थळी अग्निशामक दल आणि पोलीस प्रशासनाने तातडीने धाव घेत आग आटोक्यात आणली. खबरदारीचा उपाय म्हणून १८ रुग्णांना








तत्काळ इतर रुग्णालयात हलविण्यात आले.

या घटनेनंतर सिटी हॉस्पिटलच्या फायर ऑडिटबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. हॉस्पिटलचे फायर ऑडिट झाले होते का? झाले असेल तर आयसीयूसारख्या संवेदनशील विभागात आग कशी लागली? असे सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत. शहरातील अनेक हॉस्पिटल आणि हॉटेलमध्ये फायर ऑडिट अद्यापही पूर्ण झाले नसल्याची चर्चा असून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी आवश्यक असलेला 'इमर्जन्सी एक्झिट' किंवा आपत्कालीन मार्ग या हॉस्पिटलमध्ये नसल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळे आग लागल्यानंतर रुग्ण आणि नातेवाईकांची मोठी तारांबळ उडाली. दरम्यान, हॉस्पिटलसमोरील अतिक्रमणाचाही मुद्दा चर्चेत आला आहे. हॉस्पिटल प्रशासनाने समोरील मोकळ्या जागेत मोठे जनरेटर तसेच इतर संरचना उभारल्यामुळे अग्निशामक दलाला बचावकार्य करताना अडचणींचा सामना करावा लागल्याची माहिती समोर येत आहे. एवढ्या मोठ्या हॉस्पिटलसमोर आवश्यक मोकळी जागा नसणे हीदेखील गंभीर बाब मानली जात आहे. आता फायर ऑडिट, आपत्कालीन मार्गाचा अभाव आणि अतिक्रमण या सर्व मुद्द्यांवर महापालिका प्रशासन सिटी हॉस्पिटलवर नेमकी काय कारवाई करते, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

### आपत्कालीन मार्ग नसल्याने रुग्णांचा जीव धोक्यात ?

सिटी हॉस्पिटलमधील आगीच्या घटनेत सर्वाधिक गंभीर बाब समोर आली ती म्हणजे आपत्कालीन मार्गाचा अभाव. आग लागताच हॉस्पिटलमध्ये एकच गोंधळ उडाला आणि अनेक रुग्ण व नातेवाईकांना बाहेर पडण्यासाठी सुरक्षित मार्गच उपलब्ध नसल्याचे चित्र दिसून आले. परिस्थिती इतकी गंभीर झाली की काहींना थेट गॅलरीतून उड्या मारण्याचा प्रयत्न करावा लागल्याची माहिती समोर आली आहे.विशेषतः आयसीयू सारख्या संवेदनशील विभागांमध्ये आग लागल्यानंतर काही सेकंदांचा विलंबही जीवघेणा ठरू शकतो. अशावेळी स्वतंत्र 'इमर्जन्सी एक्झिट' हा रुग्णालयाचा सर्वात महत्त्वाचा सुरक्षा भाग मानला जातो. मात्र सिटी हॉस्पिटलमध्ये तोच प्रभावीपणे उपलब्ध नसल्याचा आरोप आता होत आहे. आगीनंतर नागरिकांकडून संतप्त प्रतिक्रिया उमटत असून, 'आपत्कालीन मार्ग असता तर रुग्णांना जीव वाचवण्यासाठी गॅलरीतून उड्या मारण्याची वेळ आली नसती,' अशी भावना व्यक्त केली जात आहे. या घटनेमुळे शहरातील खासगी रुग्णालयांच्या सुरक्षाव्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, फायर ऑडिटसोबतच 'इमर्जन्सी एक्झिट'ची प्रत्यक्ष तपासणी आता प्रशासन करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १७४ ■ शुक्रवार, २२ मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# रुग्ण की एटीएम : आजार कोणताही असो, भरती करा'चा शहरातील निवडक डॉक्टरांचा धंदा चर्चेत

## विशेष तज्ज्ञ नसतानाही रुग्ण अडकवले जातात; उपचारापेक्षा बिलांवर भर असल्याची संतप्त चर्चा

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील निवडक खासगी रुग्णालयांबाबत सध्या नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, ज्या आजाराचा विषयच नाही त्या डॉक्टरांनी रुग्ण भरती कशाला करायचा? असा प्रश्न आता उघडपणे उपस्थित केला जात आहे. कोणत्याही प्रकारच्या आजाराने आलेला रुग्ण परत जाऊ नये, त्याला तत्काळ भरती करून घ्यावे आणि दिवसागणिक बिलांचा आकडा वाढवत ठेवावा, अशीच काही निवडक डॉक्टरांची भूमिका असल्याची चर्चा शहरभर रंगली आहे.

नातेवाईकांचा आरोप आहे की, अनेक रुग्णालयांमध्ये संबंधित आजाराचा तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध नसतानाही रुग्णांना दाखल करून घेतले जाते. उपचारांची योग्य दिशा नसताना केवळ चाचण्या, औषधे आणि बेड चार्जच्या नावाखाली आर्थिक लूट सुरू असल्याचे बोलले जात आहे. रुग्ण बरा होण्यापेक्षा बिल किती वाढते यावरच काहींचे लक्ष असते, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करीत आहेत.

विशेष म्हणजे, गंभीर रुग्णांची जबाबदारी स्वतः डॉक्टर न घेता नर्सिंग स्टाफकडून मोबाईलवर फोटो, रिपोर्ट मागवून उपचार सुरू ठेवले जात असल्याचे आरोपही समोर आले आहेत. काही ठिकाणी तर डॉक्टर रुग्णाला प्रत्यक्ष पाहायलाही येत नासल्याने नातेवाईकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.



शहरात सध्या कोणताही पेशंट आला तरी परत पाठवायचा नाही अशीच स्पर्धा सुरू असल्याचे बोलले जात आहे. यामागे केवळ आर्थिक दृष्टिकोन असल्याची चर्चा अधिक तीव्र झाली आहे. दरवर्षी डॉक्टरांच्या चारचाकी गाड्या बदलतात, आलिशान हॉस्पिटल्स वाढतात; पण सामान्य माणसाचे कर्ज आणि दुःखही तितक्याच वेगाने वाढते, असा टोला नागरिकांकडून लगावला जात आहे.

आरोग्य सेवा ही समाजसेवा मानली जात असताना काही मोजक्या डॉक्टरांच्या कथित व्यावसायिक लालसेमुळे संपूर्ण वैद्यकीय क्षेत्राची प्रतिमा मलीन होत असल्याची खंतही व्यक्त केली जात आहे. या प्रकारांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

**तोटे हॉस्पिटल प्रकरणाने खळबळ; नातेवाईकांचे गंभीर आरोप**

मिळालेल्या माहितीनुसार, विनायक लोखंडे नामक रुग्णाला अस्वस्थ वाटत असल्याने १९ तारखेला तोटे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. तपासणीअंती डॉक्टरांनी रुग्णाच्या शरीरातील सोडियम आणि पोटॅशियमची पातळी कमी झाल्याचे सांगितले. त्यानंतर पुढील तीन दिवस रुग्णावर उपचार सुरू ठेवण्यात आले. या काळात नातेवाईकांकडून दररोज ६ ते ७ हजार रुपयांप्रमाणे मोठी रक्कम आकारण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**अपुऱ्या सुविधा आणि ढिसाळ व्यवस्थापन?**

उपचार सुरू असताना डॉक्टरांनी रुग्णाला 'सिटी स्कॅन' करण्याचा सल्ला दिला. मात्र, एवढ्या मोठ्या मल्टिस्पेशालिटी रुग्णालयात रुग्णाला सुरक्षितपणे नेण्यासाठी स्वतःची रुग्णवाहिका उपलब्ध नव्हती, तसेच आपत्कालीन ऑक्सिजन व्यवस्थेचाही अभाव असल्याचा गंभीर आरोप नातेवाईकांनी केला आहे. अत्यंत गंभीर परिस्थितीत रुग्णाला सिटी स्कॅनसाठी हलविण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

**मृत्यूचे कारण सांगण्यास डॉक्टर असमर्थ**

सिटी स्कॅन करून रुग्ण परत आल्यानंतर अवघ्या अर्ध्या तासात डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलेण् धक्कादायक बाब म्हणजेए रुग्णाचा मृत्यू नेमका कशामुळे झालाए याचे स्पष्ट व समाधानकारक कारण डॉक्टर आणि त्यांच्या वैद्यकीय पथकाकडून नातेवाईकांना सांगण्यात आले नसल्याचा आरोप करण्यात आला आहेण् तीन दिवस उपचार करूनही जर मृत्यूचे कारण सांगता येत नसेलए तर वैद्यकीय व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण होतेए अशी संतप्त प्रतिक्रिया नातेवाईकांनी दिलीण

**कर्मचाऱ्यांची निष्काळजी वागणूकद्**

रुग्णालयातील कर्मचा?्यांकडून रुग्णाच्या देखभालीत हलगर्जीपणा करण्यात आलाण् रुग्णांच्या आरोग्यापेक्षा बिल वाढवण्यावरच भर असल्याचे आरोप आता पुढे येत आहेत.

सत्ताधाऱ्यांचे एजंट झालेत का अधिकारी?

# दुपट्टे गळयात घाला आणि उघडपणे राजकारण करा; अमर काळेंचा प्रशासनाला थेट इशारा

**वर्धा जनमाध्यम :** जिल्हाधिकारी कार्यालयात एप्रिल-मे महिन्यात घेण्यात आलेल्या विविध आढावा बैठकींमधून खासदार अमर काळे यांना सातत्याने डावलण्यात आल्याने जिल्ह्यात प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पूर नियंत्रण, आपत्कालीन व्यवस्था, जिल्हा वार्षिक योजना, रस्ते विकास, रेल्वे विभागाचा आढावा अशा महत्त्वाच्या बैठका पार पडल्या मात्र खरीप आढावा बैठकीचा अपवाद वगळता एकाही बैठकीचे निमंत्रण खासदार अमर काळे यांना देण्यात आले नाही. दुसरीकडे सत्ताधारी पक्षाचे आमदार मात्र या बैठकींमध्ये आवर्जून उपस्थित राहत असल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर संशय व्यक्त होत आहे.

या प्रकारामुळे संतप्त झालेल्या खासदार अमर काळे यांनी प्रशासनावर थेट हल्लाबोल करत अधिकाऱ्यांनी राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यासारखे वागू नये. तसेच वागायचे असेल तर सरळ पक्षाचे दुपट्टे गळ्यात घाला आणि राजकारण करा, असा इशाराच दिला. त्यांच्या या वक्तव्याने जिल्हा प्रशासनातील कथित पक्षपातीपणाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.



खासदार काळे म्हणाले, मीदेखील या जिल्ह्याचा लोकप्रतिनिधी आहे. मतदारसंघातील प्रश्न, विकासकामे, अडचणी आणि अधिकाऱ्यांना द्यावयाचे निर्देश जाणून घेण्याचा मला तितकाच अधिकार आहे. मात्र जिल्हा प्रशासन बाबासाहेबांच्या संविधानानुसार चालते की सत्ताधारी पक्षाच्या आदेशानुसार, अशी शंका आता निर्माण होत आहे.

जिल्ह्यातील विविध विकासकामांच्या आढावा बैठकींमध्ये लोकसभेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खासदारांनाच डावलले जात असल्याने प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. लोकशाहीत सर्व लोकप्रतिनिधींना समान वागणूक मिळणे अपेक्षित असताना जिल्हा प्रशासनाचा हा पक्षपाती चेहरा जनतेसमोर उघडा पडत आहे, अशी चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

खासदार अमर काळे यांनी पुढे इशारा देताना सांगितले की, जिल्हा प्रशासनाच्या या कार्यपद्धतीबद्दल सर्वसामान्य नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. अनेकांनी माझ्याकडे प्रशासनाच्या विरोधात भावना व्यक्त केल्या आहेत. प्रशासनाने अजूनही सावध न झाल्यास ही नाराजी उद्या आंदोलनाच्या ज्वालामुखीत रूपांतरित होईल.

दरम्यान, जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकींमध्ये निवडक लोकप्रतिनिधींनाच निमंत्रण दिले जात असल्याच्या चर्चेमुळे प्रशासनाच्या निष्पक्षतेवरच प्रश्न उपस्थित होत आहेत. जिल्ह्यातील राजकीय वातावरण या प्रकरणामुळे चांगलेच तापले असून, येत्या काळात हा वाद आणखी चिघळण्याची चिन्हे दिसत आहेत

# जिल्ह्यात तीन दिवस उष्णतेच्या तिव्र लाटेचा इशारा

## नागरिकांनी खबरदारी घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

**वर्धा जनमाध्यम :** गेल्या काही दिवसात जिल्हाच्या सरासरी तापमानात सातत्याने वाढ होत आहे. दि.२३ मे पर्यंत हवामान विभागाने जिल्ह्यात तीन दिवस उष्णतेच्या तिव्र लाटेचा इशारा दिला आहे. उष्णतेच्या लाटेमुळे शारिरीक ताण पडून आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी प्रशासनाकडून सूचविण्यात आलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**काय करावे :**

तहान लागलेली नसली तरी सुध्दा जास्तीत जास्त पाणी प्यावे, हलकी, पातळ व सछिद्र सूती कपडे वापरावेत, बाहेर जातांना गॉगल्स छत्री, टोपी, बुट व चप्पलचा वापर करण्यात यावा, प्रवास करतांना पाण्याची बाटली सोबत घ्यावी, उन्हात काम करीत असलेल्या व्यक्तींनी डोक्यावर टोपी किंवा छत्रीचा वापर करावा तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकावे, शरीरातील पाण्याचे




प्रमाण कमी होत असल्यास ओआरएस, घरी बनवण्यात आलेली लस्सी, तोरणी, लिंबूपाणी, ताक इत्यादीचा वापर करावा, अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

गुरांना छावणीत ठेवण्यात यावे तसेच त्यांना पुरेसे पिण्याचे पाणी द्यावे, घर थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करावा, रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात, पंखे, ओले कपडे यांचा वापर करावा तसेच थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करावे, कामाच्या ठिकाणी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, सुर्यप्रकाशाचा थेट संबंध टाळण्यासाठी कामगारांना सुचित करण्यात यावे, पहाटेच्या वेळी जास्तीत जास्त कामाचा निपटारा करण्यात यावा, बाहेर कामकाज करित असतांना मध्ये-मध्ये ब्रेक घेऊन नियमित आराम करावे, गरोदर कामगार व आजारी कामगारांची अधिकची काळजी घेण्यात यावी, रस्त्याच्या कडेला उन्हापासून संरक्षणाकरीता शेड उभारावे, जागोजागी पानपोईची सुविधा करावी.

**काय करु नये :**

लहाण मुले व पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनांत ठेऊ नये, दुपारी १२ ते ३.३० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे, गडद घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे, बाहेरील तापमान अधिक असल्यास शारिरीक श्रमाची कामे टाळावीत, उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळावे तसेच मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडे ठेवण्यात यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

# १२ वर्षांनंतर नळाला मुबलक पाणी; २० कुटुंबांचा जल्लोष

## अडीच तासांच्या पुरवठ्यात फक्त ३० मिनिटेच यायचे पाणी; अखेर समस्येला दिलासा

**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम :** प्रभाग क्रमांक ४ मधील बहरमबुवा आणि कुंभारपुरा परिसरातील सुमारे २० हून अधिक घरांमध्ये तब्बल १२ वर्षांनंतर प्रथमच नळाद्वारे मुबलक पाणी पोहोचल्याने नागरिकांनी आनंद व्यक्त करत जल्लोष साजरा केला. भर उन्हाळ्यात अनेक वर्षांची पाण्याची समस्या सुटल्याने नागरिकांनी नगरपरिषद प्रशासनासह लोकप्रतिनिधींचे आभार मानले.

या परिसरातील नागरिकांना मागील अनेक वर्षांपासून अत्यल्प पाणीपुरवठ्याचा सामना करावा लागत होता. अडीच तास पाणीपुरवठा होत असला तरी प्रत्यक्षात केवळ ३० मिनिटेच नळाला पाणी येत होते. याबाबत नागरिकांनी अनेकदा नगरपरिषद प्रशासन, नगराध्यक्ष तसेच नगरसेवकांकडे तक्रारी व निवेदने दिली होती. मात्र, समस्या कायम होती.

दरम्यान, प्रभाग क्रमांक ४ च्या नगरसेविका तथा बांधकाम सभापती ममता बोंगाडे यांनी हा प्रश्न नगराध्यक्षा राणी कलोडे व उपाध्यक्ष तथा पाणीपुरवठा सभापती अकील शेख यांच्या निदर्शनास आणून दिला. त्यानंतर पाणीपुरवठा विभाग प्रमुख कवठेकर यांनी प्रत्यक्ष पाहणी करून उपाययोजनेचे नियोजन केले.

पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने स्वतंत्र ६० फुटांची पाईपलाईन टाकून ती मुख्य जलवाहिनीला जोडली. बुधवारी (ता.२०) या योजनेची चाचणी घेण्यात आली. त्यानंतर संबंधित घरांमध्ये पूर्णवेळ आणि मुबलक पाणीपुरवठा सुरू झाल्याने नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला.

नागरिकांनी नगरसेविका ममता बोंगाडे, नगराध्यक्षा राणी कलोडे, उपाध्यक्ष अकील शेख तसेच पाणीपुरवठा विभागाचे आभार मानले आहेत.

**नागरिकांच्या भावना**

मागील १२ ते १५ वर्षांपासून पाण्यासारखी जीवनावश्यक समस्या वारंवार सांगूनही सुटत नव्हती. नव्या नगरसेविका ममता बोंगाडे यांनी पुढाकार घेऊन आमची अडचण दूर केली.

**उर्मिला हिरामण पाटील, गृहीणी**

घरात नळ असूनही शेतातून पाणी आणावे लागत होते. ढिसाळ नियोजनामुळे आम्हाला वर्षानुवर्षे त्रास सहन करावा लागला. आता समस्या सुटल्याने मोठा दिलासा मिळाला.

**शोभा पाटील, गृहीणी**

# सिंदी पोलीस ठाण्यातच तुफान राडा

## भाजप शहराध्यक्षासह दोन्ही गटांतील आरोपींना बेड्या; पोलिसांचा लाठीचार्ज

**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम :** येथे जुन्या वादातून दोन गटांमध्ये झालेल्या तुफानी हाणामारीने बुधवारी रात्री शहरात मोठी खळबळ उडाली. विशेष म्हणजे हा वाद थेट सिंदी पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचला आणि पोलीस स्टेशनच्या आवारातच दोन्ही गट पुन्हा आमनेसामने आल्याने तुफान राडा झाला. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे पाहून पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागला. या प्रकरणात सिंदी शहर भाजप अध्यक्ष अमोल गवळी यांच्यासह दोन्ही गटांतील आरोपींना अटक करण्यात आली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, चिचघाटपुरा परिसरात आकाश गवळी आणि अक्षय डफ यांचा सागर बाबरे याच्यासोबत जुन्या वादातून संघर्ष झाला. त्यानंतर सागरने त्याचे भाऊ सौरभ आणि तेजस बाबरे यांना बोलावून घेतले. काही वेळातच दोन्ही गटांत जोरदार हाणामारी झाली. या झटापटीत चाकूचा वापर झाल्याने अक्षय डफ गंभीर जखमी झाला, तर तेजस बाबरे याच्यावरही वार करण्यात आले.

घटनेनंतर दोन्ही गट तक्रार देण्यासाठी सिंदी पोलीस ठाण्यात पोहोचले. मात्र तिथेही संताप अनावर झाल्याने पुन्हा धिंगाणा झाला. ठाणेदार नरेंद्र निस्वादे, उपनिरीक्षक ओम कलेगुरवार आणि पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली.

पोलिसांनी दोन्ही बाजूंनी गुन्हे दाखल केले आहेत. सागर, सौरभ आणि तेजस बाबरे यांच्यासह भाजप शहराध्यक्ष अमोल गवळी, आकाश गवळी आणि अक्षय डफ यांना अटक करण्यात आली आहे. दरम्यान, गंभीर जखमी झालेल्या तेजस बाबरे याच्यावर सावंगी येथील रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली असून, त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे सिंदी शहरात तणावपूर्ण शांतता असून, पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे.

# सिंदी नगरपरिषदेत 'पतीराज'चा सुळसुळाट

**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम :** नगरपरिषदेत लोकशाहीचा कारभार चालतो की 'पतीराज', असा प्रश्न आता नागरिक विचारू लागले आहेत. नगराध्यक्षा राणी स्नेहल कलोडे यांच्या पती स्नेहल कलोडे हे नगरपरिषदेच्या प्रशासकीय कामात थेट हस्तक्षेप करत असल्याचा गंभीर आरोप समोर आला असून, या प्रकरणाने सिंदीच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

सिंदी येथील जागरूक नागरिक सुनील उदारामजी शेंडे यांनी वर्ध्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल करत, नगराध्यक्षांच्या पतीकडून अधिकारांचा सर्रास गैरवापर होत असल्याचा आरोप केला आहे. विशेष म्हणजे या आरोपांना सोशल मीडियावरील एका पोस्टमुळेच पुष्टी मिळाल्याचे सांगितले जात आहे.तक्रारीनुसार, गेल्या अनेक दिवसांपासून स्नेहल कलोडे हे नगरपरिषद कार्यालयात ठाण मांडून बसतात. नगराध्यक्षांच्या दालनात बैठका घेणे, अधिकाऱ्यांशी चर्चा करणे आणि परस्पर निर्णय घेणे असे प्रकार उघडपणे सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. धक्कादायक बाब म्हणजे १३ मे २०२६ रोजी घरकुल विभागाचे अधिकारी रामटेके यांच्या उपस्थितीत त्यांनी थेट शासकीय फाईल्स हाताळल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या कथित बेकायदेशीर बैठकीचे फोटो आणि व्हिडिओ एका स्थानिक कार्यकर्त्याने सोशल मीडियावर अभिमानाने व्हायरल केले. सोनामाता पिपरा रोड येथील लोकांना पट्टे मिळावे यासाठी नगरपरिषद कार्यालयात अधिकाऱ्यांसोबत आमचे नेते स्नेहल कलोडे गहन चर्चा करताना... असा मजकूर टाकत संबंधित पोस्ट प्रसारित करण्यात आली. आता हीच पोस्ट 'उघड कबुली' ठरत असल्याची चर्चा रंगली आहे.

# थेंबासाठी मोई तांड्याची फरफट; अखेर जिल्हाधिकाऱ्यांची दखल

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील मोई तांडा गावात भीषण पाणीटंचाईने नागरिकांचे जगणे अक्षरशः असह्य झाले असून, पाण्याच्या प्रत्येक थेंबासाठी ग्रामस्थांना वणवण भटकंती करावी लागत आहे. गावातील महिला, शेतकरी आणि नागरिकांची वाढती गैरसोय पाहता अखेर जिल्हाधिकारी सी. वान्मथी सी यांनी या गंभीर प्रश्नाची दखल घेतली आहे.

मोई तांड्यातील बिकट परिस्थिती लक्षात घेऊन माजी सरपंच किसन महाराज चव्हाण, आमदार सुमित वानखेडे तसेच माजी जिल्हा परिषद सदस्य छाया घोडीले यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेत गावातील पाणीटंचाईची वस्तुस्थिती प्रशासनासमोर मांडली. यावेळी नागरिकांना तातडीने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करावा, त्वरित टँकर सुरू करावेत आणि कायमस्वरूपी जलयोजना राबवावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली.

'डिजिटल इंडिया'चा फुगा फुटला

# वर्धा आरटीओत दोन महिन्यांपासून 'नेटबंदी'ने वाहनधारक हैराण

**वर्धा जनमाध्यम :** राज्य शासन एका बाजूला 'डिजिटल इंडिया'च्या नावाने मोठमोठ्या घोषणा करत असताना, दुसऱ्या बाजूला वर्धा येथील आरटीओ कार्यालयातील भोंगळ कारभारामुळे सामान्य वाहनधारकांचे अक्षरशः हाल होत आहेत. तब्बल दोन महिन्यांपासून इंटरनेट सेवा ठप्प असल्याने वाहनधारकांची प्रचंड फरफट सुरू असून, रोज नवे कारण सांगून नागरिकांना परत पाठविण्याचा प्रकार सुरू असल्याने संतापाची लाट उसळली आहे.

शहरापासून सुमारे पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या सालोड येथील आरटीओ कार्यालयात नागरिक ४७ अंश तापमानात जीवाची पर्वा न करता पोहोचतात; मात्र कार्यालयात गेल्यावर नेट बंद आहे, सर्व्हर डाऊन आहे, अधिकारी आलेले नाहीत अशी ठरलेली कारणे देत वाहनधारकांना रिकाम्या हाताने परत पाठविले जात असल्याचा आरोप होत आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, काही कर्मचारी वाहनधारकांच्या वैयक्तिक मोबाईल इंटरनेटचा वापर करून कामे करत असल्याचे प्रकार समोर आले आहेत. शासनाच्या महत्त्वाच्या कार्यालयात अधिकृत इंटरनेट व्यवस्था कोलमडलेली असताना नागरिकांच्या मोबाईल डेटावर सरकारी कामे सुरू असल्याने प्रशासनाचा निष्काळजी आणि ढिसाळ कारभार उघड झाला आहे.



लायसन्स नूतनीकरण, वाहन हस्तांतरण, फिटनेस तपासणी, कर भरणा, परवाने यांसारख्या अत्यावश्यक कामांसाठी नागरिकांना रोज हेलपाटे मारावे लागत आहेत. अनेक जण दिवसभर उन्हात उभे राहूनही काम न झाल्याने संतप्त होत आहेत. वृद्ध, महिला आणि ग्रामीण भागातून येणाऱ्या वाहनधारकांची अवस्था तर अधिकच बिकट झाली आहे.

ऑनलाईन यंत्रणा कोलमडली, अधिकारी बेफिकीर आणि जनता भर उन्हात भरडली, अशी संतप्त प्रतिक्रिया वाहनधारकांकडून व्यक्त केली जात आहे. दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या या गोंधळाकडे वरिष्ठ प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोपही होत आहे.

दरम्यान, आरटीओ प्रशासनाच्या निष्क्रियतेवर आता गंभीर प्रश्न उपस्थित होत असून, जनतेची ही छळछावणी थांबवणार तरी कोण? असा प्रश्न वाहनधारकांकडून केला जात आहे. इंटरनेट सेवा तातडीने पूर्ववत करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी आता पुढे येत आहे.


**कार्यालय नगर परिषद, हिंगणघाट**
**जिल्हा वर्धा (महा.)-४४२३०१**

Email Id :
hinganghatmc@gmail.com
Fax No./Phone No.07153-244031

पत्र क्र.नपहिं/करवि/कावि-१५/२०२६
दिनांक २१.०५.२०२६

## जाहीर सुचना

हिंगणघाट शहरातील सर्व भाजीपाला विकेते तसेच व्यावसायिकांना सुचित करण्यात येते की, नगर परिषद कार्यालय हिंगणघाट अतर्गत शहरातील आठवडी बाजार येथील नगर परिषद मालकीचे अल्प प्रमाणात ओटे उपलब्ध असून सदर ओटे आपणास हवे असल्यास दिनांक २२.०५.२०२६ ते २८.०५.२०२६ पर्यंत कर विभागामध्ये आपली नोंदणी फी चा भरणा करुन घ्यावे. ओट्या संबंधित उपलब्ध असणारे ओटे यांची यादी नगर परिषद कार्यालयात नमुद दिनांकास पहावयास मिळेल.

| कामाचे नांव | नोंदणी प्रवेश फॉर्म फी रक्कम | विना परतावा रक्कम |
|---|---|---|
| आठवडी बाजार मधील ओटे भाजीपाला व ईतर व्यवसाया-करीता आर्थिक वर्ष २०२६-२७ पर्यंत उपलब्ध करुन देणे | ५००/- | १००००/- |

उपरोक्त अन्वये ओटे संबंधित एका ओट्याकरीता जास्त अर्जदार उपलब्ध झाल्यास ड्रॉ पदतीने विड्रॉल केला जाईल. तसेच इतर अटी शर्ती वरील नमुद दिनांकास नगर परिषद कार्यालय कर विभागामध्ये पहावयास मिळतील. तसेच नोंदणी फॉर्म प्रवेश फी भरणा करुन कर विभागातून उपलब्ध करुन घ्यावे.

ओटे देण्याची तारीख - २९.०५.२०२६ दुपारी १२.०० वाजता

ज्या व्यावसायिकांना ओटे देण्यात येतील त्यांनी करारनामा करुन तात्काळ त्याच दिवशी विना परतावा रक्कम भरणे आहे.

**स्वा/-**
**मुख्याधिकारी गट-अ,**
**नगर परिषद, हिंगणघाट**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

# मदरसांमध्ये ‘वंदे मातरम’ बंधनकारक

## पश्चिम बंगाल राज्य सरकारचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली** -पश्चिम बंगाल मधील ममता बॅनर्जी यांच्या सत्तापालटानंतर मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने राज्यात एकापाठोपाठ एक मोठे निर्णय घेण्यास सुरुवात केली आहे. शाळांमध्ये ‘वंदे मातरम’ गीत अनिवार्य केल्यानंतर, आता राज्य सरकारने हा निर्णय आणखी पुढे नेत राज्यातील सर्व मान्यताप्राप्त मदरसांमध्येही राष्ट्रीय गीत गायन बंधनकारक केले आहे.

मदरसा शिक्षण संचालनालयाने जारी केलेल्या अधिकृत आदेशानुसार, अल्पसंख्याक व्यवहार आणि मदरसा शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या सर्व अनुदानित, विनाअनुदानित आणि मान्यताप्राप्त मदरसांमध्ये सकाळच्या प्रार्थनेच्या वेळी ‘वंदे मातरम’चे गायन करणे आता सक्तीचे असेल. वर्ग सुरू होण्यापूर्वी सर्व विद्यार्थ्यांना हे गीत गावे लागेल.

**शाळांनंतर आता मदरसांमध्ये अंमलबजावणी**

गेल्याच आठवड्यात राज्य सरकारने शालेय शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या सर्व शाळांमध्ये ‘वंदे मातरम’च्या सर्व सहा कडव्यांचे गायन अनिवार्य केले होते.



त्यापाठोपाठ आता अवघ्या काही दिवसांतच मदरसांसाठीही हाच नियम लागू करण्यात आला आहे. मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी सोशल मीडियाद्वारे या निर्णयाची माहिती दिली. ‘जुने नियम बाजूला करून, तात्काळ सर्व शाळा आणि मदरसांमध्ये सकाळच्या सत्रात वर्ग सुरू होण्यापूर्वी वंदे मातरम गायन बंधनकारक करण्यात आले आहे,’ असे एका परिपत्रकाव्दारे सरकारने स्पष्ट केले आहे.

**निर्णय चर्चेत आणि वादात का?**

याच वर्षी फेब्रुवारी महिन्यात केंद्र सरकारने ‘वंदे मातरम’ या राष्ट्रीय गीताला राष्ट्रगीत ‘जन गण मन’ च्या बरोबरीचा दर्जा दिला होता. त्यानंतर सरकारी कार्यक्रम आणि शाळांमध्ये हे गीत बंधनकारक करण्यात आले. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा मुद्दा राजकीय दृष्ट्या चांगलाच तापला होता.

‘वंदे मातरम’ हे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील एक अत्यंत महत्त्वाचे आणि ऊर्जा देणारे गीत राहिले आहे, मात्र मदरसांमध्ये याच्या सक्तीवरून आता नव्या राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

**इतर राज्यांमध्येही वाद**

फक्त पश्चिम बंगालच नाही, तर दक्षिण भारतातील तामिळनाडू आणि केरळसारख्या राज्यांमध्येही ‘वंदे मातरम’वरून अलीकडेच मोठे वाद पाहायला मिळाले होते.

त्यामध्ये तामिळनाडूचे मुख्यमंत्री जोसेफ विजय यांच्या शपथविधी कार्यक्रमात वंदे मातरमचे पूर्ण व्हर्जन वाजवल्याने द्रमुकने त्यांच्यावर टीका केली होती. केरळमध्ये एका शपथविधी सोहळ्यात हे गीत वाजवल्याने डाव्या पक्षांनी नाराजी व्यक्त केली होती, ज्यावर भाजपने कम्युनिस्ट पक्षांवर भारतीय संस्कृतीला विरोध करत असल्याचा आरोप केला होता.

# अमेरिका-इराण संघर्ष चिघळणार?

**नवी दिल्ली** - इराणबरोबर शांतता करार अंतिम टप्प्यात असल्याचा दावा करणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांना धक्का देणारी एक बातमी समोर आली आहे. अण्वस्त्र कार्यक्रमावरुन सुरु असणाऱ्या वाटाघाटीतील कळीचा मुद्दा असलेल्या युरेनियमवर इराणने भूमिका स्पष्ट केली आहे. देशातील संवर्धित युरेनियमचा साठा इराणमध्येच राहिला पाहिजे, असे स्पष्ट आदेश सर्वोच्च नेते मोजतबा खामेनी यांनी दिले आहेत. अण्वस्त्र निर्मितीसाठी युरेनियम अतिशय महत्वाचा मानला जातो आणि इराण सध्या शस्त्रास्त्र दर्जाच्या जवळपास पोहोचल्याने संवर्धित युरेनियम इराणमध्ये ठेवण्याची भूमिका मोजतबा यांनी घेतल्याचे वृत्त रॉयटर्सने दिले आहे.

**युरेनियमबाबत मोजतबा यांनी स्पष्ट केली भूमिका**

अमेरिका आणि इराण यांच्यात सुरु असलेल्या शांतता चर्चेत इराणचा आण्विक कार्यक्रम हा महत्वाचा मुद्दा आहे. इराणकडे कधीच अण्वस्त्र असू नये अशी




## इराणला भविष्यातील हल्ल्याची भीती

अमेरिकेची भूमिका आहे. शिवाय इराणकडे असणारा संवर्धित युरेनियमचा साठा देखील आपल्याकडे सुपूर्द केला जावा अशी मागणी अमेरिकेने केली आहे. पण, मोजतबा यांनी युरेनियमचा साठा देशाताच राहावा अशी भूमिका घेतल्याने दोन्ही देशांच्या चर्चेत पुन्हा गुंतागुंत वाढल्याचे चित्र निर्माण झाले आहे. दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणमधून संवर्धित युरेनियमचा साठा हटवला जाईल अशी हमी दिल्याची माहिती इस्त्रायली अधिकाऱ्यांनी रॉयटर्सला दिली आहे.

इराणकडे युरेनियमचा साठा असल्याचा दावा वारंवार अमेरिका आणि इस्त्रायलकडून केला जात आहे. इराण गेल्या काही वर्षांपासून युरेनियमच्या संवर्धनाचे काम करत आहे. दरम्यान, आता इराण या युरेनियमच्या मदतीने अण्वस्त्र निर्मितीच्या जवळ पोहोचल्याचा दावा केला जात आहे. इराणच्या अण्वस्त्र निर्मिती क्षमतेबाबत वारंवार विविध दावे केले जातात. इराणने ६० टक्क्यांपर्यंत युरेनियम संवर्धन केल्याचा दावा करण्यात आला आहे. पण, इराणने सातत्याने अण्वस्त्र निर्मितीचे दावे फेटाळून लावले आहेत.

युरेनियमचा साठा इराणमधून हटवला जात नाही तोपर्यंत युद्ध समाप्त होणार नाही, असे इस्त्रायलचे पंतप्रधान बिन्यामीन नेत्यानाहू यांनी वारंवार स्पष्ट केले आहे. याशिवाय इराणने त्यांना मदत करणाऱ्या बंडखोरांना पाठिंबा देणे बंद करावे तसेच, क्षेपणास्त्र कार्यक्रमही रद्द करावा, या मागणीवर नेतान्याहू ठाम आहेत. इराणी सूत्रांच्या हवाल्याने रॉयटर्सने प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार, संवर्धित युरेनियम देशातच ठेवण्याच्या मोजतबा खामेनी स्पष्ट सूचना दिल्या आहेत. युरेनियम दुसऱ्या देशाकडे सोपवला तर भविष्यात अमेरिका-इस्त्रायकडून हल्ल्याचा धोका कायम राहतो, असे सूत्रांनी रॉयटर्सला सांगितले.

शांतात चर्चा प्रगतीपथावर असल्याचा दावा ट्रम्प यांच्याकडून केला जात दरम्यान, दोन्ही देशांकडून एकमेकांवर हल्ला करण्याची धमकी देखील दिली जात आहे. अमेरिका नव्याने हल्ला करण्याची तयारी करत असल्याची भीती इराणकडून व्यक्त केली जात आहे.

# कर्जमाफी कधी करणार? मुख्यमंत्र्यांनी तारीख सांगितली

**मुंबई** : राज्य सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी नेमकी कधी होणार याची तारीख आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सांगितली आहे. येत्या ३० जून पूर्वी सर्व शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. त्यामुळे पुढच्या हंगामासाठी या शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा असेल, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. तसेच राष्ट्रीयकृत बँकांनी त्यांचे कृषी संदर्भातील ८० टक्के कर्जवितरणाचे टार्गेट पूर्ण करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

राज्य सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफीची योजना जाहीर केली आहे. पण ती नेमकी कधी होणार याची नेमकी माहिती मात्र समोर आली नव्हती. त्यावरून शेतकरी आणि बँकांमध्ये संभ्रमाची स्थिती निर्माण झाली होती. तसचे



विरोधकांनीही सरकारवर टीका सुरू केली होती. त्यानंतर ही कर्जमाफी ३० जूनच्या आधी करण्याची मोठी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली.

राज्याच्या खरीप हंगामाची पूर्वतयारीची बैठक घेतली. त्या आधी बँकर्ससोबत कर्जवाटपा संदर्भात बैठक झाली. त्यामध्ये अधिकाधिक शेतकऱ्यांना कर्ज कसं मिळेल यांची तजवीज करण्यात आली. जिल्हा सहकारी आणि ग्रामीण बँक मिळून ६७ टक्के कर्ज दिलं जातं तर २६ टक्के कर्ज हे इतर राष्ट्रीयकृत बँकांकडून देण्यात येतय. परंतु राष्ट्रीयकृत बँकांकडून त्यांचे ८० टक्के कर्जवितरणाचं टार्गेट पूर्ण होत नाही, ते त्यांनी पूर्ण केलं पाहिजे.

कर्जाचं वाटप करताना शेतकऱ्यांकडून सीबील स्कोअरची मागणी करू नये, त्यांची कसलीही अडचण करू नये असे निर्देश देण्यात आले आहेत. सगळ्या बँकांसोबत कर्जमाफी संदर्भात चर्चा केली आहे.

कर्जमाफीची माहिती कोणत्या फॉरमॅटमध्ये द्यायची याची चर्चा झाली आहे. वेळेत कर्जमाफी पूर्ण करू शकू याचं नियोजन केलं आहे.

सर्वात मोठं संकट हे एल निनोचं आहे. पावसाचा अंदाज ८८ टक्के वर्तवण्यात आला आहे. उतरत्या क्रमाने पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

# एकनाथ शिंदेंचा पुन्हा भाजपला धक्का

## भाजपचे महापालिकेतील ठराव नगरविकास खात्यामार्फत रद्द करण्याच्या हालचाली

**भाईंदर** - मिरा-भाईंदर महा पालिकेत भाजपकडून बहुमताच्या जोरावर मंजूर करण्यात येणाऱ्या निर्णयांना नगरविकास विभागामार्फत स्थगिती अथवा रद्द करण्याच्या हालचाली सुरू असल्याने भाजपमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. नगरविकास मंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्तक्षेपामुळे भविष्यात भाजप-शिवसेना शिंदे गटातील वाद अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मिरा-भाईंदर महापालिकेत भाजपची एकहाती सत्ता असताना शिवसेना शिंदे गटाला स्थानिक पातळीवर मोठी पीछेहाट झाली आहे.यामुळे शहरातील राजकीय घडामोडींमध्ये भाजप आमदार नरेंद्र मेहता आणि मंत्री प्रताप सरनाईक यांच्यातील संघर्ष अधिक वाढला आहे. स्थानिक पातळीवरील या वादाचे पडसाद आता राज्य पातळीवर उमटू



लागल्याचे चित्र आहे.भाजपकडून महासभेत मंजूर करण्यात येणारे काही ठराव हे शिवसेना शिंदे गटाशी संबंधित पदाधिकारी व संस्थांना लक्ष्य करणारे आहे.त्यामुळे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी थेट यामध्ये हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली आहे.

नुकतेच मिरा रोड येथील टाऊन पार्कचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. महापालिकेने ‘बांधा-वापरा-हस्तांतरित करा’ तत्त्वावर हे उद्यान खासगी कंत्राटदाराला दिले होते.

सध्या या प्रकल्पाचे संचालन शिवसेना शिंदे गटाशी संबंधित स्थानिक नेत्यांकडून केले जात असल्याचे सांगितले जाते. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम झाल्याचा तसेच महापालिकेशी झालेल्या कराराचे उल्लंघन झाल्याचा आरोप भाजपकडून करण्यात आला होता. महापालिका निवडणुकीत भाजपने हा मुद्दा आक्रमकपणे मांडला होता.

सत्तेत आल्यानंतर भाजपने महासभेत ठराव मंजूर करून संबंधित कंत्राटदाराचा करार रद्द करण्याची तसेच अनधिकृत बांधकाम हटविण्याची मागणी केली होती. मात्र, या निर्णयाविरोधात संबंधित शिवसेना नेत्यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे धाव घेतल्याची माहिती आहे. त्यानंतर नगरविकास विभागाला या ठरावाबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे सांगितले जात आहे. तसेच या प्रकरणी सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेशही महापालि केला देण्यात आले आहेत.

# संक्षिप्त

## सुनेचा ८ वेळा गर्भपात केला

**नाशिक**- प्रेमविवाह केल्यानंतरही ’जात’ वेगळी असल्याच्या कारणावरून एका विवाहितेचा शारीरिक आणि मानसिक छळ केल्याची घटना नाशिकमध्ये उघडकीस आली आहे. ‘तू आमच्या जातीची नाहीस,’ असे टोमणे मारत सासरच्या मंडळींनी विवाहितेचा मानसिक व शारीरिक छळ केला, तसेच तिचा तब्बल ८ वेळा गर्भपात घडवून आणल्याचा धक्कादायक आरोप आहे. या छळाला कंटाळून अखेर पीडित महिलेने न्यायासाठी पोलिसांचे दार ठोठावले असून, नाशिकच्या म्हसरूळ पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## सोने दरवाढीची हॅट्रिक!

**नवी दिल्ली** - राष्ट्रीय राजधानी दिल्लीत सोन्याच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. गुरुवारी सलग तिसऱ्या दिवशी दरात वाढ नोंदवली गेली, सोन्याच्या दरात २७०० रुपयांची वाढ झाली. दुसरीकडे, सलग दोन दिवसांच्या घसरणीनंतर चांदीच्या दरातही वाढ झाली असून, चांदीचा भाव पुन्हा २,७०,००० रुपयांच्या वर गेला आहे. तज्ज्ञांच्या मते, सोने आणि चांदीच्या दरात चढ-उतार होऊ शकतो. .भू-राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर मौल्यवान धातूंबाबत व्यापारी सावधपणे आशावादी राहिल्याने, राष्ट्रीय राजधानीत गुरुवारी सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम सोन्याच्या दरात ६०० रुपयांची वाढ होऊन १ लाख ६५ हजार रुपये झाला, तर चांदीचा भाव प्रति किलोग्राम २ लाख ७१ लाख रुपयांवर पोहोचला. स्थानिक बाजार तज्ज्ञांच्या मते, ९९.९ टक्के शुद्धतेच्या सोन्याचा भाव (सर्व करांसहित) ६०० रुपयांनी वाढून प्रति १० ग्रॅम १६५५०० रुपये झाला असून, ही सलग तिसऱ्या सत्रातील वाढ आहे.



# सातपुते-निंबाळकर थेट रेसच्या बाहेर?

**सोलापूर:** विधान परिषदेच्या निवडणुकीच कार्यक्रम जिल्हा धिकारी कार्तिकेयन यांनी बुधवारी जाहीर केला आहे. निवडण कीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यात भाजपमध्ये उमेदवारी साठी जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. जिल्ह्याला एक जागा मिळण्याचे निश्चित मानले जात असून पक्षाच्या नव्या धोरणामुळे अनेक नवे चेहरे चर्चेत आले आहेत. भाजपकडून यावेळी विधानसभा किंवा लोकसभा न लढविलेल्या उमेदवारांना संधी देण्याचा विचार सुरू आहे. मात्र तगड्या उमेदवाराना संधी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.भाजपकडून जातीय समतोल साधण्याचाही प्रयत्न केला जात आहे.सध्या सोलापूर जिल्ह्यातून काही प्रमुख नावांची चर्चा रंगली आहे. यामध्ये , प्रशांत परिचारक, राजन पाटील आणि प्राध्यापक शिवाजी सावंत, शहाजी पवार, रोहन देशमुख, बार्शीचे माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू आहे. भाजपच्या या नावांपैकी एकाला उमेदवारी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# दोन दिवसांपूर्वी पार्थ पवारांची भेट

## पुढील निवडणुकीपर्यंत पीके यांचा प्लान सेट

**पाटणा:** जनसुराज पक्षाचे संस्थापक आणि राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी दोनच दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार पार्थ पवार यांची मुंबईत भेट घेतली.

प्रशांत किशोर राष्ट्रवादी काँग्रेससाठी रणनीती आखण्याचं काम करतील, अशी चर्चा या भेटीनंतर सुरु झाली. त्यानंतर या भेटीवर पार्थ पवार यांनीच स्पष्टीकरण दिलं. प्रशांत किशोर यांच्याशी आधीपासूनचा परिचय आहे. ते मुंबईत काही कामानिमित्त आले



होते. यावेळी त्यांची भेट झाली, असं स्पष्टीकरण पार्थ पवार यांच्याकडून देण्यात आलं. यानंतर आता प्रशांत किशोर यांनी अतिशय महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

प्रशांत किशोर राष्ट्रवादी काँग्रेससाठी चाणक्य म्हणून काम करतील, अशी चर्चा असताना किशोर यांनी बुधवारी महत्त्वाचा निर्णय जाहीर केला. आपण पाटण्याच्या बाहेरील एका आश्रमात गेलो असून तिथूनच आपलं राजकीय कामकाज सुरु ठेवणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

# पुलवामा हल्ल्याचा मास्टरमाइंड ठार

**नवी दिल्ली** -पाकिस्तान मधील मुझफ्फरा बादमधून एक मोठी बातमी समोर आली आहे. पुलवामा हल्ल्याचा मास्टर माइंड आणि दहशतवादी हमजा बुरहान याची अज्ञात व्यक्तींनी गोळ्या झाडून हत्या केली आहे.१४ फेब्रुवारी २०१९ च्या पुलवामा दहशतवादी हल्ल्याशी संबंधित असलेला दहशतवादी हमजा बुरहान याची पाकिस्तान व्याप्त काश्मीरमध्ये गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहिती नुसार, मुझफ्फराबादमध्ये अज्ञात हल्लेखोरांनी हमजा बुरहानला लक्ष्य केले, यामध्ये त्याचा जागीच मृत्यू झाला.


## सिंधुदुर्गात देशातील पहिले अंडरवॉटर म्युझियम साकारणार

**मुंबई :** महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ(एमटीडीसी) मार्फत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील निवती रॉक परिसरात भारतीय नौदलाची सेवानिवृत्त युद्धनौका ’एक्स-आयएनएस गुलदार’ समुद्रतळावर यशस्वीरित्या स्थापित करण्यात आली आहे. देशातील अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि वैशिष्ट्यपूर्ण पाणबुडी पर्यटन प्रकल्प साकार होत आहे. मे. माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड यांच्या समन्वयाने राबविण्यात येणारा हा प्रकल्प भारतीय पर्यटन क्षेत्रासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले असून हा प्रकल्प जागतिक स्तरावर सागरी पर्यटन आकर्षण म्हणून उदयास येणार आहे, अशी माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.



## ३३ व्या वर्षीच तरूणाने मृत्यूला कवटाळले

**कोल्हापूर:** कदमवाडी-पाटोळेवाडी परिसरातील लांबोरे हौसिंग सोसायटी जवळ असलेल्या सिद्धी हेरिटेज हौसिंग सोसायटीच्या अपार्टमेंटच्या सहाव्या मजल्यावरून तरुण अभियंता श्रीकांत सूर्यकांत काटकर (वय ३३) यांनी उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना बुधवारी दुपारी घडली. पोलिसांकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, इमारतीच्या टेरेसवरून सुमारे ७०–७५ फूट उंचीवरून खाली उडी घेतल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर तातडीने रुग्णालयात नेले मात्र त्यापूर्वीच मृत्यू झाल्याचे प्राथमिक वैद्यकीय तपासणीत नमूद करण्यात आले आहे.



## वैभवने जगातील सर्व दिग्गज फोडले


**मुंबई :** यंदाच्या आयपीएलमध्ये १५ वर्षाच्या वैभव सूर्यवंशी याने सर्वांचीच मने जिंकली आहेत.पठ्ठ्याने जसप्रीत बुमराह, जोस हेजलवूड, मिचेल स्टार्क, भुवनेश्वर कुमार अशा एकापेक्षा एक दिग्गज गोलंदाजांना पहिल्या बॉलवर चौकार किंवा षटकार मारला. वैभव याने एकट्याने राजस्थानसाठी पहिल्या सहा ओव्हरमध्ये म्हणजेच पॉवर प्लेमध्ये आक्रमक फलंदाजी करत संघासाठी दमदार सुरूवात करून दिली आहे.



# धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा

**नवी दिल्ली :** अभिजीत दीपके यांच्या कॉकरोच जनता पार्टीनं केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. नीट यूजी पेपरफुटी प्रकरणात लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी देखील धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. आता सोशल मीडियावर चर्चेत असलेल्या कॉकरोच जनता पार्टीनं देखील धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

सोशल मीडियावर चर्चेत असलेल्या कॉकरोच जनता पार्टीचं नवं एक्स अकाऊंट कॉकरोच इज बॅक या नावानं सुरु करण्यात आलं आहे. अभिजीत दीपके यांनी नवं एक्स खातं सुरु केल्याची माहिती दिली आहे. या पार्टीच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरील




कॉकरोच जनता पार्टीची पहिली राजकीय मागणी

खात्यावरुन केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली आहे. सध्या नव्या प्लॅटफॉर्मचे फॉलोअर्स ४३.६ हजारांवर पोहोचले आहेत. अभिजीत दीपके संस्थापक असलेल्या कॉकरोच जनता पार्टीच्या नव्या खात्यावरील तिसऱ्याच पोस्टमध्ये धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा मागण्यात आला आहे.

नीट यूजी परीक्षा ३ मे रोजी पार पडली होती. त्या परीक्षेचा पेपर फुटल्यानं परीक्षा रद्द करण्यात आली आहे. आता नीट यूजी परीक्षा २१ जून रोजी आयोजित करण्यात आली आहे. नीट परीक्षेतील गोंधळावरुन लोकसभेतील विरोधीपक्षनेते राहुल गांधी यांनी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला जाणार नसेल तर त्याची जबाबदारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घ्यावी, असं राहुल गांधी म्हणाले होते.

# ‘राजकारणात आहात तर मग...’

## भाजप खा. राघव चड्डा यांना उच्च न्यायालयाकडून धक्का

**नवी दिल्ली** - भाजप खासदार राघव चड्डा यांना दिल्ली उच्च न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. व्यक्तिमत्व हक्कांच्या खटल्यात उच्च न्यायालयाने अंतरिम दिलासा देण्यास नकार दिला आहे. न्यायालयाने स्पष्टपणे म्हटले आहे की, राजकीय नेत्यांवरील टीका, उपहास किंवा टीका करणे हा लोकशाहीचा अविभाज्य भाग आहे आणि केवळ ते आवडत नाहीत किंवा त्यामुळे अस्वस्थता येते म्हणून ते थांबवता येणार नाही.

राजकीय व्यक्तीने घेतलेल्या निर्णयांवर टीका होणे सामान्य

उच्च न्यायालय एका याचिकेवर सुनावणी करत होते, ज्यामध्ये राघव चड्डा यांनी आरोप केला होता की सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर त्यांचा फोटो, नाव



आणि ओळखीचा गैरवापर केला जात आहे. याचिकेत म्हटले आहे की, राजकीय पक्ष बदलल्यामुळे त्यांच्या विरोधात सोशल मीडियावर एक पद्धतशीर मोहीम सुरू करण्यात आली आणि त्यांची प्रतिमा मलीन केली जात आहे. दिल्ली उच्च न्यायालयात न्यायमूर्ती सुब्रमणियम प्रसाद या प्रकरणाची सुनावणी करत होते. आपल्या तोंडी टिप्पणीत ते म्हणाले की, राजकीय व्यक्तीने घेतलेल्या निर्णयांवर टीका होणे सामान्य आहे आणि ते सार्वजनिक क्षेत्रात आहेत.

सुनावणीदरम्यान, न्यायालय ााने म्हटले की हा व्यक्तिमत्व हक्कांचा खटला नाही. जर कोणाला वाटत असेल की त्यांची प्रतिमा मलीन झाली आहे, तर ते मानहानीचा खटला दाखल करू शकतात. सुनावणीदरम्यान, उच्च न्यायालयाने देशाचे प्रसिद्ध व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांचाही उल्लेख केला. उदाहरणे देत ते म्हणाले की, स्वातंत्र्यापासून राजकीय व्यंग आणि व्यंगचित्रे हे लोकशाही चर्चेचा भाग राहिले आहेत. पूर्वी डिजिटल प्लॅटफॉर्म अस्तित्वात नव्हते, पण आता ते आहेत, त्यामुळे टीका डिजिटल प्लॅटफॉर्मवर दिसून येते.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## करारांची फलनिष्पत्ती?

होर्मुझच्या सामुद्रधुनीवरून जगभरात अस्वस्थता आहे. काल-परवापर्यंत आखातात अस्थिरता निर्माण झाल्यास इंधनाचे दर भडकतात इथपर्यंतचा विचार केला जात होता. पण होर्मुझची सामुद्रधुनी बंद करून तेलपुरवठा खंडितही होऊ शकतो, हे यंदाच्या इराण-अमेरिका संघर्षाने जगाला दाखवून दिले. यातून धडा घेत केंद्र सरकारने ऊर्जासुरक्षेकडे सर्वाधिक लक्ष देण्यास प्रारंभ केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सध्या सुरू असलेला पाच देशांचा दौरा यादृष्टीने मोलाचा ठरला आहे. विशेषतः या दौऱ्याची सुरुवात ज्या संयुक्त अरब आमिरातीपासून झाली, तेथील अवघ्या दोन-अडीच तासांच्या भेटींमध्ये राष्ट्राध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांच्यासोबत एकूण सात महत्त्वाचे करार करण्यात आले. यातील इंडियन स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम रिझर्व्हज लिमिटेड आणि अबुधाबी नॅशनल ऑईल कंपनी म्हणजेच ॲडनॉक यांच्यात धोरणात्मक सहकार्यासाठी झालेला करार भारताच्या इंधनचिंता बऱ्याच प्रमाणात दूर करणारा आहे. या करारानुसार यूएई भारताच्या धोरणात्मक तेल साठ्यांमध्ये ३ कोटी बॅरल्स खनिज तेलाची साठवणूक करणार आहे. यामध्ये विशाखापट्टणम येथील केंद्रासह ओडिशातील चंडीखोल येथील प्रस्तावित साठवणूक केंद्राचा विकास केला जाईल. तसेच यूएईमधील फुजैराह येथेही भारतासाठी खनिज तेल साठवण्यावर संमती झाली. यामुळे होर्मुझ सामुद्रधुनीतील तणावाच्या काळात भारताला थेट इंधन पुरवठा उपलब्ध होऊ शकेल. सध्या भारताकडे विशाखापट्टणम, मंगळुरू आणि पादुर येथे एकत्रितपणे ५.३ दशलक्ष टन तेल साठा करण्याची क्षमता आहे. आता एकूण साठ्यात ४० लाख टनांहून अधिक कच्च्या तेलाची भर पडणार आहे. भारतात प्रतिदिन तेलाची मागणी सुमारे ६० लाख बॅरल इतकी आहे. देशातील तेल कंपन्यांकडे सामान्यतः ६४ दिवसांचा साठा उपलब्ध असतो. यूएईने देऊ केलेल्या अतिरिक्त तेलामुळे एकूण साठवणूक क्षमतेत आणखी १२ ते १३ दिवसांची भर पडणार आहे. यामुळे संकटकाळात भारत अधिक काळ सुरक्षित राहू शकेल. काही दिवसांपूर्वी यूएईने ओपेक आणि ओपेक प्लस या प्रमुख तेल उत्पादक राष्ट्रांच्या संघटनांमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. तेल उत्पादनावर निर्बंध यूएईला नको आहेत. त्यांना जास्तीत जास्त तेल उत्पादन करून त्यातून येणारा पैसा नव्या क्षेत्रांमध्ये गुंतवायचा आहे. ही बाब भारताच्या पथ्यावर पडणारी आहे. याखेरीज एलपीजीच्या दीर्घकालीन पुरवठ्याबाबत झालेल्या करारामुळे स्वयंपाकाच्या गॅस पुरवठ्याबाबत भक्कम आधार मिळणार आहे. सध्या भारताच्या एकूण एलपीजी आयातीपैकी ४० टक्के पुरवठा यूएईमधून होतो. नव्या करारामुळे जागतिक बाजारपेठेतील किमतींच्या धक्क्यांपासून भारतीय ग्राहकांचे रक्षण शक्य होणार आहे. याव्यतिरिक्त यूएईने भारतात ५ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीची घोषणा केली. संरक्षण, सागरी सहकार्य, जहाजबांधणी आणि प्रगत संगणन यांसारख्या अत्याधुनिक क्षेत्रांमध्येही दोन्ही देशांनी अनेक महत्त्वपूर्ण करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. आर्थिक गुंतवणुकीच्या दृष्टीनेही यूएई भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. अमिरातीतील सार्वभौम निधी आणि मोठ्या गुंतवणूक संस्था भारतातील पायाभूत सुविधा, बंदरे, महामार्ग, ऊर्जा, विमानतळ, लॉजिस्टिक्स आणि डिजिटल तंत्रज्ञान क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करत आहेत. अमिरातीने दीर्घकालीन विकास प्रकल्पांमध्ये दाखवलेला विश्वास आणि गुंतवणुकीमुळे भारतातील रोजगारनिर्मिती, औद्योगिक वाढ आणि पायाभूत विकासाला चालना मिळणार आहे. आतापर्यंत भारत आणि यूएई यांच्यातील संरक्षण सहकार्य हे केवळ लष्करी सराव आणि प्रशिक्षणापुरतेच मर्यादित होते. मात्र, बदलत्या भौगोलिक-राजकीय परिस्थितीचा विचार करता दोन्ही देशांनी 'स्ट्रॅटेजिक डिफेन्स पार्टनरशिप' अंतर्गत तंत्रज्ञान देवाणघेवाण आणि दहशतवादविरोधी लढाईत एकत्र काम करण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेसोबतच्या वादात इराणने दुबई शहराला लक्ष्य केल्यामुळे यूएईचे मोठे आर्थिक नुकसान झाले होते; त्यामुळे हा संरक्षण करार यूएईसाठी अत्यंत मोलाचा ठरणार आहे. एकेकाळी केवळ तेल पुरवठादार राष्ट्र म्हणून पाहिला जाणारा यूएई आज भारतासाठी व्यापार, ऊर्जा, गुंतवणूक, तंत्रज्ञान, संरक्षण, सागरी सुरक्षा आणि पश्चिम आशियातील सामरिक संतुलन या सर्वच क्षेत्रांत अत्यंत महत्त्वाचा भागीदार बनला आहे. पश्चिम आशियातील व्यापारासाठी दुबई हे भारतासाठी एक महत्त्वाचे प्रवेशद्वार मानले जाते. भारतीय वस्त्रोद्योग, रत्नजडित दागिने, अन्नप्रक्रिया, औषधनिर्मिती, अभियांत्रिकी उत्पादने आणि माहिती तंत्रज्ञान सेवा यांना अमिरातीच्या बाजारपेठेत मोठी मागणी आहे. त्याचप्रमाणे भारतालाही तेथून कच्चे तेल, पेट्रोकेमिकल्स, सोने आणि विविध औद्योगिक उत्पादने आयात केली जातात. यूएईमध्ये आजघडीला सुमारे ४० लाख भारतीय नागरिक वास्तव्यास आहेत. तेथील अर्थव्यवस्थेच्या उभारणीत भारतीयांचे मोठे योगदान आहे. यूएई आणि भारताच्या वाढत्या मैत्री संबंधांना आखातातील सत्ता समीकरणांचा एक पदर आहे. सौदी अरेबिया आणि यूएई हे दोन्ही देश एकमेकांचे स्पर्धक आहेत. सौदीने अलीकडेच पाकिस्तानसोबत संरक्षण सहकार्य करार केला. त्याच वेळी यूएईने पाकिस्तानला दिलेली कर्जाऊ रक्कम एकरकमी अदा करण्यासाठी दबाव आणला होता. पाकिस्तानने इस्लामिक 'नाटो' तयार करण्याच्या प्रयत्नांना गती दिली आहे. हे लक्षात घेऊन भारताने यूएई आणि इस्त्रायलसोबत मिळून संपूर्ण आशिया खंडातील सत्तासंतुलन बदलून टाकणारे नवे समीकरण तयार केले. मोदी यांच्या दौऱ्यामुळे या त्रिदेशीय धोरणात्मक आघाडीला बळकटी मिळाली आहे. इजिप्त आणि आफ्रिकेतील अनेक देशांमध्ये यूएईचा मोठा प्रभाव असून त्याचा फायदा भारताला व्यापारी आणि सामरिक संबंध वाढवण्यासाठी होईल. या तिन्ही देशांचे वैयक्तिक अंतराळ कार्यक्रम अत्यंत प्रगत आहेत. आता हे देश संयुक्त अंतराळ मोहिमा आणि उपग्रह तंत्रज्ञानावर एकत्र काम करणार आहेत. यामुळे अंतराळ क्षेत्रात चीन, पाकिस्तान आणि सौदी अरेबियाच्या आघाडीला मोठे आव्हान मिळणार असून आशियात भारताचा दबदबा अधिक वाढणार आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये मैत्री संबंध प्रस्थापित करण्याबाबतच्या मोदी सरकारच्या प्राथमिकता दूरगामी परिणाम करणाऱ्या आहेत, हे लक्षात घ्यायला हवे. यूएई दौऱ्यातील करारांची फलनिष्पत्ती ऊर्जासुरक्षेबाबत तत्काळ दिसून येईल; पण त्याहून अधिक व्यापक फलिते नजीकच्या भविष्यात अनुभवास येतील हे निश्चित.

# सोने आयातीचा फास

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच देशातील जनतेला विशिष्ट खर्चातील काटकसरीचे आवाहन केले आहे. मोदी यांच्या मनातील 'अर्थ' काहीही असला, तरी त्यांच्या आवाहनातील विषयांबाबत वस्तुस्थिती काय आहे, आणि देशाला कोणत्या धोरणाची गरज आहे, याची सखोल चर्चा एकेका मुद्द्याच्या अनुषंगाने करू.**



✍ अजित अभ्यंकर

### सोन्याची खरेदी, परदेशी चलनाचा बोजा

मोदी यांनी असे आवाहन केले आहे की, 'सोन्याची बाजारातील मागणी पूर्ण करण्यासाठी सोन्याची आयात करावी लागते. त्यामुळे परकीय चलन खर्च होते. त्यावर अतिरिक्त बोजा पडू नये, यासाठी सोन्याची खरेदी करू नका.' पण हे सांगणाऱ्या मोदी यांच्या सरकारने जगात सोन्याच्या किमती १० ग्रॅमला १ लाखावर जात असताना, जून २०२४ मध्ये सोन्याच्या आयातीवरील १५ टक्के इतका आयात कर कमी करून तो ६ टक्क्यांवर आणला. इतकेच नव्हे तर दोन महिन्यांपूर्वी फेब्रुवारीमध्ये तो आणखी कमी करून ५ टक्क्यांवर आणला. म्हणजेच सोन्याची आयात स्वस्त केली. त्याचा परिणाम म्हणून भारतातील सोन्याच्या आयातीमध्ये २४ टक्के वाढ झाली. गंमत म्हणजे, मोदींनी आवाहन केल्यानंतर तीन दिवसांनी म्हणजे १३ मे २०२६ रोजी पुन्हा तो कर १५ टक्क्यांपर्यंत वाढविला आहे. जर या वाढीमागील उद्देश सोन्याची आयात कमी करणे हा असेल, तर २०२४ मध्ये हाच कर १५ टक्क्यांवरून सहा टक्क्यांवर खाली आणला, त्याचा उद्देश सोन्याच्या आयातीला उत्तेजन देणे हा होता, असे समजायचे काय ?

हे धोरण अत्यंत विसंगतीपूर्ण असले तरीही आपण सोन्याच्या आयातीबाबत योग्य धोरण कोणते, याची चर्चा करू. सोन्याची आयात हा देशाच्या गळ्याभोवती लागलेला फास आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. त्याची कारणे खालीलप्रमाणे-

सोने म्हणजे देशासाठी घातक बचत आहे. कारण ही बचत कधीच भांडवल म्हणून कोणत्याही उद्योग-उत्पादन-व्यापारात जात नाही. अर्थव्यवस्थेत त्यातून कोणतेही सकारात्मक चक्र सुरू होत नाही. सोन्याचे दागिने बनविणाऱ्या कारागिरांचा अपवाद वगळता कोणताही रोजगार त्यातून निर्माण होत नाही. त्याचा भारतातून सोन्याचे-हिऱ्यांचे दागिने निर्यात होतात, हे खरे; पण त्यापैकी सोन्याच्या दागिन्यांचे (हिऱ्यांचे दागिने वगळून) भारताच्या एकूण निर्यातीमधील प्रमाण दीड टक्काच आहे. तर सोन्याच्या आयातीचे, भारताच्या एकूण आयातीमधील प्रमाण ९ टक्के आहे. २०२५-२६ मध्ये आपण ७१ अब्ज डॉलर म्हणजे ६ लाख ६७ हजार कोटी रुपयांचे सोने आयात केले. सोन्यात होणारी बचत जनतेकडून थेट उद्योगात न जाता अगदी बँका-म्युच्युअल फंड-तत्सम संस्थांमध्ये गेली, तरी त्यातून ती अंतिमतः उद्योगांना दिल्या जाणाऱ्या भांडवलात रूपांतरित होऊ शकते. शिवाय सोन्याच्या आयातीमध्ये जाणारा पैसा हा परदेशात जातो. देशात आलेल्या सोन्यामुळे कोणतेही नवे उत्पादन किंवा रोजगार निर्माण होत नाही. ही बचत जर उद्योग-व्यापारात गुंतवली गेली, तर त्यातून दागिन्यांच्या धंद्यातील रोजगारापेक्षा कित्येक पट अधिक रोजगार आणि उत्पन्न निर्माण होऊ शकेल.

### दुर्मीळ परकीय चलनावर असह्य बोजा

देशात गेली ७ दशके होत असणारी सोन्याची आयातीची गेल्या १० वर्षांची सरासरी सुमारे ८०० टन आहे. देशांतर्गत सोन्याचे उत्पादन अत्यंत नगण्य आहे. म्हणजे सोन्याच्या आयातीच्या तुलनेत पाव टक्कादेखील नाही. गेली काही दशके, सर्व वस्तू आणि सेवांच्या एकूण आयातीमधला सोन्याच्या आयातीचे मूल्य सुमारे आठ टक्क्यांच्या जवळपास आहे, म्हणजे साधारणतः ६ लाख ६७ हजार कोटी रुपये (२०२५-२६) इतके प्रचंड आहे. त्यापेक्षा अधिक हिस्सा हा फक्त आपल्या देशाच्या संपूर्ण इंधनाची गरज भागविणाऱ्या क्रूड तेलाचाच (सुमारे २०-२३ टक्के) आहे. त्याशिवाय होणारी सोन्याची चोरटी आयात वेगळी.

सोन्याच्या आयातीमुळे देशात मुळातच कमी असणाऱ्या परकीय चलनावर अत्यंत अनुत्पादक बोजा गेली कित्येक दशके सातत्याने पडत आलेला आहे.

भारताला मुळातच परकीय व्यापारामध्ये तूट आहे. म्हणजे आपली आयात ही निर्यातीपेक्षा किती तरी जास्त आहे. त्यामध्ये सोन्याच्या आयातीमुळे देशाच्या परकीय चलनसाठ्यावर प्रचंड ताण पडतो. ते परकीय चलन मिळविण्यासाठी देशाला अनेक राजकीय-आर्थिक तडजोडी कराव्या लागतात.

### सोन्यात साठवणूक, करबुडवेगिरीचे धन

सोन्याच्या अतिधोकादायक आणि सतत वाढत्या मागणीचे कारण लग्नात सोन्याचे दागिने करणे हे नसते. तर कर चुकवलेले, भ्रष्टाचारातून मिळवलेले बेकायदा उत्पन्न आणि संपत्ती सुरक्षित ठेवण्याचा तो एक राजमार्ग आहे. त्यामुळेच सोन्याची एवढी प्रचंड मागणी मुख्यतः धनदांडग्या आणि उच्च वर्गाकडून असते. म्हणूनच मोदी सरकार गेली १२ वर्षे हेच धोरण सोन्याच्या आयातीला उत्तेजन देऊन चालवत आहे. केवळ आत्ताच्या काळासाठी नाही, तर सोन्याची आयात कायमसाठीच बंद करायला हवी. हीच बाब १९६० च्या दशकापासून विविध पंतप्रधानांच्या काळात आणलेल्या सुवर्णनियंत्रण कायद्यांमधून अधोरेखित झाली आहे. त्यामध्ये कोणताही सुधारणा करण्याचा विचार १९९० पासून घेतलेल्या तथाकथित उदारीकरणाच्या धोरणातून दिसला नाही. २०१३ मध्ये त्या वेळचे अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी सोन्याची खरेदी करायची नाही, असे निदान एक वर्ष तरी जनतेने स्वतःहून ठरवावे, असे आवाहन केले. होते.

आज पंतप्रधान मोदी सोन्याची खरेदी टाळा, असे आवाहन करत असले, तरी सोन्याच्या आयातीच्या रूपाने देशाच्या गळ्याला फासच लागतो. त्यांना सध्या क्रूडच्या वाढत्या किमती, ढासळणारी निर्यात, यांच्या पार्श्वभूमीवर परकीय चलनाच्या समस्येवर तात्पुरता उपाय काढायचा आहे. धोरणात्मक बदल करण्याचा त्यांचा इरादा नाही, हीच मोठी शोकांतिका आहे.

### सुवर्णरोखे योजना बंद करण्याचा परिणाम

य परकीय चलनावरचा असह्य बोजा कमी करण्यासाठी २०१५ मध्ये सरकारने स्वत:चे सुवर्ण रोखे बाजारात आणले. सोने प्रत्यक्ष आयात न करतादेखील सोन्यामध्ये गुंतवणूक केल्याचा फायदा देण्याचा यात उद्देश होता. परंतु जसे आंतरराष्ट्रीय बाजारात २०२३ पासून अफाट वेगाने किमती वाढू लागल्या. त्यामुळे फेब्रुवारी २०२५ मध्ये ही योजना अधिकृतरीत्या बंद करण्यात आली. आणि सोन्याच्या आयातीवरील करात मोठी कपात करून तो १५ टक्क्यांवरून पाच टक्क्यांवर आणण्यात आला. त्यामुळे आयातीमध्ये किती वाढ झाली, ते सोबतच्या लेखांतील तत्त्यामधून दिसतेच आहे. थोडक्यात, सरकारने स्वतःवरचे ओझे कमी करण्यासाठी, देशाच्या परकीय चलनासमोर मोठे संकट निर्माण करून पूर्वीची समस्या अधिकच मोठी करण्याची घोडचूक केली! (साभार मटा)

## भुसावळ-अजनी मेमू ट्रेन सुरू करावी

शिक्षण, रोजगार आणि व्यवसायासाठी हजारो लोक दररोज अकोला आणि नागपूर दरम्यान प्रवास करतात. तथापि, सध्या अकोला ते अजनी प्रवासासाठी कोणतीही मेमू (मेनलाइन इलेक्ट्रिक मल्टिपल युनिट) ट्रेन उपलब्ध नाही. प्रवाशांना एकतर जास्त भाडे आणि कमी थांबे असलेल्या एक्सप्रेसवर अवलंबून राहावे लागते किंवा बसने प्रवास करावा लागतो. स्थानिक प्रवाशांचे म्हणणे आहे की, या मार्गावर मेमू ट्रेन सुरू केल्यास वेळ आणि पैसा दोन्हीची बचत होईल. प्रवाशांची मागणी आहे की, रेल्वेने या मार्गासाठी दोन पर्यायांचा विचार करावा. अकोला मार्गे नांदेड-नागपूर मेमू – यामुळे मराठवाडा आणि विदर्भातील अनेक शहरे जोडली जातील. ज्यामुळे रोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांना थेट प्रवेश मिळेल. भुसावळ-अजनी मेमू ट्रेन – ही सेवा उत्तर महाराष्ट्राला नागपूरशी जोडेल आणि अकोला व बडनेरासारख्या स्थानकांवरील प्रवाशांना दिलासा देईल. प्रवाशांना दिलासा देण्यासाठी रेल्वे अधिकाऱ्यांनी या मार्गावर लवकरात लवकर मेमू गाड्या सुरू कराव्यात, अशी विनंती करतो.

संवाद

**राजेश पी. कारिया** राधे नगर, अकोला (महा)

## इंधन दरवाढ

आखाती युद्ध संपले तरीसुद्धा विस्कटलेली इंधन पुरवठ्याची स्थिती पूर्वपदावर यायला पुढचे सात महिने जातील असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जातो आहे. भारत सरकारने ही सगळी परिस्थिती विचारत घेऊनच अनेक प्रकारच्या पूर्वतयारीकरिता सुरुवात केलेली आहे. आखाती देशातला इंधन पुरवठा सुखरूप भारतात यावा यासाठी अनेक प्रकारची उपाययोजना केली जात आहे. तरीदेखील मिळणारे इंधन हे पूर्वीपेक्षा जास्त किमतीने मिळत असल्याने त्याचे परिणाम आता भारताच्या इंधन दरावर होऊ लागलेले आहेत म्हणूनच सरकारने आता व्यावसायिक वापराच्या सिलेंडरमध्ये दोनशे रुपयांनी वाढ केलेली आहे. ही वाढ होत असतानाच हवाई प्रवास देखील महाग झालेला आहे हीच परिस्थिती घरगुती गॅसच्या दराला लागू होते. आता सरकारपुढे सिलेंडरच्या किमती वाढवणे हे मोठे संकट नसून इंधन पुरवठा सुरळीत राहणे आणि मिळेल त्या देशांकडून सर्व प्रकारचे इंधन मिळवण्याचा प्रयत्न करीत राहणे हे सर्वात मोठे उद्दिष्ट आहे. अएकाच वेळी दोन प्रकारचा भुर्दंड ग्राहकांना सहन करावा लागतो आहे. इंधन दरात थोडी जरी दरवाढ केली तरीसुद्धा त्याचा वाहतुकीच्या खर्चावर परिणाम होतो. आणि वाहतूक खर्चाचा हा भुर्दंड संबंधित कंपन्या किंवा उत्पादक ग्राहकांच्या खिशातून वसूल करत असतात. परिणामी जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत वाढ झाली आहे. दैंनदिन जीवनामध्ये ज्या ज्या गोष्टी लागतात त्या सर्वच किमती इंधन दरामुळे भडकलेल्या आहेत.

**प्रा. मधुकर चुटे**

## पर्यावरण जागृती व वृक्षांविषयी जिव्हाळा

नवी मुंबई येथे जानेवारी महिन्यात वृक्षाला खिळे मारणे, त्यावर जाहिराती लावणे व ते खराब करणे यावर जानेवारी महिन्यात बंदी घालण्यात आली होती. कायद्याचे उल्लंघन केल्यास रुपये दहा हजाराचा दंड अशी तरतूद करण्यात आली होती तथापि अजूनही कायद्याचे उल्लंघन चालू आहे इतर शहरांची परिस्थिती काही वेगळी नाही आज पुणे, पिंपरी चिंचवड शहरात हीच परिस्थिती कायम आहे लोकांना जाहिराती लावण्यासाठी वृक्ष हेच सुरक्षित ठिकाण आहे काय? सध्या पर्यावरण हे अतिशय महत्वाचे आहे. त्याचे जपणूक करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य अशी असे असताना लोक कायदा का मोडतात? यासाठी लोकांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. श्मुले संवेदनशील असतात. त्यांना योग्य ते समाजविल्यास ते भावी काळात अशा कृत्यांना आळा घालू शकतील नागरिकांना सुद्धा जनजागृतीमुळे फरक पडण्याची शक्यता आहे आज पर्यावरणाचे परिणाम आपण भोगतो आहोत. तापमान मोठ्या प्रमाणात वाढले आहे या गोष्टीला जरा आळा घालवायचा असेल तर आपणास झाडांचे संरक्षण करावे लागेल.

**शांताराम वाघ**

# सौरशक्तीची अनिवार्यता आणि भारत

**आखाती संघर्षामुळे भारताने जीवाश्म इंधनाच्या आयातीवर असणाऱ्या अवलंबित्वाची मोठी किंमत मोजली. कच्च्या तेलदरात १० डॉलर्सची वाढ झाली की, आयात बिलात १४ ते १६ अब्ज डॉलर्सची भर पडते. ही परावलंबित्वाची साखळी तोडण्याचा मार्ग म्हणजे सौरऊर्जा.**



✍ अजित रानडे

पश्चिम आशियाच्या आकाशात क्षेपणास्त्रांचा मारा सुरू झाला की, त्याचे पडसाद थेट प्रत्येक घराच्या वीज बिलात आणि पेट्रोलच्या दरात उमटतात. या संकटाने भारताची एक मोठी उणीव पुन्हा अधोरेखित केली आहे. जगातील कच्च्या तेलाचा तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा ग्राहक असलेला भारत आपल्या गरजेपैकी सुमारे ८९ टक्के तेल आयात करतो. म्हणजेच दरवर्षी जवळपास १.७५ अब्ज बॅरल अथवा दररोज सुमारे ४८ लाख बॅरल कच्च्या तेलाची आयात करावी लागते. यातील ६० टक्क्यांहून अधिक तेल भूराजकीय दृष्ट्या संवेदनशील असलेल्या होर्मुझ सामुद्रधुनीतून येते. २०२४-२५ या वर्षात भारताचे कच्च्या तेलाचे आयात बिल १३७ अब्ज डॉलर्स इतके होते. कच्च्या तेलाचे दर मार्च महिन्यातील सरासरी ११३.५७ डॉलर्सवर कायम राहिले, तर हे आयात बिल २०० अब्ज डॉलर्सपर्यंत जाऊ शकते. कच्च्या तेलाच्या किमतीत १० डॉलर्सची वाढ झाली की, देशाच्या आयात बिलात १४ ते १६ अब्ज डॉलर्सची भर पडते. हेच परिष्कृत इंधन माल वाहतूक करणाऱ्या ट्रकमध्ये वापरले जाते, शेती नांगरणाऱ्या ट्रॅक्टरांना चालना देते आणि किनारपट्टीवरील समाजाचे पोट भरणाऱ्या मासेमारी नौकांनाही कार्यरत ठेवते. ग्रामीण भारतातील दूरसंचार मनोरे सुरू ठेवण्यासाठी लागणारे डिझेल जनरेटरदेखील याच इंधनावर चालतात. ही परावलंबित्वाची साखळी तोडण्याचा एक मार्ग आहे आणि तो म्हणजे सौरऊर्जा.

भारत हा असा देश आहे, जिथे वर्षातील ३०० हून अधिक दिवस कडक सूर्यप्रकाश असतो. एप्रिल महिन्यात पृथ्वीवरील सर्वाधिक उष्ण असलेल्या २० ठिकाणांपैकी १९ ठिकाणे भारतात होती. हवामान बदलाचा हा वाढता ताण सौरऊर्जेसाठी मात्र ऐतिहासिक संधी निर्माण करतो. भारत १२० हून अधिक सूर्यप्रकाशसमृद्ध देशांच्या आंतरराष्ट्रीय सौर आघाडीचे नेतृत्व करणारा देश आहे. २०२५ मध्ये भारताने ३८ गिगावॅट नवी सौर क्षमता उभारली, जी ३५ गिगावॅट क्षमता वाढवणाऱ्या अमेरिकेपेक्षाही अधिक होती. देशाची एकूण स्थापित सौर क्षमता आता १५० गिगावॅटच्या पुढे गेली आहे. एप्रिलमधील भीषण उष्णतेच्या लाटेदरम्यान तापमान ४० अंशांच्या पुढे गेले असताना राष्ट्रीय वीजग्रीडसमोर आतापर्यंतची विक्रमी २५६ गिगावॅटची मागणी उभी राहिली. त्यावेळी केवळ सौरऊर्जेमधूनच ८१ गिगावॅट वीजनिर्मिती होत होती. म्हणजे देशाच्या एकूण वीज उत्पादनापैकी सुमारे एकतृतीयांश वीज सौरऊर्जेतून मिळत होती.

सौरऊर्जेची क्षमता केवळ स्वच्छ ऊर्जेपुरती मर्यादित नाही, तर ती भारताच्या परकीय चलनसाठ्याच्या सुरक्षेशीही जोडलेली आहे. तेलावरील आयातीचे अवलंबित्व केवळ १० टक्क्यांनी कमी झाले, तरी दरवर्षी १३ ते २० अब्ज डॉलर्सची बचत होऊ शकते. डिझेल जनरेटर्सच्या जागी सौरऊर्जेतून निर्माण झालेली वीज, डिझेल पंपांच्या जागी विद्युत पंप आणि पेट्रोल-डिझेलवर चालणाऱ्या वाहनांच्या जागी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवून जर १० कोटी बॅरेल तेलाची बचत झाली, तरी दरवर्षी ७.५ ते ११ अब्ज डॉलर्सचे परकीय चलन वाचू शकते. अर्थात, सौरऊर्जेच्या प्रवासात अडथळेही आहेत. सौर पॅनल्ससाठी मोठ्या भूभागाची आवश्यकता असते. शेतीयोग्य जमीन मर्यादित आणि वादग्रस्त असलेल्या देशात ही एक गंभीर समस्या आहे. यावर उपाय म्हणजे ओसाड जमीन, घरांच्या छतांवर, महामार्गांच्या कडेला आणि कालव्यांच्या बाजूने सौर पॅनल्स उभारणे. भारताकडे या सर्वांसाठी आधीच विविध योजना आहेत. विशेषतः राजस्थान आणि गुजरातसारख्या राज्यांमध्ये, जिथे सौरऊर्जेची क्षमता सर्वाधिक आहे, तिथे पाण्याची टंचाई मोठी समस्या आहे. सौर पॅनल्स स्वच्छ ठेवण्यासाठी पाण्याची गरज भासते. पाण्याशिवाय कार्य करणारे रोबोटिक पॅनल क्लिनर्स हा त्यावरचा उदयोन्मुख उपाय आहे. अशा तंत्रज्ञानाचे मोठ्या प्रमाणावर देशांतर्गत उत्पादन झाले पाहिजे.

साठवणुकीशिवाय सौरऊर्जेची एक संरचनात्मक मर्यादा कायम राहते. भारताला मोठ्या प्रमाणावर ऊर्जा साठवण प्रणाली उभारण्याची तातडीची गरज आहे. २०२५ मध्ये भारताने २.३ टेरावॅट तास स्वच्छ सौरऊर्जा केवळ वीजग्रिड ती हाताळू शकले नाही म्हणून वाया घालवली. ही केवळ अभियांत्रिकी नव्हे, तर आर्थिक अपयशाचीदेखील निशाणी आहे. याशिवाय चीनचे आव्हानही आहे. भारत बहुतांश सौर पॅनल्स आणि उपकरणे चीनकडून आयात करतो. त्यामुळे व्यापारातील असमतोल वाढतो; मात्र देशांतर्गत सौर मॉड्यूल निर्मिती क्षमता आता १७२ गिगावॉटपर्यंत पोहोचली आहे. सरकारने २०२८ पर्यंत देशांतर्गत सौर सेल आणि वेफर उत्पादनाचे लक्ष्य निश्चित केले आहे. स्वतःची सौर उपकरणे निर्माण करणारा देशच खऱ्याअर्थाने ऊर्जा स्वावलंबी ठरतो.

यासाठी पाच महत्त्वाची पावले आवश्यक आहेत. पहिले म्हणजे सौरऊर्जेकडे राष्ट्रीय सुरक्षेच्या पायाभूत सुविधेप्रमाणे पाहिले गेले पाहिजे आणि संरक्षणाइतकेच प्राधान्य त्याला दिले पाहिजे. त्यासाठी निधी किमान दुप्पट वाढवला गेला पाहिजे. दुसरे म्हणजे, बॅटरी स्टोअरेजमध्ये तातडीने आणि मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक झाली पाहिजे. अन्यथा प्रत्येक संध्याकाळी वीजग्रिड पुन्हा कोळसा आणि डिझेलवर अवलंबून राहील. तिसरे म्हणजे राष्ट्रीय वीज वहन यंत्रणा अधिक सक्षम केली पाहिजे. राजस्थान आणि गुजरातसारख्या सौरसमृद्ध राज्यांमधून महाराष्ट्र आणि तामिळनाडूसारख्या मोठ्या मागणीच्या राज्यांपर्यंत वीज पोहोचवण्याची क्षमता निर्माण झाली पाहिजे. चौथे म्हणजे दुचाकी, तीनचाकी आणि बस वाहतुकीत इलेक्ट्रिक वाहनांचा वेगाने प्रसार झाला पाहिजे. कारण, पेट्रोलियमचा सर्वाधिक वापर वाहतूक क्षेत्रात होतो आणि पाचवे म्हणजे पीएम सूर्यघरसारख्या योजनांद्वारे घरांच्या छतांवरील सौरऊर्जेचा व्यापक विस्तार झाला पाहिजे. वाढती उत्पन्ने आणि वातानुकूलन यंत्राच्या वाढत्या वापरामुळे देशाची कमाल वीज मागणी २७१ गिगावॅटपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे.

जिथे युद्धांमुळे तेलपुरवठ्याचे मार्ग कोणत्याही क्षणी विस्कळीत होऊ शकतात आणि त्या युद्धांमध्ये भारताचा काहीही सहभाग नसतो, तिथे ऊर्जा स्वावलंबन ही राष्ट्रीय गरज बनते. सौरऊर्जेचा प्रत्येक गिगावॅट भारताला होर्मुझ सामुद्रधुनीपासून एक पाऊल दूर घेऊन जातो. प्रत्येक इलेक्ट्रिक वाहन म्हणजे भारताला आयात करावे न लागणारे तेलाचे एक बॅरेल आहे. प्रत्येक छतावरील सौर पॅनल हे स्वावलंबनाकडे टाकलेले एक छोटे पाऊल आहे.

सूर्य दररोज भारतात कोणत्याही चर्चेशिवाय आणि कोणतीही किंमत न मोजता उगवतो. प्रश्न एवढाच आहे की, गरजेनुसार आवश्यक त्या वेगाने आणि व्यापकतेने भारत त्याचा उपयोग कसा करून घेतो?

# फायनान्सच्या वादातून रक्तरंजित शेवट!

## जामनकर नगरात सचिन उर्फ 'येडा' राठोडची भररस्त्यात चाकूने हत्या

दै. जनमाध्यम| प्रतिनिधी

**यवतमाळ , दि. २१ : शहरातील जामनकर नगर परिसर गुरुवारी (दि. २१ मे) पहाटे रक्तरंजित खूनप्रकरणाने हादरला. सचिन उर्फ 'येडा' राठोड या तरुणाची भररस्त्यात धारदार शस्त्राने निर्घृण हत्या करण्यात आल्याने शहरात खळबळ उडाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, वाहन फायनान्सच्या पैशांच्या देवाण-घेवाणीच्या जुन्या वादातून ही घटना घडल्याचा संशय व्यक्त होत असून, आरोपी बकुल ऊर्फ शाहीद शेख याच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत.**



पोलिसांकडे नोंदविण्यात आलेल्या जबाबानुसार, सकाळी सुमारे ६ ते ७.३५ वाजण्याच्या दरम्यान सचिन राठोड हा त्याचे मित्र रोहन शिंदे, प्रणित काळे, ओम रुपनर, मोईन काझी आणि जिशान यांच्यासोबत घोडेराव चौक परिसरातील हनुमान मंदिराजवळ बसला होता. त्यावेळी बकुल ऊर्फ शाहीद शेख हा एका साथीदारासह ॲक्टिव्हावर तेथे आला. सुरुवातीला त्याने मोईन काझीला बोलावून काही वेळ चर्चा केली. त्यानंतर त्याने सचिनला "तेरे साथ ५ मिनिट बात करनी है" असे म्हणत जवळ बोलावल्याचे सांगितले जात आहे. यावेळी दोघांमध्ये पूर्वीच्या वादावरून शाब्दिक चकमक झाली आणि त्यानंतर आरोपीने कमरेला लावलेला चाकू काढून सचिनवर सपासप वार केल्याचा आरोप आहे. सचिनचा जीव वाचविण्याचा प्रयत्न करताना मोईन काझी आणि जिशान यांनाही दुखापत झाल्याचे सांगितले जात आहे. जखमी अवस्थेत सचिन तेथून जीव वाचवण्यासाठी धावत निघाला. मात्र आरोपीने त्याचा पाठलाग केल्याचा आरोप असून, विदर्भ हौसिंग सोसायटीतील सांस्कृतिक भवनासमोर पुन्हा त्याच्यावर हल्ला करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. गंभीर जखमी अवस्थेत मित्रांनी त्याला शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी कॅम्प पोलीस स्टेशन अंतर्गत अवधूतवाडी पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. आरोपी बकुल ऊर्फ शाहीद शेख याच्याविरोधात तक्रार दाखल झाली असून, इतर साथीदारांची भूमिकाही तपासली जात आहे. दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेमुळे जामनकर नगर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# बेलोरा बीटमधील सागवान वृक्षतोड प्रकरणात नियम धाब्यावर

## प्रशासनाचे मौन का? चौकशीच्या मागणीला जोर

दै. जनमाध्यम| प्रतिनिधी

**आर्णी, दि. २१ :** आर्णी तालुक्यातील दक्षिण वनपरिक्षेत्रांतर्गत सावळी सदोबा सर्कलमधील बेलोरा बीट येथे कुप कटाईच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात सागवान वृक्षतोड झाल्याचा गंभीर आरोप समोर आला असून या प्रकरणाच्या निष्पक्ष चौकशीची मागणी आता तीव्र होत आहे. संबंधित प्रकारामुळे परिसरात चर्चेला उधाण आले असून वन विभागाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बेलोरा बीट परिसरात करण्यात आलेल्या वृक्षतोडीत नियमांचे पालन झाले का,



याबाबत संशय व्यक्त केला जात आहे. काही स्थानिकांकडून या संपूर्ण प्रकारात संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात येत असून, यामध्ये वन विभागातील काही कर्मचाऱ्यांच्या संगनमताचा आरोप होत आहे. मात्र या आरोपांची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही. या प्रकरणाची दखल घेत काही पत्रकारांनी घटनास्थळी भेट देऊन माहिती आणि पुरावे संकलित केल्याचे सांगितले जात आहे. संबंधित वृत्त समोर आल्यानंतर परिसरात मोठी खळबळ उडाली असून, या प्रकरणावर पडदा टाकण्याचे प्रयत्न सुरू असल्याच्या चर्चांनाही उधाण आले आहे.दरम्यान, गंभीर स्वरूपाचे आरोप समोर येऊनही वरिष्ठ अधिकारी मौन बाळगत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. "जर सर्व प्रक्रिया नियमबद्ध पद्धतीने झाली असेल, तर प्रशासनाकडून अधिकृत खुलासा का केला जात नाही?" असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर सावळी सदोबा सर्कलमधील एका सामाजिक कार्यकर्त्याने नाराजी व्यक्त करत, काही दिवसांत निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई झाली नाही तर जनआंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. तसेच आवश्यक कारवाई न झाल्यास यवतमाळ येथील विभागीय कार्यालयासमोर उपोषण करण्याचाही इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे आता वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी या प्रकरणात नेमकी कोणती भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# संजय खाडे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रमांची पर्वणी..!

## रक्तदान,फळवाटप व कार्यालय उद्घाटनाचे आयोजन

दै. जनमाध्यम| प्रतिनिधी

**वणी, दि. २१ :** शेतकरी व कामगार नेते तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव संजय खाडे यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवार, दि. २३ मे २०२६ रोजी वणी येथे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून दिवसभर सामाजिक, आरोग्यविषयक आणि विकासाभिमुख कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे. सकाळी १०.३० वाजता शेतकरी मंदिर, वणी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. "रक्तदान हेच श्रेष्ठ दान" हा संदेश देत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अपघात, शस्त्रक्रिया तसेच विविध आजारांमुळे रक्ताची सतत गरज भासत असल्याने एका व्यक्तीच्या रक्तदानातून अनेकांचे प्राण वाचू शकतात, या



सामाजिक भावनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. दुपारच्या सत्रात वणी येथील वृद्धाश्रमात गरजूं साठी साहित्य वाटप करण्यात येणार आहे. समाजातील ज्येष्ठ नागरिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. याच सत्रात ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना फळ वाटपाचाही कार्यक्रम पार पडणार आहे. संध्याकाळी ६ वाजता डीएसके कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपर्स या नव्या व्यावसायिक कार्यालयाचे उद्घाटन प्रतिभा धानोरकर यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसंतराव पुरके राहणार आहेत. धनंजय खाडे यांच्या नेतृत्वात सुरू होणारा हा उपक्रम विकासाभिमुख वाटचालीचा भाग मानला जात आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संजय खाडे फाउंडेशन, जय जगन्नाथ मल्टीस्टेट पतसंस्था, श्री लक्ष्मीनारायण पतसंस्था आणि मित्रपरिवार परिश्रम घेत आहेत.

## घटना-घडामोडी



### संजीवन हॉस्पीटल मध्ये २५ मे रोजी विविध आरोग्य विषयक शिबिरे

**यवतमाळ :** संजीवन हॉस्पीटलच्या वर्धापन दिनानिमित्य सोमवार दिनांक २५ मे २०२६ रोजी विविध आरोग्य विषयक शिबिरे आयोजित केली आहे. यात दारिद्र रेषेखालील महिलांसाठी गरोदर माता तपासणी, स्तन कर्करोग, रक्त तपासणी, युरोलॉजी, नेफोलॉजी, हाडाची कॅल्शियम पातळी, दंत, नाक, कान, घसा, जनरल सर्जरी, न्यूरो सर्जरी, मनोविकार, मेंदू रोग, व्यसन मुक्ती, लैंगिक समस्या, मधुमेह, लठ्ठपणा, हाडे ठिसुळ होण्याचा आजार, आदीवर मोफत तपासणी करण्यांत येणार आहे. थायरॉईड तपासणी नाममात्र दरात करण्यांत येईल. त्याच प्रमाणे प्रथम ५ रूग्णांची ॲन्जिओग्राफी ही ५० टक्के सवलतीत करण्यांत येईल. सदर सवलत ही फक्त २५ मे करीताच राहील. या सोबतच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यांत आले आहे. प्रवेश क्षमता ही मर्यादित असल्याने इच्छुकांनी आपल्या नावाची नोंदणी ही पी.आर.ओ. काऊटरवर २४ में २०२६ पर्यंत सकाळी १० ते दुपारी ४ या वेळात करावी. असे आवाहन संजीवन हॉस्पीटलचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. सुनिल अग्रवाल यांनी केले आहे.

### पावसाळ्यापूर्वीच काँग्रेसचा इशारा..! पांढरकवडा नगरपरिषदेकडे

**तातडीच्या कामाची मागणी**

**पांढरकवडा :** शहरात पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला



असतानाही पावसाळापूर्व कामांचे नियोजन करण्यात आले नसल्याचा आरोप करत शहर काँग्रेसच्या वतीने नगरपरिषद प्रशासनाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. मुख्याधिकारी, नगरपरिषद पांढरकवडा यांना देण्यात आलेल्या निवेदनात मे महिना संपत आला असून जूनमध्ये पावसाळ्याची सुरुवात होणार असतानाही शहरात नालेसफाई, पावसाळ्यापूर्व स्वच्छता मोहीम तसेच पाणी निचऱ्याच्या कामांबाबत कोणतेही ठोस नियोजन दिसून येत नसल्याची बाब नमूद करण्यात आली आहे. नियोजनाच्या अभावामुळे दरवर्षी पावसाळ्यात नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. अनेक महिन्यांपासून शहरातील नाल्यांची संपूर्ण स्वच्छता न झाल्याने त्यामध्ये कचरा व गाळ साचला असून, त्यामुळे नाल्यांतील घाण वर येत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. पावसाळ्यात नाल्यांतील दूषित पाणी घरांमध्ये आणि दुकानांमध्ये शिरण्याची शक्यता असून त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याबरोबरच आर्थिक नुकसानही होऊ शकते, असा इशाराही काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. शहरातील विविध वस्त्यांमध्ये पावसाळ्यात उद्भवणाऱ्या अडचणी आणि संभाव्य संकटांचा विचार करून प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. लोकहिताच्या दृष्टीने पावसाळ्यापूर्व आवश्यक कामांचे प्राधान्याने नियोजन करून ती तात्काळ हाती घ्यावीत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.यावेळी शहर काँग्रेस अध्यक्ष अनिस पोसवाल, युवक काँग्रेस अध्यक्ष संतोष राऊत, मनोज भोयर, मज्जित बैलीम, मकरंद साने, ईक्रम अली, दत्तात्रय ठाकरे, अनिल किनाके, अमर पाटील, प्रेम राठोड आणि प्रीती गेडाम उपस्थित होते.

### आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पुनर्वसनासाठी बीजेएसचा पुढाकार

**यवतमाळ :** आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुला-मुलींच्या शिक्षणासाठी भारतीय जैन संघटना (बीजेएस) गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पुनर्वसनासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. सन २०१४ पासून संघटनेमार्फत अशा विद्यार्थ्यांना पुणे येथील वाघोली शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पात प्रवेश देऊन त्यांचे शिक्षण, निवास, भोजन, वसतीगृह तसेच इतर आवश्यक सुविधा पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

मागील दोन वर्षांत आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय बीजेएसने घेतला आहे. त्यानुसार इयत्ता पाचवी व सहावीमध्ये शिकणाऱ्या मुला-मुलींना इयत्ता बारावीपर्यंतच्या शिक्षणासाठी वाघोली येथील शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पात दाखल करण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी महाराष्ट्रातील २० जिल्ह्यांची निवड करण्यात आली असून, यवतमाळ जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांची अधिकृत यादी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झाली आहे.

# हयात प्रमाणपत्रासाठी वयोवृद्धांची फरफट..!

## संजय गांधी व श्रावणबाळ योजनेतील लाभार्थी त्रस्त

दै. जनमाध्यम| प्रतिनिधी

**पुसद, दि. २१ :** तहसील कार्यालयांतर्गत तालुक्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा योजनेच्या लाभार्थ्यांना डिजिटल लाईफ सर्टिफिकेट (हयात प्रमाणपत्र) सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. प्रमाणपत्र सादर न केल्यास पुढील महिन्यापासून अनुदान बंद होऊ शकते, अशी सूचना प्रशासनाने दिली आहे.या निर्णयामुळे तालुक्यातील व शहरातील वयोवृद्ध, निराधार व विधवा महिलांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक लाभार्थी २० ते २५ किलोमीटर अंतरावरून पुसद शहरात येऊन ऑनलाईन केंद्रांवर तासन्तास रांगेत उभे



राहत आहेत. रोजंदारी बुडणे, प्रवास खर्च आणि ४३ ते ४५ अंश तापमानात उन्हाचा सामना यामुळे लाभार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. डीएलसी प्रक्रियेसाठी आधारशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक व अद्ययावत आधार कार्ड आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. मात्र लाभार्थ्यांचा आर्थिक व मानसिक त्रास लक्षात घेता, गावपातळीवर शिबिरे किंवा पर्यायी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# मुकूटबनमध्ये निकृष्ट रस्ता बांधकामाविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे रास्ता रोको आंदोलन..

## नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप दोषींवर कारवाई व नव्याने दर्जेदार रस्ता उभारणीची मागणी

दै. जनमाध्यम| प्रतिनिधी

**झरी, दि. २१ :** मुकूटबन येथील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत सुरू असलेल्या सिमेंट काँक्रीट रस्ता बांधकामात अनियमितता व नियमांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने बुधवार (दि. २० मे २०२६) रोजी बसस्थानकासमोर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

विधानसभा अध्यक्ष दिलीप भोयर यांच्या नेतृत्वात झालेल्या या आंदोलनात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीविरोधात संताप व्यक्त केला.



आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, रस्ता बांधकाम करताना निविदेतील अटी व तांत्रिक निकषांचे पालन करण्यात आले नाही. आवश्यक असलेले स्लिम फॉर्म पवार यंत्र न वापरता फिक्स्ड फ्रॉम पवार चा वापर करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. तसेच कामाच्या ठिकाणी आवश्यक प्लांट उभारण्यात आला नसून मिक्सर, व्हायब्रेटर आणि मिलिंग मशीनसारख्या आवश्यक यंत्रसामग्रीचाही वापर करण्यात आला नसल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्या संगनमतामुळे शासन निधीचा अपव्यय होत असल्याचा गंभीर आरोपही यावेळी करण्यात आला. दोषी कार्यकारी अभियंता, उपविभागीय अभियंता आणि शाखा अभियंत्यांवर शिस्तभंगाची कारवाई करून कायमस्वरूपी निलंबन करण्यात यावे, तसेच संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली.तसेच सदर निकृष्ट व नियमबाह्य रस्ता उखडून निविदेतील अटींनुसार नव्याने दर्जेदार रस्ता उभारण्याची मागणीही करण्यात आली. आंदोलनामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. यावेळी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आंदोलनात विविध पदाधिकारी व शेकडो नागरिक उपस्थित होते.

# यवतमाळ जिल्ह्यात जनगणना मोहिमेला वेग..

## घर गणनेला प्रत्यक्ष सुरुवात, नागरिकांना सहकार्याचे आवाहन

दै. जनमाध्यम| प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २१ :** देशातील महत्त्वपूर्ण आणि व्यापक प्रशासनिक उपक्रम असलेल्या जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर यवतमाळ जिल्ह्यात घरगणना प्रक्रियेला प्रत्यक्ष प्रारंभ झाला असून जिल्हा प्रशासनाने नागरिकांना प्रगणकांना अचूक माहिती देऊन सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. दि. १६ मेपासून जनगणनेच्या पहिल्या टप्प्यातील घरगणना कार्य सुरू करण्यात आले असून ही मोहीम १४ जून २०२६ पर्यंत राबविण्यात येणार आहे.

या कालावधीत प्रशासनाकडून नियुक्त प्रगणक आणि पर्यवेक्षक कर्मचारी घरभेटी देऊन माहिती संकलनाचे काम करत आहेत. घरगणना प्रक्रियेदरम्यान संबंधित घरांवर मार्कर किंवा खडूने क्रमांक चिन्हांकित केले जात आहेत. जनगणनेच्या नावाखाली कोणत्याही प्रकारची कागदपत्रे, बँक खाते तपशील किंवा ओटीपी मागविण्यात येणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. शासनाने निश्चित केलेल्या केवळ ३३ प्रश्नांचीच विचारणा केली जाणार आहे. ही प्रक्रिया जनगणना अधिनियम १९४८ अंतर्गत राबविण्यात येत असून प्रगणक व पर्यवेक्षकांना घरांमध्ये प्रवेश करून माहिती घेण्याचा आणि घरांना क्रमांक देण्याचा अधिकार देण्यात आला आहे. जनगणनेत दिलेली माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाणार असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तसेच जनगणना कर्तव्यात निष्काळजीपणा केल्यास दंडात्मक कारवाईची तरतूद असल्याची माहिती देण्यात आली. दरम्यान, १ ते १५ मे या कालावधीत नागरिकांसाठी ऑनलाइन स्वगणना सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. या सुविधेचा लाभ घेत यवतमाळ जिल्ह्यातील २२ हजार ३१८ कुटुंबांनी स्वगणना पूर्ण केली आहे. जिल्ह्यातील जनगणना कामासाठी सुमारे ५ हजार ६०० अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यात ४६३८ प्रगणक, ७७९ पर्यवेक्षक, २ जिल्हास्तरीय आणि ९२ क्षेत्रीय प्रशिक्षकांचा समावेश आहे. ग्रामीण व शहरी भागातील एकूण ५०१३ गट तयार करण्यात आले असून त्यामध्ये २१२६ गावे आणि २५५ शहरी वार्डांचा समावेश असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

# जिल्हा प्रशासनाविरोधात आज 'हाहाकार मोर्चा..!

## शेतकरी, महिला व निराधारांच्या प्रश्नांवर न्यायाची हाक

दै. जनमाध्यम| प्रतिनिधी

**महागाव, दि. २१ :** जिल्हा प्रशासनाच्या कथित हलगर्जीपणामुळे शेतकरी, महिला आणि निराधार नागरिक विविध शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहत असल्याचा आरोप करत जन आंदोलन आधार संघर्ष समितीच्या वतीने शुक्रवारी सकाळी ११ वाजता 'हाहाकार मोर्चा' काढण्यात येणार आहे.

पंचायत समिती कार्यालयापासून तहसील कार्यालयापर्यंत हा मोर्चा निघणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन समितीचे संस्थापक अध्यक्ष जगदीश नरवाडे यांनी केले आहे. समितीच्या म्हणण्यानुसार, जिल्हा प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे अनेक शेतकरी पिक विमा योजनेच्या लाभापासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे



पात्र शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई व विमा लाभ द्यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. तसेच 'लाडकी बहीण' योजना, निराधार योजना व घरकुल योजनांच्या अंमलबजावणीत होत असलेल्या विलंबामुळे अनेक गरजू लाभार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. रखडलेले लाभ तातडीने वितरित करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील पांदण रस्ते मोकळे करून त्यांचे खडीकरण करण्यात यावे, तसेच शेती आणि विकासकामांसाठी वापरल्या जाणाऱ्या ट्रॅक्टर व जेसीबीसाठी डिझेल कॅनमधून इंधन देण्यास परवानगी द्यावी, अशीही मागणी समितीने केली आहे. शेतकरी, महिला, निराधार नागरिक आणि सर्वसामान्यांच्या हक्कासाठी हा मोर्चा काढण्यात येत असल्याचे सांगत, तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# आर्णीची मुख्य बाजारपेठ अतिक्रमणाच्या विळख्यात..!

## छत्रपती शिवाजी चौक ते दिग्रस-माहूर मार्गावर वाहतुकीचा खोळंबा; नागरिकांचा संताप

दै. जनमाध्यम| प्रतिनिधी

**आर्णी, दि. २१ :** शहरातील मुख्य बाजारपेठ आणि वाहतुकीची जीवनवाहिनी मानला जाणारा छत्रपती शिवाजी चौक ते दिग्रस-माहूर रोड हा सध्या वाढत्या अतिक्रमणामुळे अक्षरशः गुदमरू लागला आहे. शहरासह तालुक्यातील नागरिक, प्रवासी आणि वाहनधारकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला हा मार्ग दिवसेंदिवस अतिक्रमणाच्या विळख्यात अडकत चालल्याने वाहतूक व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झाली आहे.

रस्त्याच्या दुतर्फा दुकानांसमोर विक्रीचे साहित्य रस्त्यापर्यंत मांडले जात असून, त्याचसमोर हातगाड्यांवरील लिंबू शरबत, सोडा, थंडपेय व अन्य किरकोळ व्यावसायिकांचे अतिक्रमण वाढल्याने रस्त्याची रुंदी मोठ्या प्रमाणात कमी



झाली आहे. परिणामी वाहनांना मार्ग काढणे तर दूरच, सामान्य नागरिकांनाही पायी चालणे कठीण बनले आहे.या मार्गावर अनेक शाळा असून, विद्यार्थ्यांना दररोज जीव मुठीत धरून शाळेत जावे लागत आहे. रस्त्यावर कायम असलेली गर्दी, अवैध प्रवासी वाहतूक आणि वाहतुकीचा वाढता ताण यामुळे ट्राफिक जाम ही रोजचीच समस्या झाली आहे. स्थानिकांसह बाहेरगावाहून येणारे वाहनधारक आणि एसटी बस चालकही या परिस्थितीमुळे त्रस्त झाले आहेत. गेल्या काही काळात या मार्गावर अनेक किरकोळ आणि गंभीर अपघात घडल्याची नोंद आहे. विशेष म्हणजे, रस्त्याच्या मध्यभागी बसविण्यात आलेले काही पथदिवे अपघातांमुळे नुकसानग्रस्त झाल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. तरीही प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. शहराच्या मध्यवर्ती भागात दिवसेंदिवस गंभीर होत चाललेल्या या समस्येकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन विशेष "अतिक्रमण हटाव मोहीम" राबवावी आणि मुख्य मार्ग वाहतुकीसाठी मोकळा करावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. अन्यथा एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# शिव मंदिराच्या चाऱ्याच्या गोडाऊनला आग

## 25 लाखाचे नुकसान झाल्याचा अंदाज

दै. जनमाध्यम| प्रतिनिधी



**बाभूळगाव, दि. २१ :** तालुक्यातील सरूळ सिद्धेश्वर शिव मंदिर येथील गोरक्षणाच्या चारा डेपोला गुरुवार ला दुपारी अचानकपणे आग लागली.



या आगीत २५ लाख रुपयाचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविला जात आहे.गुरुवारला दुपारी चाऱ्याच्या गोडाऊनला अचानकपणे आग लागली या भल्या मोठ्या गोडाऊन मध्ये हरभऱ्याचे कुटार, तुरीचे कुटार, कडबा, गव्हाचा गावंडा भरून होता. पाहता पाहता आगीने रौद्ररूप धारण केले मंदिर विश्वस्तांनी पोलीस स्टेशन महसूल यंत्रणा व अग्निशमन दलाला घटनेची माहिती दिली. धामणगाव रेल्वे व यवतमाळ येथील अशा दोन अग्निशमन दलाच्या गाड्या गोरक्षनात पोहोचल्या. सोबतच तहसीलदार मीरा पागोरे, पोलीस उपनिरीक्षक दीपक आसकर हे आपल्या ताफ्यासह शिवाय तलाठी अविनाश सरडे, पोलीस पाटील रसिका मेश्राम व सिद्धेश्वर शिव मंदिरातील विश्वस्त गोरक्षण परिसरात पोहोचले. दोन्ही अग्निशामक दलाच्या गाड्यांनी आग विझविली. मात्र तोपर्यंत पंचवीस लाख रुपयाचा मुक्या जनावरांचा चारा आगीच्या भक्ष स्थानी पडला होता आता तीनशे जनावरांच्या वैरणीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# चांदूर रेल्वेतील निविदा घोटाळ्याने प्रशासन हादरले

## आचारसंहितेच्या काळात नियम धाब्यावर ठेवून मुदतवाढ मर्जीतील कंत्राटदारांसाठी नगरपरिषदेत संशयास्पद हालचाली

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू असतानाच चांदूर रेल्वे नगरपरिषदेत विकास कामांच्या निविदा प्रक्रियेत मोठा गोंधळ उडाल्याचा आरोप समोर आला आहे. निविदा भरण्याची मुदत संपत असताना अचानक शुद्धीपत्रक काढून मुदतवाढ देण्यात आल्याने नगरपरिषद प्रशासनाच्या कारभारावर संशयाचे सावट गडद झाले आहे. तांत्रिक अडचणीचे कारण पुढे करत काही ठरावीक कंत्राटदारांना लाभ मिळवून देण्यासाठीच हा डाव रचल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असून या प्रकरणी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे.



त्यामुळे शहरातील राजकीय वातावरण तापले असून नगरपरिषद प्रशासनाविरोधात संतापाची लाट उसळली आहे.

नगरपरिषदेकडून नागरी सुविधा योजनेंतर्गत विविध विकास कामांसाठी ई निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. निविदा भरण्याची अंतिम मुदत १९ मे रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली होती. अनेक कंत्राटदारांनी वेळेत निविदा भरल्याची माहिती समोर आली. मात्र मुदत संपण्याच्या शेवटच्या क्षणी अचानक शुद्धीपत्रक काढून निविदेला मुदतवाढ देण्यात आली. संकेतस्थळावर तांत्रिक अडचण निर्माण झाल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात आला. परंतु प्रत्यक्षात कोणताही तांत्रिक बिघाड नसताना मुद्दाम मुदतवाढ देण्यात आल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.

नगरपरिषद प्रशासनाने आपल्या मर्जीतील कंत्राटदारांना संधी मिळावी म्हणूनच नियमांना पायदळी तुडवत हा निर्णय घेतल्याची चर्चा शहरभर रंगली आहे. मुख्याधिकारी तसेच संबंधित अभियंत्यांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. निवडणूक आचारसंहिता लागू असताना अशा प्रकारे निविदा प्रक्रियेत बदल करणे म्हणजे शासन नियमांची उघडपणे पायमल्ली असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत असून जिल्हाधिकारी कार्यालयाकडून या तक्रारीची गंभीर दखल घेतली जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे. नगरपरिषदेत सुरू असलेल्या कारभारावर नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून पुढील काही दिवसांत या प्रकरणाचे राजकीय पडसाद आणखी तीव्र होण्याचे संकेत मिळत आहेत.

## संक्षिप्त

### विद्यापीठात भारतरत्न राजीव गांधी यांची पुण्यतिथी



**अमरावती -** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांची पुण्यतिथी दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन म्हणून संपन्न झाली. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले व उपस्थितांना दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त प्रतिज्ञा दिली. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहर्चय मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, सहा. कुलसचिव विलास काकडे तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांच्याबद्दल माहिती जनसंर्पक अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

### संपदा गोरे यांची नियुक्ती



**तिवसा-**येथील महिला संघटिका संपदा गोरे यांची तिवसा तालुका शिवसेना (शिंदे गट) महिला अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.शिवसेनेच्या जिल्हा प्रमुख रेखा खारोडे यांनी संपदा गोरे यांना नियुक्तीपत्र देऊन तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली.त्यांच्या या नियुक्तीबद्दल शिवसेनेच्या महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

### धामणगाव रेल्वे येथे श्रीमद भागवत कथा



**धामणगाव रेल्वे-**येथील शारदा ज्वेलर्सचे संचालक रामआश्रय भगत परिवाराकडून गिरधारीलाल द्वारकादास पसारी धर्मशाळा येथे भव्य श्रीमद भागवत कथा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक सोहळा २१ ते २८ मे या कालावधीत आयोजन करण्यात आलेले आहे. कथेची वेळ दररोज दुपारी ३ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत असणार आहे. वृंदावन येथील सुप्रसिद्ध कथा वाचक, परमपूज्य भागवताचार्य पंडित श्रीरामजी महाराज आपल्या सुमधुर वाणीतून भाविकांना भागवत कथेचे रसपान करणार आहेत. या सोहळ्या निमित्याने संगीतमय श्रीमद भागवत कथेच्या पूर्वसंध्येला कलश यात्रेचे आयोजन करण्यात आले.या आध्यात्मिक व धार्मिक कथेचा आस्वाद घेण्याचे आवाहन व विनंती रामआश्रय रामप्रसादजी भगत, किरण रामआश्रयजी भगत आणि समस्त भगत परिवार (धामणगाव रेल्वे) यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### पुनम मोळे हिचा सत्कार

**कुऱ्हा-**गुरूदेवनगर येथील पुनम रविंद्र मोळे ही श्री गुरूदेव विद्यामंदीर व कनिष्ठ महाविद्यालय गुरुकुंज आश्रम येथील दहाविच्या परीक्षेत प्रथम येवून ९२.४० टक्के घवघवीत यश संपादन केल्यामुळे तिचा तिवसा तालुका अ.भा. ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने शाल व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. अतिशय गरीब परिस्थितीत गुरुकुंज आश्रम येथे शिक्षण घेत असुन वडील रविंद्र मोळे खाजगी कंपनीत काम करतात. पुनमला भविष्यात डॉ. व्हायचे असुन गोरगरीब जनतेची सेवा करण्याची इच्छा व्यक्त केली. यावेळी अ.भा. ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय सह सचिव राजेंद्र भुरे, तिवसा तालुका पत्रकार संघाचे जेष्ठ पत्रकार धनराज बारबुद्धे, शरद कांडलकर,गुरूदेव मित्र परीवाराचे उद्धव वानखडे, गणेश घाटोळ आर्दींनी पुनमला पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देत तिच्या यशाबद्दल सर्व स्तरावर तिचे अभिनंदन केले आहे.



## फेसबुकवरील अश्लील मेसेज प्रकरणाचा उलगडा
### आरोपीची कसून चौकशी

**अमरावती/का.प्र.**

सोशल मीडियावर महिलेला अश्लील मेसेज पाठवून विनयभंग केल्याच्या प्रकरणाचा सायबर क्राईम पोलिसांनी उलगडा केला असून आरोपीचा शोध लावण्यात आला आहे. या प्रकरणात सुमेध सुरेश देवरे (वय ३७, रा. मुंडवाडा, नांदसावंगी, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती) असे आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने पीडित महिलेच्या फेसबुक अकाऊंटवर २२ ते २५ मार्च या कालावधीत सातत्याने अश्लील मेसेज व व्हिडिओ पाठवून तिचा मानसिक छळ केला होता. विशेष म्हणजे, पीडिता ही आरोपीची नातेवाईक असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. तसेच आरोपीने पीडितेच्या नावाने दोन बनावट फेसबुक अकाऊंट तयार करून तिची बदनामी करण्याचा प्रयत्न केल्याचेही समोर आले आहे.सायबर क्राईम पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीचा शोध घेत त्याची कसून चौकशी केली. चौकशीदरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

दरम्यान, आरोपीचा मोबाईल जप्त करण्यात आला असून तो अधिक तपासासाठी फॉरेन्सिक पथकाकडे पाठविण्यात आला आहे. या प्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सायबर क्राईम पोलीस करत आहेत. या घटनेमुळे सोशल मीडियाच्या गैरवापराबाबत पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

## जिल्ह्यात खरीप हंगामात कपाशीच्या लागवड क्षेत्रात वाढ होणार
### उच्चांकी दराचा परिणाम;१२.५० लाख बियाणे पाकिटांची मागणी

**अमरावती/का.प्र.**

बाजारपेठेत कापसाला मिळत असलेल्या उच्चांकी दरामुळे यंदाच्या खरीप हंगामात अमरावती जिल्ह्यात कपाशीच्या लागवडीखालील क्षेत्रात मोठी वाढ होण्याची चिन्हे आहेत. कृषी विभागाच्या अंदाजानुसार, यंदा सरासरी क्षेत्राच्या तुलनेत तब्बल २० हजार हेक्टरने कपाशीचा पेरा वाढण्याची शक्यता आहे. या वाढत्या क्षेत्राचा विचार करून जिल्ह्यात तब्बल १२ लाख ५० हजार कापूस बियाणे पाकिटांची मागणी नोंदवण्यात आली आहे. परिणामी, आगामी हंगामासाठी बियाण्यांचे योग्य नियोजन करण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर उभे ठाकले आहे.

खरीप हंगाम तोंडावर आला असतानाच कृषी विभाग आणि बियाणे कंपन्यांनी आपली तयारी वेगाने सुरू केली आहे. अमरावती जिल्ह्यात दरवर्षी सरासरी २ लाख ३० हजार हेक्टरवर कापसाची लागवड केली जाते. मात्र, यंदा बाजारातील तेजीचा कल पाहता हा या पेरा २ लाख ५० हजार हेक्टरपर्यंत जाण्याचा अंदाज आहे.सध्या खुल्या बाजारपेठेत कापसाला प्रतिक्विंटल सुमारे ७हजार रुपयांपर्यंतचा दर मिळत आहे. गेल्या काही महिन्यांपासून ही दरवाढ सातत्याने कायम आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडी, तेलबियांच्या दरात झालेली वाढ, तसेच रुई आणि सरकीला वाढलेली मागणी यामुळे कापूस बाजार मजबूत स्थितीत असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. आर्थिक फायद्यामुळेच विदर्भातील शेतकऱ्यांचा कल पुन्हा एकदा कपाशीकडे वळताना दिसत आहे.

यंदा संकरित कपाशीच्या काही विशिष्ट आणि लोकप्रिय वाणांना शेतकऱ्यांकडून प्रचंड मागणी राहण्याची शक्यता कृषी विभागाने वर्तवली आहे. गतवर्षी अशाच काही निवडक वाणांच्या बियाण्यांची विक्री चक्क पोलीस बंदोबस्तात करावी लागली होती. यंदाही परिस्थिती वेगळी नसून, एका खासगी कंपनीच्या दोन विशिष्ट वाणांचा कल विदर्भातील शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे ऐन हंगामात या बियाण्यांचा कृत्रिम तुटवडा निर्माण होण्याची आणि पर्यायाने काळाबाजार होण्याची भीती कृषी क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केली आहे, हा काळाबाजार रोखणे आता प्रशासनासाठी मुख्य आव्हान ठरणार आहे. सध्या उन्हाची तीव्रता अधिक असून, संपूर्ण महिनाभर उन्हाचा तडाखा कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या २५ मेनंतरच कापूस लागवड करण्याचे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

## पथदिव्यांच्या नियंत्रणासाठी महावितरण परिमंडळाचे महत्त्वपूर्ण पाऊल
### दिवसा सुरू राहणारे पथदिवे होणार बंद, वीजबिलातही होणार बचत

**अमरावती/का.प्र**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीतील पथदिव्यांच्या प्रभावी नियंत्रणासाठी महावितरणच्या अमरावती परिमंडळाने महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. स्मार्ट मीटरच्या स्मार्ट वापरातून पथदिव्यांचे स्वयंचलित नियंत्रण होणार असून, त्यामुळे दिवसा अनावश्यक सुरू राहणारे पथदिवे बंद ठेवणे शक्य होणार आहे. परिणामी वीज बचतीसोबतच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वीजबिलातही लक्षणीय बचत होणार आहे.

महावितरण अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिलेल्या माहितीनुसार, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विविध कार्यालयांसोबत पाठपुरावा करून देखील अनेक ठिकाणी पथदिवे दिवसा सुरू राहत असल्याचे दिसून येते. त्यामुळे गरज नसतांना मोठ्या प्रमाणावर वीज वाया जाते, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वीज खर्चात अनावश्यक वाढ होते आणि वीजबिलाच्या वसूलीतही मोठ्याप्रमाणात अडचणी निर्माण होतात.ही बाब लक्षात घेऊन स्मार्ट मीटरच्या तंत्रज्ञानाचा वापर करून पथदिवे निश्चित वेळेनुसार म्हणजेच सूर्यास्तानंतर संध्याकाळी ६ वाजता पथदिवे सुरू होणे आणि सूर्योदयानंतर सकाळी ६ वाजता ते आपोआप बंद होणे यासाठी तांत्रिक प्रोग्रॅम निश्चित करण्यात आला आहे. त्यामुळे मानवी हस्तक्षेपाशिवाय पथदिव्यांचे स्वंयचलित अचूक नियंत्रण शक्य होणार आहे.

अमरावती परिमंडळाअंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थेअंतर्गत महानगरपालीका, नगरपालीका, नगरपरिषद आणि ग्रामपंचायत अंतर्गत ४ हजार १८५ पथ दिव्यांच्या जोडण्यांना स्मार्ट मीटर लावण्यात आले आहे. यात अमरावती जिल्ह्यातील २ हजार २०३ जोडण्या आहेत आणि यवतमाळ जिल्ह्यात १ हजार ९७२ ठिकाणी स्मार्ट मीटर लावण्यात आले आहेत. पथ दिव्यांसाठी अनाधिकृत वीज पुरवठा घेण्यात आला असेल, तसेच दिवसा सुरू असणाऱ्या पथ दिव्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे.

## खरीप हंगामासाठी तालुका कृषी विभाग सज्ज
### ४५ हजार २९३ हेक्टरचे नियोजन; कापूस व सोयाबीनला पसंती

**चांदूरबाजार/वार्ताहर**

खरीप हंगाम तोंडावर आला असून मान्सून पूर्व मशागतगतीला वेग आला आहे.परिणामी खरीप हंगामासाठी,शेतकऱ्यांची लगबग वाढली आहे. याच पार्श्वभूमीवर तालुका कृषी विभागानेही शेतकऱ्यांसाठी, खरीप हंगाम २०२६-२७ साठी पीक नियोजन केले आहे . यावर्षी कापूस व सोयाबीन क्षेत्रात वाढ होण्याचा अंदाज आहे.

तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ५८ हजार ५०५ हेक्टर इतके आहे.पैकी ५८ हजार ७३७ हेक्टर क्षेत्र पेरणी योग्य आहे. यातील १७ हजार १४१ क्षेत्र संत्रा फळ पिकाच्या लागवडी खाली आहे. उर्वरित क्षेत्रासाठी तालुका कृषी विभागाने,खरीप हंगामाचे नियोजन केले आहे. कृषी विभागाने प्रस्तावित केलेल्या पेरणी आराखड्यानुसार, तालुक्यातील सरासरी पेरणी क्षेत्र ४५ हजार २९३ हेक्टर आहे. यापैकी यावर्षी ४३ हजार १९८ हेक्टर क्षेत्रावर, खरीपाच्या लागवडीखाली येण्याचा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे. हे प्रमाण खरीपाच्या लागवडीखालील क्षेत्राच्या , ९५.३७ टक्के आहे. यावर्षीच्या खरीप हंगामासाठी ज्वारी ९८ हेक्टर, तूर १० हजार ८५० हेक्टर, मूग ५० हेक्टर, उडीद ५० हेक्टर, सोयाबीन १४ हजार ८०० हेक्टर, कापूस १७ हजार २०० हेक्टर, तर इतर पिकांसाठी १५० हेक्टर इतके क्षेत्र, आपल्या नियोजनात प्रस्तावित केले आहे.

मागील वर्षाच्या तुलनेत यंदा सोयाबीन व कापूस पिकाच्या क्षेत्रात वाढ होणार, असल्याचा अंदाज कृषी विभागाने केलेल्या नियोजनामध्ये व्यक्त केला आहे. मागील वर्षीच्या पेरणी अहवालानुसार तालुक्यात ज्वारी ६७ हेक्टर, तुर ९ हजार ३५० हेक्टर, मूग ३६ हेक्टर, उडीद ४५ हेक्टर, सोयाबीन १४ हजार ७५३ हेक्टर तर कापूस १६ हजार ४१२ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती. यंदाच्या नियोजनात कापसाच्या क्षेत्रात जवळपास ८०० हेक्टरपेक्षा अधिक, वाढ होणार असल्याचा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे.

तालुक्यातील शेतकऱ्यांचा खरीप हंगाम सुरळीत पार पडावा. यासाठी कृषी विभागाने बियाण्यांचेही नियोजन केले आहे. त्यानुसार सोयाबीन बियाण्यांची ११ हजार १०० क्विंटल, कापूस ४३० क्विंटल, तूर १ हजार ६२७.५० क्विंटल, मूग ७.५० क्विंटल, उडीद ७.५० क्विंटल तर ज्वारी ९.८० क्विंटल बियाण्यांची मागणी तालुका कृषी विभागाकडून करण्यात आली आहे. सर्वच वाणांच्या बियाणांची उपलब्धता बाजारात सुरू झाली आहे.

शेतकऱ्यांना प्रमाणित बियाण्यांचाच वापर करावा. पेरणी योग्य पाऊस झाल्या शिवाय, पेरणी घाई करू नये.तसेच पेरणी आधी बियाण्यांवर,बिज प्रक्रिया करूनच पेरणी करावी.त्याच प्रमाणे माती परीक्षण करून , रासायनिक खतांचा मर्यादित वापर करावा . शेतकऱ्यांनी शक्यतोवर,अमर्याद रासायनिक खतांचा वापर टाळावा. असे आवाहन तालुका कृषी अधिकारी प्रवीण मोहोड यांनी शेतकऱ्यांना केले आहे.

# मनपाकडून उष्णतेच्या लाटेबाबत जनजागृती

## नागरिकांसाठी मार्गदर्शक सूचना जारी

**अमरावती/का.प्र.**

राज्यात यंदा उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून अमरावती शहरातही उष्णतेच्या लाटेचा प्रभाव मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. तापमानात सातत्याने होत असलेली वाढ, दुपारच्या वेळेतील कडक उन्हाचा तडाखा आणि वाढलेली उष्णता यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिकेने शहरस्तरावर उष्णतेच्या लाटेचा प्रभाव कमी करण्यासाठी विशेष कृती आराखडा तयार केला असून नागरिकांसाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

महानगरपालिकेने नागरिकांना उष्माघात, निर्जलीकरण, थकवा, चक्कर येणे, उलट्या, डोकेदुखी यांसारख्या उष्णताजन्य आजारांपासून बचाव करण्यासाठी काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. विशेषतः लहान मुले, वृद्ध नागरिक, गर्भवती महिला, बाहेर काम करणारे मजूर, हृदयविकार किंवा उच्च रक्तदाब असलेले रुग्ण आणि मानसिक आजार असलेल्या व्यक्तींनी अतिरिक्त काळजी घ्यावी, असे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे यांनी स्पष्ट केले आहे.महानगरपालिकेने नागरिकांना तहान लागली नसली तरी वेळोवेळी भरपूर पाणी पिण्याचा सल्ला दिला आहे. शरीरातील पाण्याची कमतरता टाळण्यासाठी ओआरएस, लिंबूपाणी, ताक, लस्सी, फळांचे रस यांसारख्या द्रव पदार्थांचे सेवन करण्यास सांगितले आहे. प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत ठेवणे आवश्यक असल्याचेही सूचनांमध्ये नमूद करण्यात आले आहे.



टरबूज, खरबूज, संत्री, द्राक्षे, अननस, काकडी, कोबी यांसारखी पाण्याचे प्रमाण जास्त असलेली फळे आणि भाज्यांचे सेवन करण्यावर भर देण्यात आला आहे. त्याचबरोबर मद्यपान, चहा, कॉफी, कोल्ड ड्रिंक्स किंवा जास्त साखर असलेले पेय टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या पदार्थांमुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन निर्जलीकरणाचा धोका वाढू शकतो, असे आरोग्य विभागाने सांगितले.उष्णतेच्या लाटेचा सर्वाधिक प्रभाव दुपारी १२ ते ३ या वेळेत जाणवत असल्याने या कालावधीत शक्यतो घराबाहेर पडू नये, असे महानगरपालिकेने नागरिकांना सांगितले आहे. अत्यावश्यक काम असल्यास डोक्यावर टोपी, छत्री किंवा ओला टॉवेल वापरावा. हलक्या रंगाचे, सैल आणि सुती कपडे वापरण्याचा सल्लाही देण्यात आला आहे.

बाहेर काम करणाऱ्या नागरिकांनी सकाळी किंवा संध्याकाळच्या थंड वातावरणात कामे करण्याचे नियोजन करावे. दुपारच्या वेळेत कष्टाची कामे टाळावीत, असेही महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे.महानगरपालिकेने घरातील तापमान कमी ठेवण्यासाठी दिवसा खिडक्या आणि पडदे बंद ठेवण्याचा सल्ला दिला आहे. रात्री थंड हवा येण्यासाठी खिडक्या उघड्या ठेवाव्यात. पंखा, ओले कापड, स्प्रे बाटल्या आणि बर्फाचा वापर करून शरीर थंड ठेवण्याचा सल्लाही देण्यात आला आहे.

तसेच, स्वयंपाक शक्यतो सकाळी किंवा संध्याकाळी करावा. अतिउष्ण वेळेत स्वयंपाक टाळावा. स्वयंपाकघरात योग्य वायुवीजन राहण्यासाठी खिडक्या व दरवाजे उघडे ठेवावेत, असेही सूचनांमध्ये नमूद करण्यात आले आहे.एकटे राहणारे वृद्ध, आजारी व्यक्ती आणि लहान मुलांवर नियमित लक्ष ठेवण्याचे आवाहन महानगरपालिकेने केले आहे. उष्णतेमुळे त्यांना त्वरीत त्रास होण्याची शक्यता अधिक असल्याने त्यांच्या आरोग्याची दररोज विचारपूस करावी, असे सांगण्यात आले आहे.

उष्णतेच्या लाटेचा सामना करण्यासाठी महानगरपालिका, आरोग्य विभाग आणि आपत्कालीन यंत्रणा सतर्क करण्यात आल्या आहेत. शहरातील रुग्णालयांना आवश्यक तयारी ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या असून नागरिकांनी उष्माघाताची लक्षणे दिसल्यास त्वरित वैद्यकीय मदत घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.अमरावती महानगरपालिकेने नागरिकांना प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून स्वतःची आणि कुटुंबीयांची सुरक्षितता सुनिश्चित करण्याचे आवाहन केले आहे.

# झुरळांच्या देशा, नेपाळकडे दिशा...

सहिष्णुतेचा भंग झाला की, संयम आणि नियम एकत्रच तुटतात व विद्रोह,बंड किंवा बदल घडणाऱ्या घटना निर्माण व्हायला सुरुवात होते हा नियम प्रत्येकवेळी लागू होतो.सहिष्णुता म्हणजे सन्मानजनक विचाराची,संस्कृतीची, धारणेची,आवडी–निवडीची किंवा अभिव्यक्तीची आदरार्थ भावना आहे.त्यामुळे त्याला एक सन्मानजनक मर्यादा आहे.त्याची पायमल्ली झाल्यास होणारे परिणाम लक्षात घेता,त्याची व्याप्ती सुद्धा ध्यानात ठेवणे अत्यावश्यक आहे.त्याला विवेकशीलतेचा आधार मानल्या जातो.

मागील आठवड्यापूर्वी भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य सरन्यायाधीशांच्या वक्तव्याचा परिणाम लक्षात घेता समाज माध्यमावर निर्माण झालेली खदखद राजकीय समीकरणाचे दूरदर्शी फेरबदल वाटत आहे.बेरोजगारीचा प्रचंड तणाव देशात असताना, वातानुकुलित दालनातून, त्याचसोबत संवैधानिक




आसनावरून देशातील युवापिढीची अभिव्यक्ती किंवा स्थितीग्रस्त परिस्थितीची अशा शब्दात अवहेलना केली जाते.

युवा पिढीला झुरळ व परजीवी यांच्या कक्षेत पाहण्याची दृष्टी म्हणजे मानव सन्मान हनन होत असल्यासोबतच, न्यायपिठाच्या आसनस्थ पदाची गरिमा व आस्था किंवा त्यापदाची गांभीर्याने पाहण्याची भूमिका निश्चितच प्रश्नांकित आहे. एकीकडे झुरळाची जात वैज्ञानिक संशोधनातून सृष्टीतील सर्वात (डायनासोरकालीन) जुनी आणि त्याचे विविध वैशिष्ट्ये (फक्त शिरच्छेद अंत) सांगणारी आहे.त्यामुळे झुरळ का असेना स्वतःची ओळख निर्माण करून दिल्यामुळे उपहासातून प्रतिशोधाची खदखद उफाळून येत असल्याचे युवापिढीने समाज माध्यमावर दाखवून दिले. आणि देशभर समाजमाध्यांच्या आधाराने निर्माण होत असलेली वैचारिक संघटना एकत्र होण्याची स्पेस भरून निघणार असल्याचे चिन्ह दिसत आहे.

वैचारिक निष्ठा असणारे कोट्यावधी तरुण आपली भूमिका स्पष्ट करीत असल्याने सरकारची जीर्ण होत चाललेली अच्छेदिन ची प्रतिमा दीन दयाल व्हायला सुरुवात झाली आहे.कारण अंधभक्तीं आणि जागतिक रणसंग्रामाची जुळवाजुळव होत नसल्याने आम्हाला काटकसरीचे आवाहन झेलण्याची वेळ सर्वांच्या लक्षात येत आहे.पेट्रोलची त्रिरुपी किंमत,इंधनवायूची कोंडी!ह्या सर्व परिस्थितीमध्ये महागाईचे वादळ नक्कीच उठणारे वातावरण आणि त्यात युवाशक्तीच्या संयमावर न्याय आसनावरून केलेले वक्तव्य म्हणजे नेपाळी मार्गाकडे वाटचाल आहे.

नेपाळ शेजारी देश आहे त्यामुळें तिथे सोशल मिडिया सोबतच भारतात कार्यरत असलेले असंख्य नेपाळवासी संदेश देण्यासाठी हजर आहे.त्यामुळे झेन जी मध्ये स्फोटक विधानांचा शिरकावा झाल्यास भारत देशाची स्थिती राष्ट्र संत तुकडोजी महाराजांच्या 'कही मनो भारत बाशिंदो अब आई बिपत बडी भारी' या भजनात व्यक्त झाली आहे.

राजकीय अराजकता वाढली की जनतेचा तिसरा डोळा उघडतो.नवनिर्वाचित मुख्यमंत्री विजय थलपती युवाशक्तीचे प्रेरणास्थान उगवत्या सूर्याप्रमाणे देशात निर्माण झाले.त्यामुळे आता झुरळांच्या देशाची कमाल हळूहळू दिसायला सुरुवात होईल.कारण सोशल मिडियाची क्रांती ही वादळी आहे.वादळाचे परिणाम नेहमीच नुकसानदायक होत असले तरी ते वादळ निसर्गाचे संतुलन ठेवण्यासाठी असते हा प्राकृतिक नियम पाळावा.त्यामुळे झुरळाच्या देशाला नेपाळचा मार्ग अंमलात आणल्यास न्याय, नीती,राजकारण याची शुद्धता करण्यासाठी युवा शक्ती सक्षम आहे.कारण त्यांनी एक तप एक टक पाहिले आणि भाई और बहनो!मित्रों!! प्यारे देशवासियो हे ऐकले त्यांची संयम पातळी आता 'कोक्रोज' या शब्दाने ओलांडली आहे.समाज माध्यमाचे गांभीर्य आय टी सेल समजू शकते. हे वादळ आता थांबायला नाही तर बदलायला आले आहे. गीतेत कृष्ण उवाच 'यदा यदा ही धर्मस्य' आता आठवतो.कारण न्यायासन धर्म प्रधान आहे.त्यावरून असे उद्गार आले,तर त्या स्थानाची ऊर्जा या देशाला न्याय देण्यासाठी कुठले रूप धारण करेल याचे भाकीत अनाकलनीय आहे.देशस्थ नागरिक म्हणून ते समजून घेणे आपला धर्म आहे. सध्या मेलोडी राहून गोडवा जपला जावा.

**डॉ. प्रवीणकुमार राऊत**
भारत सेवक समाज
मो.७७९८६४५५६५

# रोममध्ये 'मेलोडी' मोमेंट

रोममधील 'मेलोडी' मोमेंट सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांना भारतातील प्रसिद्ध 'पार्ले मेलोडी' चॉकलेटचे पाकीट भेट दिले आहे. पंतप्रधान मोदी यांच्या ५ देशांच्या राजनैतिक दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात रोममध्ये या दोन्ही नेत्यांची भेट झाली. यावेळी त्यांनी या गोड भेटीद्वारे सोशल मीडियावरील लोकप्रिय मीम्सचा संदर्भ साधत डिजिटल जगताचे लक्ष वेधून घेतले. जॉर्जिया मेलोनी यांनी स्वतः त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवर या प्रसंगाचा एक सुंदर व्हिडिओ शेअर केला. व्हिडिओमध्ये त्या आनंदाने म्हणत आहेत, 'पंतप्रधान मोदींनी आमच्यासाठी खूप खूप छान टॉफी आणली आहे'.एकत्र म्हटले 'मेलोडी': व्हिडिओच्या शेवटी दोन्ही नेत्यांनी हसत एकत्र 'मेलोडी' असा उच्चार केला, ज्यामुळे हा व्हिडिओ इंटरनेटवर तुफान व्हायरल झाला आणि काही तासांतच त्याला करोडो व्ह्यूज मिळाले.




सोशल मीडिया युजर्स बऱ्याच काळापासून नरेंद्र मोदी आणि जॉर्जिया मेलोनी यांच्यातील चांगल्या मैत्रीपूर्ण संबंधांना 'Melodi' या नावाने संबोधतात.याआधी दुबईतील COP२८ परिषदेदरम्यान मेलोनी यांनी मोदींसोबतचा सेल्फी शेअर करताना `#Melodi' हा हॅशटॅग वापरला होता. आता थेट मेलोडी चॉकलेटची भेट देऊन दोन्ही नेत्यांनी इंटरनेटवरील या विनोदी आणि हलक्या-फुलक्या ट्रेंडला अधिकृतपणे दाद दिली आहे.

दरम्यान,ही टॉफी थेट आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीचा भाग बनल्याचे पाहून पारले कंपनीने आपल्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर हा व्हिडिओ शेअर केला.आणि कंपनीने कॅप्शनमध्ये आम्ही १९८३ पासून नात्यांमध्ये गोडवा आणत आहोत असे म्हटले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या रोम दौऱ्यात इटलीच्या पंतप्रधानांना पारलेची प्रसिद्ध मेलोडी टॉफी भेट दिली. ही आमच्या संपूर्ण कंपनीसाठी अत्यंत अभिमानास्पद गोष्ट आहे. पंतप्रधान मोदी नेहमीच भारतीय ब्रँड्स आणि उत्पादनांना आंतरराष्ट्रीय स्तरावर एक नवी ओळख मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असतात. आता या जागतिक सन्मानाला आणखी पुढे नेण्याची जबाबदारी आमची आहे. पारले मेलोडीला जागतिक स्तरावर पोहोचवल्याबद्दल पंतप्रधान मोदींचे मनापासून आभार मानतो.या गोड क्षणांशिवाय, या दौऱ्यात भारत आणि इटली दरम्यान व्यापार, संरक्षण, सागरी सुरक्षा आणि तंत्रज्ञान या धोरणात्मक क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्यावर महत्त्वाची द्विपक्षीय चर्चा पार पडली.

**प्रा डॉ सुधीर अग्रवाल,**
वर्धा
मो.९५६१५९४३०६

# जागतिक प्रीक्लॅम्पसिया दिन

आई होणे ही प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यातील सर्वात आनंदाची भावना असते. निसर्गाने आई बनण्याची ही सुंदर देणगी फक्त महिलांनाच दिली आहे. गरोदर स्त्रियांना स्वतःमध्ये या दरम्यान खूप बदल जाणवतात.महिलांचे आरोग्य हा आजही जगभरात चिंतेचा विषय आहे.गरोदरपणातील या जीवघेण्या गुंतागुंतीबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी २२ मे रोजी आयोजित केलेला जागतिक प्रीक्लॅम्पसिया हा दिवस, माता आणि बाळांचे संरक्षण करण्यासाठी लवकर निदान, धोक्याची चिन्हे समजून घेणे आणि योग्य प्रसूतिपूर्व काळजी घेण्याचे महत्त्व अधोरेखित करतो. २०२६वर्षीची संकल्पना(थीम)-'लक्षणे ओळखा. कृती करा (त्वरित कृती जीव वाचवते)' ही आहे. ही थीम गर्भवती आणि नवजात मातांना या आजाराच्या धोक्याच्या लक्षणांविषयी शिक्षित करण्याच्या अत्यंत गरजेवर प्रकाश टाकतो, कारण जीव वाचवण्यासाठी लवकर निदान होणे अत्यावश्यक आहे.प्रीक्लॅम्पसिया ही गरोदरपणातील २० आठवड्यां /बाळंतपणानंतर उद्भवणारी गंभीर स्थिती आहे, ज्यामध्ये हाय ब्लड प्रेशर (रक्तदाब वाचन दोन वेगवेगळ्या प्रसंगी १४०/ ९० एम एम ऑफ एच जी किंवा त्यापेक्षा जास्त असेल) आणि लघवीत प्रथिनांचे प्रमाण वाढते किंवा इतर चिंताजनक लक्षणे असतील. या समस्येमुळे यकृत आणि मूत्रपिंड यांसारख्या महत्त्वाच्या अवयवांना नुकसान पोहोचू शकते. प्रसूतीनंतरचे प्रीएक्लेम्प्सिया म्हणजे बाळंतपणानंतर होणारा उच्च रक्तदाब, सामान्यतः पहिल्या ४८ तासांत परंतु कधीकधी सहा आठवड्यांपर्यंत नंतरही.

गर्भधारणेपूर्वी उच्च रक्तदाबाचा इतिहास, बाळंतपणावेळी ३५ वर्षांपेक्षा जास्त वय असणे, गर्भधारणेपूर्वी किंवा गर्भधारणेदरम्यान मधुमेह असणे.किडनी रोग किंवा इतर दीर्घकालीन आरोग्य समस्या,गर्भधारणेपूर्वी लठ्ठपणा,प्रीएक्लेम्प्सिया/ उच्च रक्तदाबाचा कुटुंबातील इतिहास, पहिली गर्भधारणा.कारणे -प्रीक्लॅम्पसियाचे नेमके कारण अजूनही पूर्णपणे स्पष्ट झालेले नाही, परंतु खालील घटक यामागे असू शकतात अपूर्ण किंवा सदोष रक्तवाहिन्यांची निर्मिती (ज्या गर्भाशयात रक्त योग्यरित्या पोहोचू देत नाहीत). प्लासेंटा (वार) मधील बिघाड. कमकुवत रोगप्रतिकार प्रणाली. अनुवांशिकता (कुटुंबात आधी हा आजार असणे)

धोक्याची लक्षणे - तीव्र डोकेदुखी: अशी डोकेदुखी जी औषधोपचारानेही बरी होत नाही. दृष्टीदोष: अचानक अंधुक दिसणे, डोळ्यांसमोर काळे डाग येणे किंवा प्रकाशाची संवेदनशीलता.पोटदुखी: उजव्या बरगड्यांच्या खाली (पोटाच्या वरच्या भागात) तीव्र वेदना किंवा जळजळ.मळमळ आणि उलट्या: अचानक वारंवार मळमळणे किंवा उलट्या होणे.लघवी कमी होणे: लघवीचे प्रमाण खूप कमी होणे किंवा लघवी करताना त्रास होणे.

गुंतागुंत आणि धोके -जर वेळीच उपचार न घेतल्यास आई आणि बाळ दोघांसाठीही गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात: इक्लॅम्पसिया: जर प्रीक्लॅम्पसिया गंभीर झाला, तर गर्भवती महिलेला फिट/आकडी येऊ शकते, जी जिव घेणी ठरू शकते. इतर अवयवांचे नुकसान: यकृत आणि मूत्रपिंड निकामी होणे. रक्तस्त्राव: रक्ताच्या गुठळ्या तयार होण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो.बाळासाठी धोके: गर्भातील बाळाची वाढ खुंटणे, बाळ अकाली जन्माला येणे किंवा गर्भाशयातच बाळाचा मृत्यू होणे

प्रतिबंध: ज्या महिलांना उच्च रक्तदाबाचा धोका जास्त असतो, त्यांच्यासाठी डॉक्टर गर्भधारणेच्या १२ व्या आठवड्यापासून कमी डोसची ॲस्पिरिन घेण्याचा सल्ला देतात वजन आणि आहार: गरोदरपणात वजन नियंत्रित ठेवणे आणि आहारात मिठाचे प्रमाण मर्यादित ठेवणे कॅल्शियमचे सेवन: डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार कॅल्शियमयुक्त पदार्थांचा आहारात समावेश करणे

काळजी आणि व्यवस्थापन- नियमित तपासणी: गरोदरपणात नियमितपणे रक्तदाब आणि लघवीची तपासणी करून घेणे आवश्यक आहे. पूर्ण विश्रांती: डाव्या कुशीवर झोपल्याने गर्भाशयावरील भार कमी होतो आणि प्लेसेंटाला (वार) रक्तपुरवठा सुरळीत राहतो. औषधोपचार: रक्तदाब नियंत्रित ठेवण्यासाठी डॉक्टर दिलेल्या औषधांचे नियम काटेकोरपणे पाळा. बाळंतपण: प्रीक्लॅम्पसियाचा एकमेव आणि अंतिम उपाय म्हणजे सुरक्षित बाळंतपण होय गर्भधारणेची ३७ आठवडे पूर्ण झाल्यावर किंवा परिस्थिती गंभीर असल्यास डॉक्टर प्रसूतीचा निर्णय घेतात. वृक्ष रुपी परिवारात आणखी एक शाखा जोडणे म्हणजे गर्भधारणा. आता तयार व्हा तुमच्या बालपणीच्या खोडकर आठवणींना घेऊन कारण आता तुम्ही पुन्हा एकदा तुमचे बालपण जगणार आहात!


**तारा शर्मा**

# प्रसिद्धीच्या हव्यासापाई शहरांचे विद्रूपीकरण

तामिळनाडू राज्याचे नववे मुख्यमंत्री म्हणून सी.जोसेफ विजय यांनी अलीकडेच पदभार स्वीकारला.मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत सामान्य नागरिकांच्या हिताचे मोठे निर्णय घेण्याचा धडाका घेतला. लोकशाहीतील लोकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकप्रतिनिधींकडून स्वयंशिस्त, लोकहितांचे निर्णय घेणे, कायदा आणि नियमांचा आदर ठेवणे अधिक अभिप्रेत असते. लोकप्रतिनिधी जर बेशिस्तीने वागत असतील तर ते लोकनिंदेचे धनी आणि अविश्वासास पात्र ठरतात.या बाबींची जाणीव नवनिर्वाचित मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांच्या मंत्रिमंडळाने ठेवून स्वतःच्याच पक्षाच्या कार्यक्रमांचे, लोकप्रतिनिधींचे वाढदिवस,तसेच राजकीय उत्सवाच्या नावाखाली राजकीय नेते,कार्यकर्त्यांचे बॅनर्स, पोस्टर्स,सार्वजनिक रहदारीस अडथळा ठरणारे बॅनर्स,पोस्टर्स,फलकबाजीवर सक्त मनाईचे निर्देश दिले आहे. यामुळे राजकीय संस्कृतीत एक स्वागतार्ह बदल पाहायला मिळेल,अशी आशा बाळगायला हरकत नाही.

अनधिकृतपणे मोठमोठ्या शुभेच्छांच्या जाहिराती बॅनर्स लावण्याचा ट्रेंड केवळ तामिळनाडू पुरताच मर्यादित नसून; देशाच्या राजधानीपासून, राज्याच्या उपराजधानीपर्यंत, तर महानगरापासून तर गावखेड्यापर्यंत सवंग प्रसिद्धीचा ज्वर आढळून येतो.राज्यातील प्रमुख शहरात चौकांचौकात झळकणारे अनधिकृत होर्डिंग्स, फ्लेक्स, बॅनर्स, झेंडे हे सार्वजनिक सुरक्षितता,शहराचे सौंदर्य, आणि पर्यावरणीय दृष्टिकोनातून अत्यंत घातक आहेत.

गतवर्षी मुंबई उपनगरातील पार्किंग मध्ये अव्याढव्य होर्डिंग वादळाने कोसळून अपघात झाला होता. त्यात अनेक दुचाकी, चार चाकी वाहनांचे नुकसान झाले होते. राज्यात बॅनर्स फाटल्यामुळे वादाचे प्रसंग व जातीय तणावास कारणीभूत ठरले होते. सार्वजनिक मालत्तेचे नुकसान होईल अशा ठिकाणी मनमानी करून लावलेले बॅनर्स अनेक ठिकाणी आढळून येतात. विजेचे खांब, रस्ते, दुभाजक, झाडावर खेळ ठोकून बॅनर अडकले जातात. ज्यामुळे सार्वजनिक मालमत्तेचे विद्रूपीकरण होऊन आर्थिक नुकसानीस कारणीभूत ठरत आहे.लाखो रुपये खर्च करून चौकातील सौंदर्यकरण, उद्यानाचे वॉलकंपाऊंड, सरकारी इमारती, उड्डाणपूल, सार्वजनिक स्वच्छतागृहे, सरकारी शाळा, प्रवासी निवारे इत्यादी सरकारी मालमत्तेवर बेधडकपणे बॅनर्स लावले जातात. पादचाऱ्यांचा फुटपाथरुन चालण्याचा हक्क थेट आडवे बॅनर्स लावल्यामुळे संपुष्टात आला आहे. अनेकदा पादचाऱ्यांचे अपघात सुद्धा झाले आहेत.



राजकीय पुढाऱ्यांच्या सभा,मेळाव्याप्रसंगी पुढाऱ्यांच्या आगमनार्थ लावले जाणारे बॅनर्स तर अतिरेकच करतात.वाढदिवस, निवड,नियुक्ती, अभिनंदन, शुभेच्छा,श्रद्धांजली हे सामान्यता: बॅनर्सवर झळकणारे विषय आहेत.महापुरुषांचा विचार अंगीकारण्याऐवजी त्यांच्या जयंती, पुण्यतिथी निमित्याने शुभेच्छा अथवा आदरांजली समर्पित करणे कितपत योग्य? अर्थात मूळ असण्यापेक्षा दाखविण्याची स्पर्धा जणू आज भरलेली आहे. अशा प्रकारची बेलगाम डिजिटल पोस्टर्स वास्तविक प्रतिभावान विद्यार्थ्यांच्या विवेकतेवर अतिक्रमण करतात. शहरांचे विद्रूपीकरण करण्यात दररोज हजारो मीटर कापडांचा चुरडा करणारे, अनावश्यक विविध पक्षांचे, रंगांचे,संघटनाचे नेतृत्व करणारे कापडी झेंडे शहरांच्या विद्रूपीकरण्यास हातभार लावीत आहे.

राज्यात 'महाराष्ट्र मालमत्ता विद्रूपीकरण प्रतिबंध कायदा १९९५' अन्वये अनाधिकृत बेलगाम,बेशिस्त फ्लेक्स, होर्डिंगसवर प्रतिबंध आणण्याची खरी गरज आहे. आज जाहिराती करणारे अनेक डिजिटल, ऑनलाइन, सोशल मीडियाचे माध्यमे असताना पर्यावरण, अपघात, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसानास बाधक ठरणाऱ्या फ्लेक्सबाजींवर निर्बंध आणण्यासाठी पर्यायी नव्या धोरणाची अंमलबजावणी आखावी लागेल.

**शशिकांत तोटे**
दारव्हा,जि.यवतमाळ
मो.९१३०८३५४५८

# उत्तम संवादक-डॉ.आनंद नाडकर्णी

श्रध्दांजली

**उजाले अपनी यादो के साथ रहने दो।
न जाने जिंदगी की कौन सी गली मे
कब अंधेरा हो जाये!**

हा बशीर बद्र चा शेर अंबरीश मिश्र यांनी तुमच्या एका कार्यक्रमात पेश केला होता आणि तो तुम्हाला आवडला होता. पण इतक्या लौकर अंधार होईल असे वाटले नव्हते हो!

१९ जुलै २०२५ ला औरंगाबादेत डॉ. निकाळजे यांनी आयोजित केलेल्या 'निर्वाण 'कार्यक्रमात तुम्ही Dying with Dignity,`मृत्यूचा सन्मानपूर्वक स्विकार' यावर स्पष्टपणे मांडणी केली होती. या दिवशी माझी बहिण डॉ.सविता शेवटच्या घटका मोजत होती.तुम्ही भेटायला आलात तेव्हाच म्हणाला होता 'Living Will' विषयी बोलली होती तुझी बहीण माझ्याकडे. आमच्याच विचारांची आहे.' दोनच दिवसांनी तिनेही सन्मानपूर्वक मृत्यूचा स्वीकारच केला. तिच्या पश्चात मृत्यूच्या भयावह आठवणी आम्ही कोणीच जागवल्या नाहीत. याचे कारण अटळ मृत्यूला सामोरे जाताना करायची सर्व मानसिकता तुमच्या सारख्यानी म्हणजे डॉ राजेंद्र बरवे,डॉ. अनिल अवचट, डॉ. नरेंद्र दाभोळकर, डॉ. मुलमुले, डॉ.पाटकर डॉ संज्योत देशपांडे यांनी तयार केली होती. पण डॉ. आनंद तुमचे वैशिष्ट्य असे की तुम्ही मानसिक आजार, ताणतणाव, राग, अहंकार, संताप, दुःखा वेग, नैराश्य याची लक्षणे, कारणमीमांसा अतिशय सोप्या भाषेत रंजकपणे मांडली. आणि उपाय सुचवले. ज्या काळात 'वेड्याचा डॉक्टर' असे हिणवले जायचे आणि शॉक देण्यापलिकडे काही उपचार नाहीत असे समाजमन म्हणत असे.तेव्हा या समाजमनाला आकार देण्याचे, या शास्त्राविषयीचे अपसमज दूर करण्याचे काम तुम्ही हाती घेतले. त्यासाठी उत्तम संवादक बनला. अध्यात्म, इसपनीती, रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी यांच्या तील दृष्टांत सांगत मांडणी केली. ती बहुतेकांना रुचली. आणि दुसऱ्या टप्प्यात तुम्ही मानसोपचाराचे विश्वरूपदर्शनच घडवले की!अगदी हसत खेळत, प्रसन्न चेहरा ठेवत अगदी आनंदाने!मी सहज तुमचे विषय मोजले.किती ती विविधता!

ताणतणाव (Stress Management),/नैराश्य (Depression)/ चिंता, भीती, असुरक्षितता,/ आत्मविश्वास वाढवणे/ भावनिक बुद्धिमत्ता (Emotional Intelligence)/मानसिक आरोग्यावरील कलंक दूर करणे नातेसंबंध/पती-पत्नी संबंध/पालक-मुलांचे संवाद/ किशोरवयीन मुलांचे मानसिक प्रश्न/ पिढ्यांतील दरी (Generation Gap)एकटेपणा व वृद्धांचे मानसिक आरोग्य/व्यक्तिमत्त्व विकास/स्व-ओळख(Self-awareness)/ आत्मस्वीकार/यश-अपयश हाताळणे/जीवनमूल्ये/सकारात्मक विचारसरणी/निर्णयक्षमता/ व्यसनमुक्ती/दारू व अमली पदार्थांचे व्यसन/मोबाईल/स्क्रीन व्यसनव्यसनामागील मानसिक कारणे/पुनर्वसन व कुटुंबाची भूमिका/ समाज आणि मानसशास्त्र/स्पर्धात्मक जीवनशैलीचा मानसिक परिणाम/ माध्यमांचा मनावर परिणाम/बदलत्या शहरी जीवनातील ताण करिअर आणि मानसिक आरोग्य/आत्महत्या प्रतिबंध/अध्यात्म आणि मानसशास्त्र/ध्यान, शांतता, आत्मसंवाद'आनंद' या संकल्पनेचा मानसशास्त्रीय अर्थ/कला आणि मानसोपचार/ संगीत, साहित्य, नाटक, कविता यांचा मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम/ .कला हे उपचार माध्यम/सर्जनशीलता आणि मानसिक संतुलन/ संवेदनशीलता व भावनिक अभिव्यक्ती/स्वभाव-विभाव-व्यक्तिमत्त्व आणि स्वभावमनोगती /मनाचे प्रवाह व विचार/ गद्धेपंचविशी तारुणाई चो मानसिक विश्व/ कर्मधर्मसंयोग जीवन, मूल्ये आणि मानसिकता.



पण मला डॉ. आनंद तुमच्या विषयी वेगळेच खरे तर लिहायचे आहे. म्हणजे असे की तुमची पहिली भेट झाली ती १९८५ ला, जेव्हा अनंतरावांना मायस्थेनिया ग्रेव्हीस झाल्याचे निदान झाले आणि मुंबईच्या केईएम मध्ये त्यांच्यावर डॉ. सिंघल यांनी शस्त्रक्रिया केली होती. त्यावेळी डॉ. मोहिरे यांची देखरेख होती. आणि डॉ. रवि बापट,डॉ. देवल अनंतरावांशी गप्पा मारायला यायचे.तुम्हीही यांच्या सोबत आला एकदा आणि तुमची ओळख डॉ. देवल यांनी करून दिली तेव्हा अनंतराव म्हणाले होते, 'हो आमच्या योगेश्वरीच्या (अंबाजोगाई)प्राचार्य नाडकर्णी चा मुलगा ना?'त्यावर तुम्ही -प्रसन्न चेहऱ्याने हसत मान डोलावली होती. या काळात तुम्ही अनेकदा अनंतराव याना भेटायला येत. गंमती जमती सांगत. मला आठवते यावेळी तुम्ही ओबेस होता आणि पायात चालताना प्रॉब्लेम वाटायचा. तेव्हा तुम्हीच सांगून टाकले होते की पोलिओ मला झाला होता आणि नंतर हत्ती रोगाप्रमाणे पाय सुजायचे माझे. सामाजिक कृतज्ञता निधी साठी तुम्ही ठाणे परिसरात निधी संकलनाचे काम केल्याचे मला ठाऊक होते त्यामुळे तुमच्या विषयी आपुलकी वाटली होती.. पुढे म्हणजे १९८९ ला औरंगाबादला तुम्ही घरी आला तेव्हा सुषमा ने तुम्हाला 'आम्ही चालवत असलेल्या किलबिल शाळेत येता का मुलांशी गप्पा मारायला असे विचारताच तुम्ही तात्काळ हो म्हणाला. माझी मुलगी सानिया तेव्हा बालवर्गात होती. तेव्हा बाराखडीतील शब्दा पासून ,छोट्या वाक्या पासून तुम्ही मुलांकडून कविता करवून घेतल्या होत्या. पुढे २०२३ मध्येअनंत भालेराव प्रतिष्ठानचा पुरस्कार तुम्हाला देण्यात आला.डॉ.मंगेश आणि डॉ.वीणाने तुमच्या 'वेध'चे काम सुरू केले होते.डॉ नाडकर्णी तुम्ही भालेराव-पानट विस्तारित कुटुंबाचा भागच बनला.२०१८ ला डॉ संज्योत देशपांडे यांच्या 'अटळ मृत्यूला सामोरे जाताना'या पुस्तक प्रकाशनात तुम्ही डॉ. अनिल अवचट आणि सुनंदा अवचट यांच्या मृत्यू विषयक जे विवेचन केले आणि मृत्यूचा स्विकार त्यांनी कसा केला?हे फार प्रभावीपणे मांडले होते.ते मी एकदा डॉ. सविताला ब्रिफ केले होते. त्यावर ती सुद्धा तुमच्याशी अनेकदा बोलली होती ते आठवते.

डॉ सविताला तुमच्या सन्मानपूर्वक मृत्यूचा स्विकार या विषयी फार उत्सुकता होती .२०२४ मध्ये तिला समजले की आपल्याला टर्मिनल इलनेस आहे आणि त्यासाठी तिने पूर्ण तयारी करून ठेवली. तिची इच्छा होती तुम्ही ज्या पद्धतीने मांडणी करतात तसेच आपलेही झाले पाहिजे. दुर्दैवी योग असा की १६ जुलै २०२५ ला ती गंभीर झाली आणि डॉ निकाळजे यांनी तिला एमजीएम मध्ये दाखल केले.१९ जुलै ला डॉ. निकाळजे यांनी 'निर्वाण:मृत्यूचा सन्मानपूर्वक स्विकार'यावर तुमचा कार्यक्रम ठेवला होता. मी आणि सविता दोघेही ऐकायला जायचे ठरले होते. दवाखान्यात दाखल होण्यासाठी जाताना तिने या कार्यक्रमाचे निमंत्रण कोणा कोणाला पाठवायचे ते मला सांगितले होते. तुम्ही १८ जुलै ला तिला भेटायला आलात तेव्हा ती शेवटच्या घटका मोजत होती.तिच्या आग्रहा मुळे निर्वाण च्या कार्यक्रमास मी बसलो. तेव्हा माणूस हा मर्त्य प्राणी आहे.हे म्हणताना आपल्याला काही वाटत नाही. पण म्हणून मी मरणार आहे हे वास्तव आपण स्वीकारत नाही.

**।। आपुले मरण पाहिले म्या डोळा
जाहला तो सोहळा अनुपम्य ।।**

या संत वचनातील म्या म्हणजे 'मी त्व'आणि ते विरघळताना, जाताना मी पाहिले म्हणून तो सोहळा अनुपम्य ठरतो. हा तुम्ही दिलेला दृष्टांत मी सविता च्या कानाजवळ सांगितला. तेव्हा ती कोमात होती. पण तिने तो स्वीकारला असणार कारण तसे आगावू निर्देश तिने देऊन ठेवलेले होते.Understanding Deep Significance of Death, किंवा माझ्या जन्माचे सार्थक झाले आहे आता 'मीत्व' सोडण्याची वेळ आली आहे, मृत्यू हे स्थित्यंतर आहे या तुमच्या मांडणीची प्रचिती यावेळी आली.डॉक्टर तुमचे उपचार घेत असलेले काही मित्र रुग्ण तुमच्या कार्यक्रमात येतात तेव्हा तुम्ही आम्हाला अनेकदा आधीच कल्पना देऊन ठेवलेली असायची की ते असे काहीतरी वागतील, हट्ट धरतील पण तुम्ही समजून घ्या. मला याचे नेहमीच अप्रूप वाटत आले आहे.

तुम्ही नाशिकला सह्याद्री च्या मार्फत 'कर्ता शेतकरी' संवाद मालेत शेतकऱ्यांच्या मानसिक पुनर्वसनासाठी केलेल्या प्रयोगा विषयी सुद्धा आपली चर्चा झाली होती. माझ्याकडे ॲग्रोवन ला असताना आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांच्या मुलाखती रेकॉर्ड केलेल्या आहेत हे तुम्हाला सांगितल्यावर तुम्ही मागे लागला होता माझ्या.काढून ठेवलेल्या त्या सीडी आता मला कायम तुमची सल देत राहणार.पण तुमच्याच मांडणी नुसार तुम्ही तुमचे जीवन दुसऱ्यांना आनंद देत सार्थकी लावले आणि अनेकांची आयुष्ये आनंदमयी केलेत.अगदी अलीकडे डॉ उलमुले यांच्याशी मिर्झा गालिब वर तुम्ही भरभरून बोलला होता ते आठवते. आणि गालिबचा तो अस्तित्ववाद.वाह डॉ. नाडकर्णी!!

**बे लिबास आए थे
इस दुनियाँ में गालिब,
सिर्फ एक कफन के लिए
इतना सफर कर गये.....**

**-निशिकांत भालेराव**

## ...थोडक्यात...

### किड्स पॅराडाईजच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेत बाजी

**पातूर :** महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाअंतर्गत घेण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेत पातुरच्या किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलच्या सात विद्यार्थ्यांनी बाजी मारली आहे.महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्तीपरीक्षा घेण्यात येत असते.

यावर्षी इयत्ता चौथी, पाचवी व सातवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात आली होती. यामध्ये पाचवी आणि आठवी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. यामध्ये पातुर येथील किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलच्या सात विद्यार्थ्यांनी बाजी मारली आहे.

### जर्मनीमध्ये 'शिका आणि कमवा'ची सुवर्णसंधी

**अकोला :** राज्य शासनाच्या महाराष्ट्र फॉर होलिस्टिक इंटरनॅशनल मोबिलिटी अँड अॅडव्हांसमेंट उपक्रमांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय टॅलेंट मॅनेजमेंट कंपनी मॅजिक बिलियन यांच्या संयुक्त सहकार्याने युवक-युवतींसाठी जर्मनीमध्ये शिक्षणासह रोजगाराची मोठी संधी उपलब्ध झाली आहे.

जिल्ह्यातील इच्छूक उमेदवारांनी लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त प्रफुल्ल शेळके यांनी केले आहे.'शिका आणि कमवा' या संकल्पनेवर आधारित असलेल्या 'ऑसशबलडुंग (अँप्रेंटिसशिप) कार्यक्रमांतर्गत उमेदवारांना जर्मनीमध्ये व्यावसायिक प्रशिक्षण घेत असतानाच प्रत्यक्ष कामाच्या अनुभवा सोबतच आकर्षक मानधन मिळण्याची संधी प्राप्त होणार आहे.

### शक्ती धाममध्ये दोन दिवसीय मंगलपाठचे आयोजन



**अकोला :** अधिक मास अतिशय पवित्र, पुण्यदायी आणि भक्तिमय मानला जातो. या काळात भजन-सत्संग केल्याने पुण्याची प्राप्ती होते व शाश्वत सुख मिळते. याच अनुषंगाने स्थानिक गीता नगर येथील शक्ती धाममध्ये दोन दिवसीय मंगलपाठ व भजन संध्या आयोजित करण्यात आली आहे. शनिवार दिनांक २३ मे रोजी दुपारी ४ वाजता धाम मध्ये शाकांभरी माता यांचा सामूहिक मंगलपाठ होणार असून नंतर भव्य भजन संध्या होणार आहे. त्याच प्रमाणे रविवार दिनांक २४ मे रोजी दुपारी ४:३० वाजता जिण माता यांचा मंगलपाठ होणार असून नंतर भव्य भजन संध्या आयोजित करण्यात आली आहे. या उत्सवात भक्त आपल्या परीने प्रसाद बनवून आणू शकतात; किंवा आर्थिक मदत अथवा स्वयंसेवा करून या पुण्यकार्यात सहभागी होऊ शकतात. मातेंच्या दरबारी केलेली छोटीशी ही मदत अनेक पटींनी परत मिळते. अधिक मासात जे भक्त कार्यक्रम करावयास इच्छुक असतील त्यांनी शक्ती धाम सेवा समिती गीता नगर येथे संपर्क साधून या मासाचा लाभ घेण्याचे आवाहन शक्ती धाम सेवा समितीने केले आहे.

### गोमाता राज्यमाता संवाद यात्रा बैठक संपन्न



**अकोला :** गोमातेचे संरक्षण संवर्धन व गो सेवेच्या कार्याला अधिक गती व बळकटी देण्यासाठी गोमाता राजमाता संवाद यात्रा नियोजन बैठक नुकतीच मोठ्या उत्साहात संपन्न झाली.पशु संवर्धन विभाग व गोसेवा आयोगाच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक रामनगर येथील आदर्श घोषवा प्रकल्प कार्यालयात संपन्न या अकोला जिल्हा गोशाळा महासंघद्वारा नियोजन बैठकीत मार्गदर्शक म्हणून गोसेवा आयोगाचे सदस्य व गोसेवक उद्धव नेरकर, जिल्हा पशु संवर्धन उपायुक्त डॉ सौं निताताई गोडबोले, डॉ राठोड साहेब, डॉ स्नेहल पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून गोरक्षण संस्थेचे सचिव विजय जानी, गोशाळा महासंघाचे अध्यक्ष रवी चांडक, रा स्व संच्या गोसेवा गतिविधी विदर्भ प्रांतचे प्रमुख प्रा विवेक बिडवई, जेंष्ठ गोसेवक प्रकाश वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते.सर्व प्रथम आदर्श गोसेवा व अनुषंगान प्रकल्प च्या वतीने उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.या नियोजन बैठकीत जिल्हा पशु संवर्धन उपायुक्त डॉ सौं निताताई गोडबोले यांनी गोसेवा आयोग स्थापना व उद्धीष्ट बाबत मार्गदर्शन करीत गोसंवर्धन वर शासकीय योजनांची माहिती दिली. तर गोसेवा आयोगाचे सदस्य उद्धव नेरकर यांनी संवाद यात्रेबाबत सविस्तर मार्गदर्शन करीत जिल्ह्यातील समस्त गोसेवा संस्थानी यात सहभागी होण्याचे आवाहन केले.या नियोजन बैठकीत जिल्हा पशु संवर्धन उपायुक्त डॉ सौं निताताई गोडबोले या महिन्यात सेवानिवृत्त होत असल्याबद्दल त्यांचा अकोला जिल्हा गोशाळा महासंघ व जिल्ह्यातील सर्व गोशाळाच्या वतीने गोमाता प्रतिमा बहाल करून त्यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.


### जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार नामे श्री. राजेन्द्र मुकुंदराव ओहे, रा. वल्लभ नगर, ता. जि. अकोला यांची मालमत्ता ज्याचा सव्हे क्र. ६३/६४ असुन गट क्र. १२/१६ यामध्ये येते. तसेच त्यांचा ग्रा.पं. मालमत्ता क. ९६ असा असुन, घर क्र. ७० आहे. अशी मालमत्ता त्यांची वडीलोपार्जीत वारसाहक्काने त्यांच्या ताब्यात व उपभोगात असुन सदर मालमत्तेच्या मालकी बाबत, अथवा ताब्या बाबत कोणाला काही आक्षेप, हरकत अथवा उजर असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रकाशनापासुन ८ दिवसाच्या आत संबंधीत दस्त व लेखी हरकत अर्ज दाखल करावी अन्यथा तदनंतर कुणाचाही उजर चालणार नाही.

अकोला.
दिनांक २१/०५/२०२६

**अॅड. डि. एस. मनवर**
मु.पो. कटयार, ता. जि. अकोला.
मो.९५५२४९९५०९



जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १६६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


# अकोला काँग्रेसची 'प्रकाशवाट' ; संघटन सृजनातून नव्या सामाजिक समीकरणांचा संदेश

## विजयाची राजकीय गणिते, बहुजन प्रतिनिधित्व आणि संघटन पुनर्बांधणीवर दिल्लीचा भर



■ प्रतिनिधी | अकोला ■

*महाराष्ट्र काँग्रेसच्या संघटनात्मक फेरबदलांमध्ये अकोल्याकडे विशेष लक्ष केंद्रित झाल्याचे चित्र दिसत असून, शहर काँग्रेसच्या नेतृत्व निवडीमधून पक्षश्रेष्ठींनी स्पष्ट सामाजिक आणि राजकीय संदेश दिल्याची चर्चा काँग्रेस वर्तुळात रंगू लागली आहे. 'संघटन सृजन अभियान' अंतर्गत झालेल्या नियुक्त्यांमध्ये संघर्ष करणाऱ्या कार्यकर्त्यांना प्राधान्य देतानाच, विजयाचे राजकारण आणि सामाजिक प्रतिनिधित्व या दोन्ही निकषांचा विचार करण्यात आल्याचे मानले जात आहे.*

### 'माझे नाव घ्या, पसंतीक्रम मनाने ठरवा' ; तायडे यांची कार्यकर्त्यांशी थेट जोड

संघटन सृजन अभियानादरम्यान प्रकाश तायडे यांनी गट-तटाच्या पलीकडे जाऊन प्रत्येक काँग्रेस कार्यकर्त्यांपर्यंत थेट संपर्क साधल्याचे सांगितले जाते. 'माझे नाव घ्या, पण पसंतीक्रम तुमच्या मनाने टाका,' असा संदेश देत त्यांनी संघटनात्मक लोकशाहीचा आग्रह धरल्याची चर्चा आहे. काँग्रेसमधील पारंपरिक राजकीय वारसा आणि प्रत्यक्ष कार्यकर्ता संपर्क यांचे मिश्रण त्यांच्या शैलीत दिसून आल्याचे काँग्रेसच्या काही ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांचे मत आहे.

अध्यक्षपदासाठी अनेक इच्छुक असतानाही अंतिम निर्णय एका नावावर झाला; मात्र अकोला जिल्ह्यात काँग्रेसला सामूहिक नेतृत्वाची आवश्यकता असल्याची भावना पक्षांतर्गत स्तरावर कायम आहे. प्रकाश तायडे हे स्वतः निष्ठावंत काँग्रेस कार्यकर्ते म्हणून ओळखले जात असल्याने, संघटनाला पुन्हा सक्रिय करण्याची जबाबदारी आता त्यांच्या खांद्यावर येऊन पडली आहे.

### दिल्लीच्या निर्णयावर नाराजीची किनार

या सर्व सकारात्मक घडामोडींमध्ये काँग्रेसमधील काही ज्येष्ठ आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांबाबत पक्षश्रेष्ठींनी पुरेशी दखल घेतली नसल्याची खंतही व्यक्त होत आहे. गेली चार दशके काँग्रेसमध्ये सक्रिय असलेले प्रदीप वखारिया आणि राजेश राऊत यांच्यासारख्या नेत्यांकडे दुर्लक्ष झाल्याची भावना काँग्रेसच्या एका गटात आहे. या तिघांची संघटनात्मक पात्रता आणि दीर्घकाळाची निष्ठा निर्विवाद असल्याचे अनेक कार्यकर्त्यांचे मत आहे. दिल्लीच्या राजकीय समीकरणात ही नावे बसली नसली, तरी काँग्रेसचा विचार त्यांच्या नसानसांत भिनलेला आहे, अशी भावना त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केली जात आहे. पक्षश्रेष्ठींनी त्यांना संघटनात्मक संधी दिली नसली तरी मुंबईतील प्रदेश नेतृत्वाने त्यांच्या अनुभवाचा सन्मान राखावा, अशी अपेक्षा काँग्रेसच्या जुन्या कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे.

### 'ओबीसी की मराठा' नव्हे; 'तो काँग्रेसचा आहे' हा विचार महत्त्वाचा

अकोला काँग्रेसमधील नव्या बदलांकडे केवळ जातीय समीकरणांच्या चौकटीत न पाहता संघटनात्मक पुनर्बांधणीच्या दृष्टीने पाहण्याची गरज असल्याचे पक्षातील काही नेत्यांचे मत आहे. 'ओबीसी की मराठा, कुणबी की माळी' या चौकटींपलीकडे जाऊन 'तो काँग्रेसचा आहे' हा विचार केंद्रस्थानी ठेवण्याचा संदेश या नियुक्त्यांमधून देण्यात आल्याची भावना व्यक्त होत आहे.

मरगळ आलेल्या आणि अंधारलेल्या काँग्रेस संघटनेत पुन्हा 'प्रकाश' आणण्याचा प्रयत्न पक्षश्रेष्ठींनी केला असून, ही 'प्रकाशवाट' आगामी काळात विधानसभेपासून संसदेपर्यंत कशी पोहोचवायची, यावर आता अकोला काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची खरी कसोटी लागणार आहे.

अकोला पश्चिम आणि बाळापूर विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसच्या तुलनेने सकारात्मक कामगिरीसह लोकसभा निवडणुकीत दोन्ही मतदारसंघांमध्ये मिळालेली आघाडी, तसेच बाळापूर नगरपरिषदेमधील यशस्वी राजकीय समीकरणे या पार्श्वभूमीवर दिल्लीतील नेतृत्वाने स्थानिक संघटनात्मक ताकदीची दखल घेतल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे, गेल्या काही वर्षांत केंद्र सरकारविरोधातील विविध आंदोलनांमध्ये आघाडीवर राहिलेली प्रकाश तायडे आणि महेंद्र गवई यांची जोडी काँग्रेसच्या 'फ्रंटलाइन' नेतृत्वामध्ये सातत्याने सक्रिय राहिली होती. त्यामुळेच संघटनात्मक नियुक्त्यांमध्ये संघर्षशील आणि कार्यकर्त्यांशी थेट संपर्क ठेवणाऱ्या नेतृत्वाला प्राधान्य मिळाल्याचे मानले जात आहे.

**बहुजन समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न?**

राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने गेल्या काही काळात बहुजन, ओबीसी आणि वंचित घटकांना पक्षाच्या केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. अकोल्यातील नियुक्त्यांमधून त्याच धोरणाची झलक दिसल्याचे मानले जात आहे. स्वराज्य भवनमध्ये सातत्याने सक्रिय राहणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये अनुसूचित जाती समाजातील कार्यकर्त्यांची लक्षणीय उपस्थिती असल्याची चर्चा काँग्रेस वर्तुळात कायम होती. अशा पार्श्वभूमीवर शहर काँग्रेसच्या अध्यक्षपदी वंचित समूहातील नेतृत्वाला संधी देत पक्षश्रेष्ठींनी सामाजिक समावेशकतेचा स्पष्ट संदेश दिल्याचे बोलले जात आहे. अकोला पश्चिममध्ये आमदार साजिद खान पठाण यांना बौद्ध वस्त्यांमधून मिळालेला प्रतिसाद आणि मतदानाचा कलही दिल्लीतील नेतृत्वाने गांभीर्याने घेतल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. त्यामुळेच त्या समाजातील प्रतिनिधीच्या हाती शहर संघटना सोपवून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न काँग्रेसने केल्याची चर्चा सुरू आहे. महेंद्र गवई यांच्यासारख्या '२४ तास कार्यकर्ता' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे संघटनेत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## जनगणना-२०२७ च्या तयारीचा आढावा

### उपसंचालक यशवंत पाटील यांची अकोला मनपाला भेट



■ प्रतिनिधी | अकोला ■

जनगणना-२०२७ च्या पार्श्वभूमीवर अकोला शहरात सुरू असलेल्या जनगणना कामांचा आढावा घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या जनगणना विभागाचे उपसंचालक मा. यशवंत पाटील यांनी बुधवारी अकोला महानगरपालिकेला भेट दिली. यावेळी मनपा प्रशासनाने सुरू केलेल्या कामकाजाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांनी पुष्पगुच्छ देऊन श्री पाटील यांचे स्वागत केले. त्यानंतर मनपा आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. सुनिल लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या जनगणना प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीदरम्यान श्री पाटील यांनी सर्व चार्ज अधिकाऱ्यांशी संवाद साधत जनगणनेच्या कामात येणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच काम अधिक प्रभावी आणि अचूक पद्धतीने पार पाडण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी मनपा उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी दिलीप जाधव, जनगणना विभाग प्रमुख अनिल बिडवे, जिल्हास्तरीय समन्वय अधिकारी कार्तिक गडलिंग यांच्यासह चारही झोनचे चार्ज अधिकारी तथा सहायक आयुक्त विठ्ठल देवकते, देविदास निकाळजे, राजेश सरप आणि गजानन घोंगे उपस्थित होते.

दरम्यान, जनगणना-२०२७ चे काम शहरात सुरू असून नागरिकांनी प्रगणकांना अचूक माहिती देऊन या राष्ट्रीय उपक्रमात सहकार्य करावे, असे आवाहन उपसंचालक यशवंत पाटील यांनी केले.

## पंचवीस वर्षांपासून वार्ड नऊ तहानलेला; प्रशासन बेशुद्ध

### नगरसेविका संतप्त : आमरण उपोषणाचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोट ■

शहरातील वार्ड क्रमांक ९ मध्ये गेल्या दोन दशकांहून अधिक काळापासून असुरळीत पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांचे हाल होत असून प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात आता संताप उफाळून आला आहे. 'लवकरच पाणीपुरवठा सुरळीत करू,' अशी वर्षानुवर्षे दिली जाणारी आश्वासने प्रत्यक्षात मात्र हवेतच विरल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

इंदिरा नगर वार्ड क्रमांक ९ येथील नगरसेविका मुमताज खानम इम्रान खान यांनी



जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करत वार्डातील गंभीर परिस्थिती मांडली आहे. उन्हाळ्याच्या तीव्रतेत महिलांना, ज्येष्ठ नागरिकांना आणि लहान मुलांना पाण्यासाठी अक्षरशः वणवण करावी लागत असल्याने परिसरात तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, वारंवार तक्रारी करूनही पाणीपुरवठा विभागाकडून केवळ तोंडी आश्वासने दिली जात आहेत. मात्र प्रत्यक्षात नळ कोरडेच राहत असल्याने दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. स्वच्छतेपासून आरोग्यापर्यंत अनेक प्रश्न निर्माण झाले असून प्रशासनाचा हलगर्जीपणा नागरिकांच्या जिवावर बेतत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

'पाण्याअभावी काही अनुचित घटना घडल्यास त्याला पाणीपुरवठा विभाग जबाबदार राहील,' असा थेट इशाराच निवेदनातून देण्यात आला आहे. समस्या तातडीने न सुटल्यास २५ मे २०२६ पासून आमरण उपोषण छेडण्याचा निर्धार नागरिकांनी व्यक्त केला आहे. आता प्रशासन जागे होणार की नागरिकांची तहान आणखी वाढणार, याकडे संपूर्ण आकोटचे लक्ष लागले आहे.

### महानगरात नाट्य प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**अकोला :** पत्रकार कॉलनी नवयुवक क्रीडा प्रसारक बहुउद्देशीय संस्था संचालित सिद्धी गणेश प्रोडक्शन मागील १३ वर्षापासून महानगरात निशुल्क नाट्य प्रशिक्षण शिबिर आयोजित करीत असून या वर्षी ही दि २५ मे ते ३१ मे पर्यंत नित्य सकाळी १० ते साय ५ वाजेपर्यंत सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात हे निशुल्क नाट्य प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आलेले आहे. १४ वर्षावरील मुला मुलींना या शिबिरात भाग घेता येणार आहे. या शिबिरात सिने व नाट्य सृष्टीतील अनुभवी कलावंत शिबिरार्थींना मार्गदर्शन करणार आहेत.


**Change In Name**

I have Changed My Name Form
**DAULAT BI**
-TO-
**SHAMIMBI SHAIKH HAKIM**
My residential Address in Hamza Plot, Washim Road Akola 444002.

**Change In Name**

I have Changed My Name Form
**KRISHNAKUMAR ASHISH BHAGAT**
-TO-
**KRUSHNAKUMAR ASHISH BHAGAT**
My residential Address in Near Agrasen Bhavan Balaji Plot, Khamgaon Dist Buldhana 444303

### जाहीर नोटीस

**विद्यमान जिल्हा न्यायाधीश- २ तथा अति. सत्र न्यायाधीश, अकोला यांचे न्यायालय**

गैरअर्जदार/गैरअपिलार्थी यांनी अपीलमध्ये चौकशी तारीख रोजी हजर होण्यासाठीची जाहीर नोटीस

प्रोसेस नं: १८४९ / २०२६ — तारीख : १६/०५/२०२६

Guardian Ward No. 314/2026 — Fix for: 01/07/2026

1) Smt. Jayshree Wd/o Vishal Tayade, 2) Viraj S/o Vishal Tayade, 3) Arya D/o Vishal Tayade, No. 02 and 03 being minor, hence represented through their natural guardian mother Smt. Jayshree Wd/o Vishal Tayade, All R/o Near Bouddha Mandir, Chikhalgaon, Post Chikhalgaon. Tq. and Dist. Akola

Vrs -- Nil

ज्याअर्थी या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी 'जिल्हा न्यायाधीश- २ तथा अति सत्र न्यायाधीश, अकोला' या न्यायालयामध्ये 'APPLICATION UNDER SECTION 8 OF THE HINDU MINORITY AND GUARDIANSHIP ACT, 1956 FOR PERMISSION TO SALE THE PROPERTY OF THE MINORS' दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. सदर प्रकरणामध्ये पुढील चौकशी तारीख ०१/०७/२०२६ ठेवलेली आहे.

त्याअर्थी आपणांस याव्दारे कळविण्यात येते की, जर आपण स्वत: किंवा आपले वकील अथवा आपल्या वतीने कायदेशीर बाजु मांडणारा व्यक्ती चौकशी तारखेला ०१/०७/२०२६ जिल्हा न्यायालयात सकाळी ११:०० वाजता हजर व्हावे, जर आपणापैकी कोणीही हजर झाले नाहीत तर सदर प्रकरणामध्ये आपल्या गैरहजेरीत कायदेशीर आदेश पारीत करण्यात येईल.आज दिनांक १६ माहे मे सन २०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

अकोला.
दिनांक :- १६/०५/२०२६
(शिक्का)
**आदेशानुसार**
**अधिक्षक**
न्यायीक विभाग, जिल्हा न्यायालय, अकोला.

### जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६२२/२०२६ — प्रोसेस नं.६५०१/२०२६
चौ.ता. २३/०६/२०२६ — दिनांक : ०७/०५/२०२६

**अर्जदार :** प्रकाश सुखदेव चव्हाण मो. नं. ९५२९१८६६३९ रा. किसनराव नंदाने मंगल कार्यालयासमोर, राव नगर, डाबकी रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** १. सिंधु सुनिल चव्हाण २. गोपाल सुनिल चव्हाण दोन्ही रा. किसनराव नंदाने कार्यालयासमोर, राव नगर, डाबकी रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.
**मयताचा पत्ता :-** मयत : रूख्मिनी सुखदेव चव्हाण
**पत्ता :-** रा. किसनराव नंदाने कार्यालयासमोर, राव नगर, डाबकी रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रूख्मिनी सुखदेव चव्हाण यांचे दि. १८/१२/२०१२ रोजी राहते घरी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)
**आदेशानुसार**
प्र.अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७०५/२०२६ — प्रोसेस नं.६१०५/२०२६
चौ.ता. ०७/०७/२०२६ — दिनांक : ०२/०५/२०२६

**अर्जदार :** १. जितेश प्रकाश खन्ना २. धर्मेश प्रकाश खन्ना बौद्धिकदृष्टया अक्षम असल्याने त्यांचे प्रतिनिधित्व त्यांची नैसर्गिक पालक आई श्रीमती मंदा प्रकाश खन्ना अर्जदार क. ४ यांच्याव्दारे केले जात आहे. ३. शैलेश प्रकाश खन्ना ४. श्रीमती मंदा प्रकाश खन्ना सर्व रा. सत्यश्री, गणेश हाउसिंग सोसायटी, गौरक्षण रोड, अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : श्री प्रकाश गुरूदयाल खन्ना
**पत्ता :-** रा.सत्यश्री, गणेश हाउसिंग सोसायटी, गौरक्षण रोड, अकोला. ४४४००४

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्री प्रकाश गुरूदयाल खन्ना यांचे दि. १०/०५/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७३४/२०२६ — प्रोसेस नं.६५१०/२०२६
चौ.ता. ०३/०७/२०२६ — दिनांक : ०७/०५/२०२६

**अर्जदार :** १. अरूण रामराव पांडव रा. बाभुळगाव जहागिर, ता. जि. अकोला. २. सौ. कमल गंगाधरराव बोरखडे रा. कोठा, दर्यापूर, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती. ३. सौ. विमल अशोक भोंबळे रा. संग्रामपूर, ता. संग्रामपूर, जि. बुलढाणा.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : किसनाबाई उर्फ कृष्णाबाई रामराव पांडव
**पत्ता :-** रा. बाभुळगाव जहागिर, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत किसनाबाई उर्फ कृष्णाबाई रामराव पांडव यांचे दि. २९/०६/२०१२ रोजी बाभुळगाव जहागिर, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

नेमता तारिख :- २४.०६.२०२६
चौकशी क्रमांक :- ०१/२०२६ कलम 50A(I) कलम ५० ( अ ) नुसार जाहिर नोटिस
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ५० ( अ ) अन्वये
**अर्जदार :-** १) पंकज लक्ष्मण श्रीवास्तव +1
वरिल सर्व राहणार धामणगाव ता. अकोट जि. अकोला

सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यांत येते की, १ ) श्री कान्होबा महाराज संस्थान नंदीपेठ अकोट जि. अकोला अे-८५३ या न्यासाचा कारभार व्यवस्थित व योग्य रितीने चालावा या दृष्टीने अर्जदार यांनी वरील अर्ज या कार्यालयात केला आहे. २) हयाअर्थि या नोटिसीने जाहिर करण्यांत येते की, सदरहु न्यासाचे हितसंबंध असणाऱ्या ज्या लोकांना सदर न्सासाचे योजनेविषयी काही निवेदन/ हरकत करावयाची असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० ( तीस ) दिवसाच्या आंत तशा प्रकारचे लेखी निवेदन / हरकत योजनेच्या मसुद्यावरील चौकशी क्रमांक देउन मुंबई सार्वजनिक विश्वस्थ अधिनियम १९५० चे कलम ७३ (अ) नुसार दहा रुपयांचा कोर्ट फी लावून अर्ज सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला येथे दाखल करावा, तसे न केल्यास सदरहु बाबतीत कोणासही काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन कार्यवही एकतर्फी चालवुन निकाल देण्यात येईल. ही नोटीस आज दिनांक २१/०५/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अकोला यांच्या शिक्यानिशी दिली.

(शिक्का)
**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

# वर्धा काँग्रेसला जिल्हाध्यक्ष मिळाला; पण पक्षाला दिशा मिळणार का !

**काँग्रेसमध्ये पुन्हा गटांचा बाजार; भाजप नव्हे, नेतेच नेत्यांचे वैरी**

**वाढदिवस शेंडेंचा... पण जिल्हाध्यक्षपदाचे गिफ्ट कोल्हेंना**

**वर्धा/ रवींद्र लाखे**

वर्धा जिल्हा काँग्रेसमध्ये पुन्हा एकदा राजकीय भूकंप झाला असून, जिल्हाध्यक्षपदी सुनील कोल्हे यांच्या नियुक्तीनंतर काँग्रेसच्या गोटात पुन्हा उघडपणे दोन गट पडल्याचे चित्र समोर आले आहे. काँग्रेस वाचवायची की एकमेकांचे राजकारण संपवायचे? असा प्रश्न आता सामान्य कार्यकर्तेच विचारू लागले आहेत. कारण या नियुक्तीने रणजीत कांबळे गटाचा स्पष्ट वरचष्मा दिसून आला असून, चारुलता टोकस आणि शेखर शेंडे गटाला मोठा राजकीय धक्का बसल्याची चर्चा काँग्रेस भवनात रंगली आहे.

विशेष म्हणजे काँग्रेस नेते शेखर शेंडे यांच्या वाढदिवसाच्या दिवशीच हा निर्णय जाहीर झाल्याने वाढदिवस शेंडेंचा पण गिफ्ट कोल्हेंना अशी उपरोधिक चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. जिल्हाध्यक्षपदासाठी शेखर शेंडे यांचे नाव आघाडीवर मानले जात होते. उदय मेघे, मनोज चांदुरकर आणि हेमलता मेघे यांचीही नावे चर्चेत होती. मात्र अखेर पक्षश्रेष्ठींनी रणजीत कांबळे गटाचे विश्वासू मानले जाणारे सुनील कोल्हे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले.या निर्णयामुळे काँग्रेसमधील गटबाजी पुन्हा उफाळून येणार, अशी भीती आता उघडपणे व्यक्त होत आहे. आधीच कार्यकर्त्यांमध्ये नाराजी असताना आता विविध गटांतील संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. भाजपशी लढण्याऐवजी काँग्रेसमध्येच



अंतर्गत सत्तासंघर्ष सुरू असल्याचे चित्र दिसत आहे.दरम्यान, नवनियुक्त जिल्हाध्यक्ष सुनील कोल्हे यांच्यासमोर आता आव्हानांचा अक्षरशः डोंगर उभा ठाकला आहे. सर्वात मोठे आव्हान म्हणजे काँग्रेसमधील विखुरलेले गट एकत्र आणणे. युवक काँग्रेस आणि एनएसयूआयमध्ये मोठ्या प्रमाणावर विस्कळीतपणा असल्याची चर्चा आहे. महिला काँग्रेसमध्ये अंतर्गत वाद-विवाद सुरूच आहेत. काँग्रेसमधील विविध सेल निष्क्रिय अवस्थेत असून, अनेक पदाधिकारी केवळ नावापुरते उरल्याची परिस्थिती आहे.

उदय मेघे गटालाही या निर्णयाने मोठा धक्का बसल्याचे बोलले जात आहे.त्यामुळे कोल्हे हे सर्व गटांना एकत्र आणून पक्षाला नवसंजीवनी देणार का? असा प्रश्न आता काँग्रेसच्या गोटात विचारला जात आहे. कारण यापूर्वी सुनील कोल्हे यांनी तब्बल तीन वर्ष प्रभारी जिल्हाध्यक्ष म्हणून काम पाहिले होते. मात्र त्या काळात काँग्रेसची संघटना उभी करण्यात त्यांना फारसे यश आले नाही, अशीच टीका पक्षातील अनेक कार्यकर्ते करत आहेत.

सद्भावना भवन येथील काँग्रेस कार्यालयाची अवस्था त्या काळात इतकी दयनीय झाली होती की कार्यालयात जाळेसुद्धा वेळेवर काढले जात नसल्याची बोचरी चर्चा रंगली होती. बैठकांचा अभाव, आंदोलनांची मरगळ आणि कार्यकर्त्यांशी संवाद तुटल्याने काँग्रेस भवन ओसाड पडल्याचे चित्र होते. त्यामुळे तीन वर्षांत जे झाले नाही, ते आता अधिकृत जिल्हाध्यक्ष झाल्यावर कोल्हे करणार तरी कसे? असा प्रश्न कार्यकर्ते उपस्थित करत आहेत.एकेकाळी काँग्रेसचा अभेद्य गड मानला जाणारा वर्धा जिल्हा अंतर्गत गटबाजीमुळे हळूहळू भाजपच्या ताब्यात गेला. भाजपविरोधी वातावरण असतानाही काँग्रेसला जनतेचा विश्वास मिळवता आला नाही. उलट नेते एकमेकांचे पाय ओढण्यात व्यस्त राहिल्याने पक्षाची ताकद दिवसेंदिवस कमी होत गेली.

आता सुनील कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस खरोखर उभी राहणार की पुन्हा गटबाजीच्या दलदलीत रुतणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. वर्धा काँग्रेसमध्ये सध्या तरी एकच चर्चा रंगली आहे, रणजीत कांबळे गट जिंकला पण या सत्तासंघर्षात काँग्रेसच हरत चालली आहे का?



## गुन्हेगारी वार्ता

### बसस्थानकातील उपहारगृह फोडून रोकड लंपास

**कारंजा -** शहरातील बसस्थानक परिसरात चोरीच्या घटना वाढत असून अज्ञात चोरट्यांनी उपहारगृह फोडून रोकड लंपास केल्याची घटना उघडकीस आली. शिक्षक कॉलनी येथील नितीन राऊत यांचे बसस्थानकात उपहारगृह आहे. नेहमीप्रमाणे रात्री दुकान बंद करून ते घरी गेले होते. मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी शटरचे कुलूप तोडून दुकानात प्रवेश केला. गल्ल्यात ठेवलेली ५ हजार रुपयांची रोकड चोरून आरोपी पसार झाले. सकाळी दुकान उघडताना चोरीचा प्रकार समोर आला. या घटनेमुळे बसस्थानक परिसरातील व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाढत्या चोरीच्या घटनांमुळे पोलिस गस्त वाढविण्याची मागणी होत आहे. तक्रारीवरून कारंजा पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### कुलूपबंद घरातून ७३ हजारांचा ऐवज चोरी

**वर्धा -** शहरातील अशोकनगर परिसरात अज्ञात चोरट्यांनी कुलूपबंद घर फोडून सोन्याचांदीचे दागिने व रोकड असा ७३ हजार ८०० रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. थूल ले-आउट येथील नंदिनी भगत या काही कामानिमित्त बाहेरगावी गेल्या होत्या. याच संधीचा फायदा घेत चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. कपाटातील सोन्याचांदीचे दागिने तसेच ३० हजार रुपयांची रोकड चोरून नेण्यात आली. घरी परतल्यानंतर चोरीचा प्रकार लक्षात येताच परिसरात खळबळ उडाली. दिवसेंदिवस वाढत असलेल्या घरफोड्यांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. तक्रारीवरून वर्धा शहर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### दान मागण्याच्या बहाण्याने वृद्धेची सोन्याची चेन लंपास

**वर्धा -** दान मागण्याच्या बहाण्याने वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन हिसकावून नेल्याची घटना शहरातील इंगोले चौक परिसरात घडली. मीना चतूर या घरी असताना एका अनोळखी महिलेने देवीच्या नावाने दान मागितले. सुरुवातीला त्यांनी घराच्या गेटमधूनच ५० रुपये दिले. मात्र, 'बाहेर येऊन पैसे द्या, देवीचा अपमान होतो,' असे सांगून त्या महिलेला बाहेर बोलावण्यात आले. त्यानंतर मीना चतूर या तुळशीला पाणी टाकण्यासाठी वाकल्या असता आरोपी महिलेने त्यांच्या गळ्यातील १५ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन हिसकावून पळ काढला. या प्रकारात सुमारे ६० हजार रुपयांचे नुकसान झाले. घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शहर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### भरधाव कारच्या धडकेत ऑटो प्रवाशाचा मृत्यू

**तळेगाव (शा. पंत) -** नागपूर-अमरावती महामार्गावर भरधाव कारने ऑटोला दिलेल्या जोरदार धडकेत एकाचा मृत्यू तर एक जण जखमी झाल्याची घटना घडली.

ज्ञानेश्वर मेहनकर व दीपक पारखंडे हे ऑटोरिक्षाने तळेगावहून अमरावतीकडे जात होते. दरम्यान, मागून भरधाव वेगाने येणाऱ्या कारने ऑटोला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात ज्ञानेश्वर मेहनकर यांचा जागीच मृत्यू झाला, तर दीपक पारखंडे गंभीर जखमी झाले. अपघातानंतर परिसरात काही काळ वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती. जखमीला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. महामार्गावरील वाढत्या अपघातांमुळे वाहनचालकांनी वेगावर नियंत्रण ठेवण्याची गरज व्यक्त होत आहे. तक्रारीवरून तळेगाव पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### डॉ. सरोजदेवी माहेश्वरी यांचे निधन



**वर्धा -** जानकीदेवी बजाज विज्ञान महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. सुरेशचंद्र माहेश्वरी यांच्या धर्मपत्नी डॉ. सरोजदेवी माहेश्वरी (८३) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.डॉ. सरोजदेवी माहेश्वरी या शांत, संयमी व सेवाभावी व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होत्या. त्यांनी आपल्या कुटुंबासह सामाजिक क्षेत्रातही आपुलकीचे संबंध जपले होते. त्यांच्या पश्चात पती, दोन विवाहित कन्या, जावई तसेच नातवंडे असा परिवार आहे.त्यांची अंत्ययात्रा आज शुक्रवार रोजी सकाळी ९ वाजता यशवंत अपार्टमेंट, आर्ट कॉलेजच्या मागील निवासस्थानावरून निघणार आहे.

# 'इंधन मुबलक'च्या घोषणा हवेतच



**देऊळगाव राजात मधुपालकांची गाडी ठप्प, खा.अमर काळे धावले अन् वाचली रात्र**

**प्रशासन गायब, जनतेसाठी खासदारच ठरले 'लाईफलाईन'**

**वर्धा/ कारंजा(लाड)/ जनमाध्यम**

राज्यात इंधनाची कुठलीही टंचाई नसल्याचे ढोल सरकार कडून रोज पिटले जात असताना बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा येथे मात्र वास्तवाने सरकारच्या दाव्यांना काळीमा फासला. शासनाच्या अधिकृत कार्यक्रमासाठी निघालेल्या सिंदी विहीरी येथील मधुपालकांची गाडीच डिझेलअभावी रस्त्यात बंद पडल्याने घोषणांचे सरकार आणि हालांची जनता हे विदारक चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे.

महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांच्या वतीने जागतिक मधमाशी दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित राज्यस्तरीय मधुमित्र व मधुसखी पुरस्कार सोहळ्यासाठी कारंजा तालुक्यातील सिंदी विहीरी येथील तब्बल २५ ते ३० मधुपालकांची टीम रवाना झाली होती. उत्साहाने सुरू झालेला प्रवास देऊळगाव राजा येथे येताच संकटात बदलला. वाहनातील डिझेल अचानक संपले आणि पुढील प्रवास पूर्णपणे ठप्प झाला.

धक्कादायक बाब म्हणजे, देऊळगाव राजा येथील अनेक पेट्रोलपंप डिझेल टंचाईमुळे बंद असल्याचे समोर आले. रात्रीची वेळ, अनोळखी शहर, सोबत महिला व प्रशिक्षणार्थीष्ठ त्यामुळे संपूर्ण टीम भीतीच्या छायेत सापडली. शासनाच्या कार्यक्रमा साठी निघालेल्या नागरिकांवर अशी वेळ येत असेल तर सर्वसामान्यांची अवस्था काय असेल, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.अडचणीच्या या क्षणी सिंदी विहीरीचे उपसरपंच बंडू इवनाथे यांनी प्रसंगावधान राखत खा.अमर काळे यांचे कार्यकर्ते मयुर ढोले यांच्याशी संपर्क साधला. परिस्थिती समजताच मयुर ढोले यांनी तातडीने खा.अमर काळे यांना माहिती दिली. जनतेच्या संकटावेळी तत्काळ धावून जाणारे खासदार म्हणून ओळख असलेल्या अमर काळे यांनी क्षणाचाही विलंब न करता बुलढाणा जिल्हा प्रशासनाला थेट संपर्क साधत परिस्थितीची गंभीर दखल घेतली.

खासदारांच्या आदेशानंतर प्रशासनाची यंत्रणा खडबडून जागी झाली. देऊळगाव राजा येथील ठाणेदार गिरी यांनी स्वतः वाहनाचा शोध घेत आवश्यक डिझेल उपलब्ध करून दिले. त्यानंतरच मधुपालकांचा पुढील प्रवास सुरू होऊ शकला. अन्यथा ही संपूर्ण टीम रात्रभर महामार्गावर अडकून पडली असती.या घटनेमुळे सरकारच्या 'इंधन मुबलक' या दाव्यांचा फुगा फुटल्याची चर्चा सुरू झाली आहे. एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्य सरकारकडून इंधन पुरवठा सुरळीत असल्याचे दावे केले जातात.या टीममध्ये खादी ग्रामोद्योगचे पांडे, मनोरे, राऊत, उपसरपंच बंडू इवनाथे, मनीष धुर्वे, सागर खडसे, उमेश धुर्वे यांच्यासह अनेक प्रशिक्षणार्थी सहभागी होते. सर्वांनी खा.अमर काळे यांचे मनापासून आभार मानत, रात्री-अपरात्री संकटात धावून येणारे आधारवड अशा शब्दांत त्यांचे कौतुक केले. देऊळगाव राजा येथील हा प्रकार सरकारच्या घोषणाबाजीवर जोरदार चपराक मानला जात असून, जनतेच्या अडचणींवर फक्त भाषणे नव्हे तर प्रत्यक्ष कृती करणारे नेतृत्वच उपयोगी पडते, हे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

# खेळातील शिस्त आणि जिद्दच घडवते विजेते

**तांत्रिक बारकावे आत्मसात केल्याशिवाय यश नाही : इमरान राही**



**वर्धा/ जनमाध्यम**

खेळ हा केवळ शारीरिक ताकदीचा नव्हे, तर मानसिक एकाग्रता, शिस्त आणि तांत्रिक कौशल्याचा प्रवास आहे. कोणत्याही क्रीडा प्रकारात नैपुण्य मिळवायचे असेल तर त्या खेळातील तांत्रिक बारकावे समजून घेऊन सातत्याने सराव करणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन 'युनिव्हर्सल मार्शल आर्ट अकॅडमी'चे राष्ट्रीय सल्लागार इमरान राही यांनी केले.

सेवाग्राम येथील हुतात्मा स्मारक परिसरात तायक्वांदो स्पोर्ट असोसिएशन वर्धा जिल्हा आणि लॉयन्स ट्रेडिशनल शोतोकान कराटे डो असोसिएशन इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कलर बेल्ट, प्रमाणपत्र व मेडल वितरण सोहळ्यात ते विशेष अतिथी म्हणून बोलत होते.या वेळी मंचावर लॉयन्स ट्रेडिशनल शोतोकान कराटे डो असोसिएशन (इंडिया) चे संचालक कोशी उल्हास वाघ, आनंद निकेतन-सेवाग्रामच्या मुख्याध्यापिका जया गावंडे,सेवाग्रामच्या माजी सरपंच सुजाता ताकसांडे, तायक्वांदो स्पोर्ट असोसिएशन वर्धा जिल्हाचे अध्यक्ष अमोल मानकर,पालक प्रतिनिधी महेंद्र टेंभरे, सचिव सेंसाई साहिल वाघ, राज्य पंच प्रांजली मानकर तसेच आयरन स्पिरिट स्पोर्ट अकॅडेमीचे प्रशिक्षक गौरव तामगाडगे आदी मान्यवर उपस्थित होते.इमरान राही यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणासोबत खेळातील प्राविण्यही तितकेच महत्त्वाचे असल्याचे सांगितले. 'खेळ विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संयम आणि नेतृत्वगुण विकसित करतो. खेळातील यश आयुष्याला नवी दिशा देऊ शकते, असे ते म्हणाले.यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत खेळाडूंना कलर बेल्ट, प्रमाणपत्र आणि मेडल प्रदान करून गौरविण्यात आले. संस्कृती टेंभरे, साक्षी बोरले, श्लोक शिंगणापूरे, विश्वजित सोनवणे, रचित कांबळे, वेद भडके आणि मृणाल टेंभरे यांना यलो बेल्ट व प्रमाणपत्र देण्यात आले. तर लुहान गोडघाटे याने गोल्ड मेडल, पूर्वी दोडके व अधिरा हांडे यांनी ब्राँझ मेडल आणि श्रावस्ती मानकर हिने सिल्वर मेडल पटकावून उल्लेखनीय यश मिळविले.कार्यक्रमाचे आयोजन तायक्वांदो स्पोर्ट असोसिएशन वर्धा जिल्हाचे अध्यक्ष अमोल मानकर यांनी केले. प्रस्तावना गौरव तामगाडगे यांनी मांडली. संचालन प्रांजली मानकर यांनी केले तर आभार प्रदर्शन अरीत मानकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी देशमुख, राहुल शिंगणापूरे, बोरर्ले, कांबळे तसेच पालकांचे विशेष सहकार्य लाभले. शेवटी निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे यांनी सर्व गुणवंत खेळाडूंचे अभिनंदन केले.

## नावात बदल

माझे पूर्वी MOHAMMAD AQEEL असे नाव होते. माझ्या आधार पॅन कार्ड वरील MOHAMMAD AQEEL MOHAMMAD SHAFI SHEIKH हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

-:पत्ता:-
वॉर्ड नं २८,जाकीर हुसेन कॉलनी
वर्धा ४४२००१

# दर्जेदार शिक्षण हरवले; पटसंख्येसाठी शिक्षकांची दारोदार धावपळ

**साहूर/ जनमाध्यम**

शाळांचे निकाल लागले आणि नव्या शैक्षणिक सत्राची चाहूल लागताच साहूर परिसरात विद्यार्थ्यांच्या शोधासाठी शिक्षकांची अक्षरशः धावपळ सुरू झाली आहे. रखरखत्या उन्हात घरोघरी जाऊन पालकांना भेटणे, विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी विनवण्या करणे, विविध आश्वासने देणे अशा प्रकारे अनेक शाळांचे शिक्षक पटसंख्या वाढविण्यासाठी आटापिटा करताना दिसत आहेत.

मात्र, या संपूर्ण प्रक्रियेत दर्जेदार शिक्षणाकडे दुर्लक्ष होत असून केवळ स्वतःची नोकरी आणि खुर्ची वाचविण्यावरच भर दिला जात असल्याची टीका आता पालक आणि शिक्षणतज्ज्ञांकडून उघडपणे होऊ लागली आहे.

साहूर व परिसरातील जिल्हा परिषद शाळा, मराठी माध्यमांच्या शाळा, हायस्कूल आणि मिडल स्कूल यांची पटसंख्या वर्षागणिक घटत चालली आहे.

दुसरीकडे इंग्रजी माध्यमांच्या आणि खासगी नामांकित शाळांचा प्रभाव झपाट्याने वाढत असल्याने पालकांचा कलही त्या दिशेने वळला आहे. यामागचे प्रमुख कारण म्हणजे ग्रामीण भागातील अनेक मराठी शाळांमध्ये दर्जेदार शिक्षण, आधुनिक सुविधा, शिक्षकांची उपलब्धता आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासा साठी आवश्यक वातावरणाचा अभाव असल्याचे मत पालक व्यक्त करत आहेत.

फक्त प्रवेश वाढवून शिक्षणाचा दर्जा वाढत नाही. मुलांना गुणवत्ता, सुविधा आणि स्पर्धात्मक वातावरण हवे असते, अशी प्रतिक्रिया काही जागरूक पालकांनी व्यक्त केली.

## नावात बदल

माझे पूर्वी SHABANA PARVEEN MOHD AKIL असे नाव होते. माझ्या आधार पॅन कार्ड वरील SHABANA MOHAMMAD AQEEL SHEIKH हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

-:पत्ता:-
वॉर्ड नं २८,जाकीर हुसेन कॉलनी
वर्धा ४४२००१

## नावात बदल

माझे पूर्वी JARIYA FATEMA असे नाव होते. माझ्या आधार पॅन कार्ड वरील JARIYA MOHAMMAD AQEEL SHEIKH हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

-:पत्ता:-
वॉर्ड नं २८,जाकीर हुसेन कॉलनी
वर्धा ४४२००१

# हमदापूर ग्रामपंचायतीचा 'गुप्त ग्रामसभा' खेळ उघड



**दवंडी नाही... नोटीस नाही... सभा मात्र उरकली; ग्रामस्थ संतप्त, प्रशासक गैरहजर, कागदांवर तारखांचा घोळ**

**सेलू/ जनमाध्यम**

लोकशाहीचा पाया मानल्या जाणाऱ्या ग्रामसभेलाच हमदापूर ग्रामपंचायतीत 'गुप्त बैठकी'चे स्वरूप आल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. गावात दवंडी नाही, नोटीस नाही, नागरिकांना कोणतीही पूर्वकल्पना नाही; मात्र ग्रामसभा आणि विशेष महिला सभा उरकून विकासकामांचे ठराव मंजूर करण्यात आल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकारामुळे हमदापूरात संतापाची लाट उसळली असून ग्रामपंचायत प्रशासनाच्या कारभारावरच मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

१९ मे रोजी ग्रामसभा आणि विशेष महिला सभा झाल्याचे ग्रामपंचायतीकडून सांगितले जात असले तरी, गावकऱ्यांच्या मते संपूर्ण प्रक्रिया ही केवळ कागदोपत्री आणि 'ठरवून' पार पाडण्यात आली. ग्रामसभेच्या नोटिसांवरील तारखांमध्ये फेरफार झाल्याचा संशय व्यक्त होत आहे. एका ठिकाणी १९ तारीख लिहून नंतर १० तारीख टाकल्याचे दिसून येत असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला. विशेष म्हणजे शिक्के व तारखा स्पष्ट दिसू नयेत याचीही पुरेपूर काळजी घेतल्याचा आरोप करण्यात येत आहे.ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, हे परिशिष्ट आणि नोटिसा ग्रामसभा संपल्यानंतरच भिंतीवर चिकटवण्यात आल्या. म्हणजे आधी सभा उरकायची आणि नंतर नोटीस लावून औपचारिकता' पूर्ण करायची, असा प्रकार ग्रामपंचायतीत सुरू असल्याचा संतप्त आरोप होत आहे.या ग्रामसभेत मनरेगा अंतर्गत विविध विकासकामांना मंजुरी, जिल्हा वार्षिक योजनेतील कामांची निवड, पाणीटंचाई निवारण उपाययोजना, आरोग्य अभियान आणि ग्रामपंचायतीच्या वार्षिक अहवालाला मंजुरी देण्यात आल्याचे सांगितले जात आहे. तर विशेष महिला सभेत महिलांच्या आरोग्य, ॲनिमिया आणि शासकीय योजनांवर चर्चा झाल्याचा दावा करण्यात आला. मात्र, गावातील बहुसंख्य नागरिकांनाच या सभांची माहिती नसल्याने हे सर्व निर्णय नेमके कुणासाठी आणि कुणाच्या उपस्थितीत झाले, असा प्रश्न ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत.

प्रकरण अधिकच गंभीर बनवणारी बाब म्हणजे या ग्रामसभेला प्रशासक स्वतः गैरहजर असल्याचा आरोप होत आहे. नियमानुसार ग्रामपंचायत कार्यालयात प्रशासक, विस्तार अधिकारी, सचिव आणि माहिती अधिकारी यांचे संपर्क क्रमांक व कामाचे दिवस दर्शवणारा फलक लावणे बंधनकारक असताना, असा कोणताही फलक ग्रामपंचायत परिसरात दिसत नसल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली. शिवाय ग्रामपंचायत सचिव मुख्यालयी राहत नसल्याने नागरिकांची कामे वारंवार रखडत असल्याचा रोष व्यक्त होत आहे.ग्रामसभेची कोणतीही दवंडी देण्यात आली नाही. सभा संपल्यानंतर पत्रक लावून केवळ दिखावा करण्यात आला. ग्रामस्थांच्या हक्कांवरच डल्ला मारण्याचा हा प्रकार आहे, असा संतप्त आरोप गंगाबाई उराडे आणि ढबाले यांनी केला.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - १७४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# राजीव गांधी हे तंत्रज्ञान क्रांतीचे खरे जनक

## -बबलु देशमुख यांचे प्रतिपादन

### जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने पुण्यतिथी निमित्त अभिवादन

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारतरत्न माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त जिल्हा काँग्रेस कमिटी ग्रामीणच्या वतीने अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी माजी मंत्री यशोमती ठाकूर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष बबलु देशमुख, खासदार बळवंत वानखडे यांच्यासह काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.



कार्यक्रमात बोलताना बबलु देशमुख यांनी सांगितले की, राजीव गांधी यांनी देशात संगणक, दूरसंचार आणि टेलिकॉम क्षेत्रात मोठी क्रांती घडवून आणली. त्यांच्या दूरदृष्टीमुळे भारताने तंत्रज्ञान क्षेत्रात प्रगतीची नवी दिशा मिळवली. संगणक आणि दूरसंचार क्षेत्रातील धोरणांमुळे देशातील लाखो युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या.

ते पुढे म्हणाले की, १९८४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला ऐतिहासिक यश मिळाले होते. वयाच्या अवघ्या ४० व्या वर्षी देशाचे सातवे पंतप्रधान म्हणून राजीव गांधी यांनी जबाबदारी स्वीकारून आधुनिक भारताच्या निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांच्या विचारांमधून काँग्रेस कार्यकर्त्यांना आजही प्रेरणा मिळते.

यावेळी हरिभाऊ मोहोड, जयंतराव देशमुख, संजय वानखडे, प्रकाश काळबांडे, रामेश्वर अभ्यंकर, सतीश हाडोळे, कांचनमाला गावंडे, भागवत खांडे, प्रवीण मनोहर, मुकद्दर खान पठाण, भैय्यासाहेब मेटकर, सुनील जुनघरे, समाधान दहातोंडे, संजय बेलोकर, नंदू यादव, अनिकेत ढेंगळे, रितेश पांडव यांच्यासह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अल्पवयीनांवरील अत्याचार प्रकरणांत दोन आरोपींना २० वर्षांची शिक्षा

## अमरावती व दर्यापूर न्यायालयांचे कठोर निर्णय

**अमरावती/प्रतिनिधीः-** अल्पवयीन मुलींवरील लैंगिक अत्याचार प्रकरणांमध्ये अमरावती व दर्यापूर येथील विशेष न्यायालयांनी कठोर भूमिका घेत दोन वेगवेगळ्या प्रकरणांतील आरोपींना २० वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. दोन्ही निकाल २० मे रोजी जाहीर करण्यात आले.

दर्यापूर येथील सत्र न्यायाधीश क्रमांक २ मा. एम. आय. लोकवानी यांनी रहिमापूर पोलीस स्टेशनअंतर्गत दाखल प्रकरणात आरोपी अजय धर्मा वानखडे उर्फ अजय बापूराव तेलगोटे याला दोषी ठरवत २० वर्षे सश्रम कारावास व १५ हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली. सरकार पक्षाच्या माहितीनुसार, पीडित मुलगी ही घटनेच्या वेळी अवघ्या सात वर्षांची होती. तिची आई घर सोडून गेल्यानंतर आणि वडिलांनी दुसरा विवाह केल्यानंतर ती आपल्या लहान बहिणीसह आजीकडे राहत होती. पीडितेची आजी शेतमजुरी करून दोन्ही मुलींचा सांभाळ करत होती. घटनेच्या दिवशी आजी कामासाठी बाहेर गेली असताना आरोपीने मुलीला बोलावून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. घरी परतल्यानंतर मुलीने घडलेला प्रकार आजीला सांगितला. त्यानंतर रहिमापूर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली. तपासादरम्यान आरोपीविरुद्ध सबळ पुरावे आढळून आल्यानंतर भारतीय दंड विधान कलम ३७६ तसेच पोक्सो कायद्याच्या कलम ४ व ६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. सुनावणीदरम्यान सरकार पक्षातर्फे सात साक्षीदार तपासण्यात आले. सरकार पक्षाची बाजू ॲड. सोनाली एस. क्षीरसागर यांनी मांडली.

**मंगरुळ दस्तगीर हद्दीतील प्रकरणातही आरोपीला शिक्षा-** दरम्यान, अमरावती जिल्हा व सत्र न्यायाधीश ( क्रमांक ३) यशवंत आनंद गोस्वामी यांनी मंगळूर दस्तगीर पोलीस स्टेशनअंतर्गत दाखल दुसऱ्या प्रकरणात आरोपी विवेक देविदास पाचभावे (रा. ता. धामणगाव रेल्वे) याला दोषी ठरवत २० वर्षे सक्तमजुरी व २५ हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली.या प्रकरणात १० वर्षीय मुलाला ब्रेड पकोड्याचे आमिष दाखवून आरोपीने शाळेच्या परिसरातील स्वच्छतागृहात नेऊन लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप होता. ११ एप्रिल २०२४ रोजी घडलेल्या या घटनेनंतर मंगळूर दस्तगीर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासानंतर आरोपीविरुद्ध बीएनएस कलम १३७ (२), पोक्सो कायद्याच्या कलम ४ व ६ तसेच ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. या खटल्यात पीडितासह १० साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले. न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत शिक्षा सुनावली. तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाला पीडित नुकसानभरपाई योजनेंतर्गत पीडित मुलाला जास्तीत जास्त मदत देण्याचे निर्देश दिले. या प्रकरणात सहायक सरकारी अभियोक्ता ॲड. प्रशांत विजयराव देशमुख यांनी प्रभावी युक्तिवाद केला. त्यांना उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल पवार तसेच जिल्हा पैरवी पोलीस हेड कॉन्स्टेबल रोशन दुधे यांनी सहकार्य केले.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यात ५२ उमेदवारांची प्राथमिक निवड

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटरच्या वतीने आज, १९ मे रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा पार पडला. जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या कार्यालयात सकाळी १० वाजता घेण्यात आला. मेळाव्यात प्रत्यक्ष मुलाखतींमधून ५२ नोकरी इच्छुक उमेदवारांची निवड करण्यात आली आहे.

उद्घाटक म्हणून कौशल्य विकास विभागाचे उपायुक्त दत्तात्रय ठाकरे उपस्थित होते. सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी प्रमुख उद्योजक म्हणून जाधव गियर्सचे प्रतिनिधी रोहित प्रांजळे, जिनस इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. ली. चे प्रतिक इंगोले, प्रेसिजन मेपिंगचे सचिन निचले, टॅलेन्टवार्ड पॉ सोल्यूशन प्रा. ली. नागपूरच्या करिष्मा पासवान आणि शिखर एज्युकेअर अमरावतीचे आयुष अग्रवाल उपस्थित होते.



उपायुक्त ठाकरे यांनी युवकांनी केवळ रोजगार मिळविणारे न होता, स्वतःचे उद्योग सुरू करून रोजगार देणारे उद्योजक व्हावे, असे आवाहन केले. सहायक आयुक्त बारस्कर यांनी प्रास्ताविकातून प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेचे महत्त्व पटवून दिले. ही योजना देशातील नामांकित कंपन्यांमध्ये प्रवेश मिळविण्याची सुवर्णसंधी आणि एक उत्तम मार्ग असल्याचे सांगितले. मेळाव्यासाठी ऑनलाइन, ऑफलाइन माध्यमातून १६४ उमेदवारांनी नोंदणी केली. त्यापैकी १२४ उमेदवारांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून विविध कंपन्यांच्या प्रतिनिधींसमोर मुलाखती दिल्या. सर्व खाजगी आस्थापनांच्या प्रतिनिधींनी उमेदवारांची योग्यता तपासून ५२ उमेदवारांची प्राथमिक निवड केली. सोनाली भोगे यांनी सूत्रसंचालन केले, पंकज कचरे यांनी आभार मानले.

# गोवंश तस्करीवर कारवाई, तीन वाहने जप्त

## -वरुड पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** वरुड पोलिसांनी जनावरांच्या अवैध तस्करीचा पर्दाफाश करत मोठी कारवाई केली. नाकाबंदी दरम्यान जनावरांनी भरलेली तीन मालवाहू वाहने जप्त करण्यात आली असून त्यांमधील जनावरांची सुटका करण्यात आली. या कारवाईत वाहने व जनावरांसह एकूण १७.१० लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वरुड पोलिसांनी संशयास्पद तीन चारचाकी मालवाहू वाहने थांबवून तपासणी केली असता जनावरांची अवैध वाहतूक सुरू असल्याचे उघड झाले. पोलिसांनी १५ लाख रुपये किमतीची तीन वाहने जप्त केली, तर वाहनांमधून २ लाख १० हजार रुपये किमतीची जनावरे सोडवण्यात आली. या प्रकरणी बिष्णूर (नारखेड, नागपूर) येथील किशोर भाऊरावजी भिसे (वय ६१), चेतन लीलाधर कळंबा (वय २३) आणि मोहन रामकृष्णजी एकाडे (वय ३५) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याच मोहिमेदरम्यान पोलिसांनी वरुड येथील सोहेल शाह उर्फ बाबा उमर शाह याला संशयास्पद परिस्थितीत ताब्यात घेतले. झडतीदरम्यान त्याच्याकडून धारदार तलवार जप्त करण्यात आली असून त्याच्याविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला.

सुमारे ६ तास चाललेल्या या विशेष मोहिमेत पोलिसांनी १९९ संशयित वाहनांची तपासणी केली. वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल २१९ वाहनचालकांवर कारवाई करत एकूण ६९ हजार ८०० रुपये दंड वसूल करण्यात आला.

# दुचाकी चोर अटकेत

## राजापेठ पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** राजापेठ पोलिसांनी दुचाकी चोरी प्रकरणात एका आरोपीला अटक केली असून चोरीची दुचाकी जप्त करण्यात यश मिळवले आहे. विशाल उर्फ आकाश रवींद्र कांताढे (वय २८, रा. आदर्श नगर, गोपाल नगर, अमरावती) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सचिन रवींद्र रॉय यांनी २३ एप्रिल रोजी राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यात त्यांनी नमूद केले की, त्यांची एमएच २७ बीएच ०३०५ क्रमांकाची हीरो स्प्लेंडर प्रो मोटारसायकल रुक्मिणी नगर परिसरातील रुद्रांश वाईन शॉपसमोरून अज्ञात व्यक्तीने चोरी करून नेली.

याप्रकरणी राजापेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार विशाल कंताढे याला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान आरोपीने मोटारसायकल चोरीची कबुली दिली.

त्यानंतर पोलिसांनी त्याच्या ताब्यातून अंदाजे २५ हजार रुपये किमतीची चोरीची स्प्लेंडर प्रो मोटारसायकल जप्त केली. ही कारवाई पोलिस आयुक्त राकेश ओला, पोलिस उपआयुक्त श्याम गुघे आणि सहायक पोलिस आयुक्त संजय खटाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलत, पोलिस उपनिरीक्षक मिलिंद हियारे, हेड कॉन्स्टेबल मनीष रवी लिखितकर तसेच अर्जुन कदम यांनी या कारवाईत महत्त्वाची भूमिका बजावली.

---

**महसुल नायब तहसिलदार चांदूर बाजार यांचे कार्यालय**

क्र.प्रस्तु-३/अ.का./जा.ना.प्रसिध्दी/कावि-४४९/२०२५ दि.२१.०५.२०२६

**जाहीरनामा**

ज्याअर्थी अर्जदार **गजानन हरिरामजी राऊत,** रा.हिरुर पूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती यांनी मौजा हिरुर पूर्णा येथील गट नं.३९० मधील ७/१२ मधून कूळ कमी करण्याबाबत अर्ज या कार्यालयास प्राप्त आहे.

त्याअर्थी कोणास आक्षेप तथा हरकत घ्यावयाची असेल त्यांनी जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून १५ दिवसांच्या आत या कार्यालयात हरकत/आक्षेप स्वतः किंवा निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहून दाखल करावी. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांच्या तथा हरकतीचा विचार केला जाणार नाही.

शिक्का

**स्वा/-**
**महसूल नायब तहसीलदार,**
**चांदूर बाजार**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९०३/२०२६
**ज्योती व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०८.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Jyoti Pradeep Meshram, Age 39 Yrs. Occu.: Household R/o Ghar No.1944/2, Mhatre Ali Siddhivinayak Store Ghansoli Gaon, Navi Mumbai Thane
2. Pooja Charandas Tagde Age 37 Yrs. Occu.: Household R/o Lokmata Indira Nagar, Yankyapura Nagar, Amrvati.
3. Kajal Charandas Tagde, Age 34 Yrs. Occu.: Household R/o Lokmata Indira Nagar, Yankyapura Nagar, Amrvati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **चरणदास नागोराव तागडे आणि लिला चरणदास तागडे** हे अनुक्रमे दिनांक **०६.०३.२०२६** व **११.०३.२०२५** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **ज्योती व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **ज्योती व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--

पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

# गोल्डन फायबर कंपनीतील कर्मचाऱ्याने घेतला गळफास

## -माहुली जहागीर परिसरात खळबळ

**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-** माहुली जहागीर परिसरातील एका भाड्याच्या खोलीत राहणाऱ्या युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मृत युवकाचे नाव आकाश हरिभाऊ भूसणार (वय ३२, रा. धामणगाव देव, ता. दारव्हा, जि. यवतमाळ) असे आहे. तो गेल्या एक वर्षापासून येथे वास्तव्यास होता व गोल्डन फायबर कंपनीमध्ये काम करत होता.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, धीरज नंदकिशोर बिजवे यांनी माहुली जहागीर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली असून त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आकाश भूसणार हा त्यांच्या घरातील भाड्याच्या खोलीत राहत होता. दि. १९ मे २०२६ रोजी त्यांना फोनद्वारे माहिती मिळाली की, आकाशने आपल्या खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केली आहे.घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, आकाश भूसणार हा खोलीत गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यानंतर तातडीने मृतकाच्या नातेवाईकांना फोनद्वारे माहिती देण्यात आली तसेच माहुली जहागीर पोलीस स्टेशनला घटनेची खबर देण्यात आली.

सदर प्रकरणी माहुली जहागीर पोलीसांनी घटनेची नोंद करून मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी पुढील चौकशी सुरू केली आहे. युवकाच्या आत्महत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून तपास सुरू आहे.

---

**जाहीर सुचना**

या जाहीर सुचनेद्वारे सुचित करतो की, माझे पक्षकार राजेश भीमराव चव्हाण, रा.मुर्तिजापूर, ता.मुर्तिजापूर, जि.अकोला यांनी ईसारचिठ्ठी नुसार मौजे-सिरसो-२, ता.मुर्तिजापूर, जि.अकोला येथील सर्व्हे नं.२५२/२ मधील प्लॉट नं.३२ याचे क्षेत्रफळ १५७.०० चौ.मी. म्हणजेच १६८९.३२ चौ.फुट व त्यावरील बांधकामासह चा गजेंद्र पंजाबराव चव्हाण यांचेकडून विकत घेण्याचा सौदा केलेला आहे. त्यापुर्वी सदर प्लॉट गजेंद्र पंजाबराव चव्हाण यांनी नितीन जयदेवराव मानकर यांचेकडून दिनांक २९.१२.२०२३ रोजी खरेदी दस्त अ.नं.४७५३ नुसार खरेदी केलेला होता व त्यानुसार त्यांच्या मालकीत व ताब्यात आहे.

दिनांक २९.१२.२०२३ रोजी खरेदी दस्त अ.नं.४७५३, दिनांक १७.०८.२०२१ रोजी खरेदी दस्त अ.नं.२३४७ चे मुळ खरेदी दस्त माझे पक्षकाराचे विकेते गजेंद्र पंजाबराव चव्हाण यांचेकडे जमा आहे.

परंतु दिनांक २१.०९.२०१३ रोजी खरेदी दस्त अ.नं.२९१० चे मुळ खरेदी दस्त माझे पक्षकाराचे वरील नामे विकेते यांचेकडून गहाळ झालेली आहेत व इतर मूळ दस्त यांच्याकडे आहे.

तरी याबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, हितसंबंध व ईतर कोणतीही भानगड, कायदेशीर वाद, लवाद, दावा असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास जाहीर सुचनेपासून १५ दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी स्वरुपात संपर्क साधावा. त्यानंतर आक्षेप आल्यास याची नोंद घेतली जाणार नाही.

**अमरावती**
**दिनांक १९.०५.२०२६**

(ॲड.राहूल व्ही.मोहोड)
रा.प्रेरणा कॉलनी, राधा नगर
अमरावती, ता.जि.अमरावती
मो.९०९६४६०६७०

---

**जाहीर सुचना**

सर्व सामान्य लोकांना सुचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे **संदेश विश्वासराव मेश्राम** यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणप्रमाणे --

**मिळकतीचे वर्णन** - मौजे - बेनोडा, प्रगणे - नांदगांव पेठ, शेत सर्व्हे नं.१९/२, ऑनलाईन सर्व्हे नं.१९-२-७८-बी, प्लॉट क्र.७८, सबडिव्हायडेड प्लॉट नं.७८-बी, ता. आणि जिल्हा अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **संदेश विश्वासराव मेश्राम** यांच्या मालकीची आहे. तद्नंतर त्यांनी AADHAR HOUSING FINANCE LIMITED AHFL येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, वरील वर्णनाचे **मूळ खरेदी खत** 19.07.2014 **रोजीचे दस्त क्र.**1656 आणि मूळ खरेदीखत दि.०८.०८.२०१७ रोजीचे दस्त क.३४९५ सदर दोन्ही दस्त गहाळ झालेले आहे. तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किंवा कुठे गहाण, पतसंस्था/राष्ट्रीयकृत/सहकारी अथवा खाजगी बँक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किंवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्र.वर ही जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या ७ दिवसांच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही, ही विनंती. आणि सदर मालमत्ता AADHAR HOUSING FINANCE LIMITED AHFL येथे संदेश विश्वासराव मेश्राम यांनी केलेल्या कर्ज अर्जानुसार गहाण करण्यात येईल, करीता ही जाहीर सूचना.

शिक्का

**आपला,**
**ॲडव्होकेट**
**रवींद्र र.वाटाणे,**
**स्नेहगंधा कॉलनी, अमरावती**
**मो.नं.9823698745**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.८९८/२०२६
**रत्ना व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०८.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Ratna Rajesh Banubakode, Age 47 Yrs. Occu.: HOusehold R/o House No.2M, Mankarni Nagar, Rukhmini Nagar,Amt.
2. Sarvadnya Rajesh Banubakode, Age 17 Yrs. Occu.:Education Appli.No.1 for herself and for applicant No.2, being minor as natural guardian mother. R/o Near Moti Nagar Garden, Boke Kirana Store, Rukhmini Nagar, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत राजेश त्र्यंबक बानुबाकोडे** यांचे दिनांक **१२.१२.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार रत्ना व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रत्ना व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०२.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०२२/२०२६
**श्री.देवकु अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२९.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Devaku Ganpatrao Rithe, Age 84 Yrs. Occu.: Household R/o Santosh Bhuvan Galli, Gadge Nagar, Po.Shivaji Nagar, Amravati.
2. Smt.Maya Ravindra Rithe Age 63 Yrs. Occu.: Household
3. Shri Vaibhav Ravindra Rithe, Age 35 Yrs. Occu.: Labour
4. Ku.Aparna Ravindra Rithe, Age 25 Yrs. Occu.: Student Appli.Nos.2 to 4 R/o Plot No.23, Near Swami Samarth Maharaj Temple, Ramkrushna Colony, Shivaji Nagar, Rahatgaon, Tq. Dist.Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **रविन्द्र गणपतराव रिठे** है दिनांक **०६.०२.२०२६** व **११.०३.२०२५** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **देवकु अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **देवकु अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 05/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **माईंड ट्रान्सफॉर्मर्स ट्रस्ट, भिवापूरकर लेआऊट, गोपाल नगर, ता. जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री.भुषण मनिष करीया**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) -काही नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक ११.०५.२०२६ रोजी दिली.

शिक्का

**(र.र.ठाकरे)**
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

**जाहीर सुचना**

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **दिनेश बापुराव देशमुख,** रा.प्लॉट नं.१, एन.एच.पी.शाळेजवळ, सेक्टर १९, नवी मुंबई, ऐरोली ठाणे यांनी **रेखा सिताराम समरित,** रा.वऱ्हा, ता.तिवसा, जि.अमरावती यांच्यासोबत त्यांच्या मालकी व ताब्यातील खालील वर्णन केलेली मालमत्ता विकत घेण्याचा सौदा केला आहे. त्या मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे--

**स्थावर मालमत्तेचे वर्णन -** नोंदणी तुकडी अमरावती नोंदणी पोटतुकडी तिवसा, जि.प.अमरावती, पं.स.तिवसा कक्षेतील ग्रामपंचायत कार्यालय, माळेगांव, मौजा माळेगांव, ता.तिवसा, जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.२०८, १० हे.९२ आर पोटखराब ०.०२ हे.आर, एकुण १० हे. ९४ आर, आकार रु.२३.००, भो.वर्ग-१, वि.क्र.

यात माझे मालकीचे १ हे.२१ आर या क्षेत्रात एक विहीर असून पूर्ण हक्कासह त्यात असलेल्या झाडाझुडपासह व संबंधित सर्व हक्कासह दिनेश बापुराव देशमुख यांना मालकी हक्काने खरेदी देत आहे. सदर्हु शेत हे हंगामी ओलिताचे आहे या शेताची चतुःसिमा खालीलप्रमाणे-

पुर्वेस - पुरुषोत्तम माणिक माहोरे यांचे शेत
पश्चिमेस - मंदाबाई दादाराव माहोरे यांचे शेत
उत्तरेस - वऱ्हा ते माळेगांव रोड
दक्षिणेस - दिपक झारखंडे यांचे शेत

तरी सर्व लोकांना जाहीरपणे सुचित करण्यात येते की, वरील नमुद मालमत्तेमध्ये अथवा त्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा, कोणताही हक्क, गहाण, बोजा, हितसंबंध, अधिकार, धारणाधिकार, सुविधाधिकार, करार इत्यादी असल्यास सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांचे आत आपला आक्षेप असल्यास खालील पत्त्यावर संबंधित कागदपत्रासह येऊन भेटावे. असा कोणताही आक्षेप प्राप्त न झाल्यास माझे पक्षकार सदर्हु मालमत्तेची खरेदीखत करुन घेतील व त्यानंतर माझे पक्षकाराचे खरेदी व मालकी हक्काबाबत कोणत्याही प्रकारची आक्षेप, वाद अथवा उजर चालणार नाही व तो माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**अमरावती**
**दिनांक २२.०५.२०२६**

(ॲड.मनिष जी.बिडकर)
ॲडव्होकेट/नोटरी
रा.लक्षद्वीप कॉलनी, .शेगांव-रहाटगांव रोड
अमरावती, ता.जि.अमरावती
मो.९९७५२०१९०८

---

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २५३**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त

### प्रल्हाद महाराजांच्या चरण पादुका ३ जूनला शहरात

**अमरावती-** अधिक मासानिमित्त साखरखेर्डा येथील प. पू. श्री. प्रल्हाद महाराजांच्या चरण पादुकांचे अमरावती शहरात दि. ३ जून रोजी सायंकाळी आगमन होत आहे. दि. ८ जून २०२६ पर्यंत त्यांचा मुक्काम उपासना मंडळ कार्यालयात, नीळकंठ गंधे यांचे निवासस्थान अंबापेठ राहिल.या निमित्त महाराजांच्या अनेक घरी पाद्यपूजा केल्या जातात. तसेच दि. ८ जूनला सामुहिक पाद्यपूजा होतील. पाद्यपूजा करण्यासाठी इच्छुक भाविकांनी अधिक माहितीसाठी सोनटक्के यांच्याशी ९३७३५१३१४५ क्रमांकावर किंवा निळकंठ गंधे यांच्यांशी ९४२१८३००३९ क्रमांकावर संपर्क साधावा, अशी विनंती श्री प्रल्हाद महाराज उपासना मंडळाच्या कार्यकारी मंडळाने केली आहे.



### चांदूर रेल्वे शहरातून भरदिवसा दुचाकी चोरी

**चांदूर रेल्वे-** शहरातील श्रीकृपा हॉस्पिटलजवळून होंडा शाइन दुचाकी भरदिवसा चोरून नेल्याची घटना रविवारी घडली. या प्रकरणी बुधवारी (ता. २०) चांदूर रेल्वे पोलिसांत अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेतील दोन संशयित चोरटे हॉस्पिटलच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले असून त्यातील एका आरोपीचा चेहरा स्पष्ट दिसत असल्याने पोलिसांसमोर आरोपींचा शोध घेण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. फिर्यादी तनवीर अहमद खान अकील खान पठाण यांचे श्रीकृपा हॉस्पिटलजवळ आमीर ऑटो गॅरेज आहे. रविवारी (ता. १७) दुपारी सुमारे ३.४० वाजता त्यांनी त्यांची दुचाकी (क्र. MH 27 BY 2859) गॅरेजजवळ उभी करून जेवणासाठी दुसरी गाडी घेऊन घरी गेले. त्या वेळी गॅरेजवर कोणीही उपस्थित नव्हते. काही वेळाने परत आल्यावर दुचाकी जागेवर नसल्याचे लक्षात आले. आजूबाजूच्या नागरिकांना व दवाखान्यातील कर्मचाऱ्यांना विचारपूस करूनही दुचाकीचा काहीच पत्ता लागला नाही. याबाबत बुधवारी चांदूर रेल्वे पोलिसांत तक्रार देण्यात आली. पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध बीएनएस कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास चांदूर रेल्वे पोलीस करीत आहे.



### सावन राठोड यांना विद्यापीठातर्फे अर्थशास्त्रात आचार्य पदवी प्रदान

**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती तर्फे शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्था,अमरावती येथील अर्थशास्त्र विषयातील संशोधक विद्यार्थी सावन किसन राठोड यांनी प्रा.डॉ. लक्ष्मण म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली अर्थशास्त्र विषयातील 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी'(पीएच.डी.)पदवी संपादन करून संस्थेचा गौरव वाढविला आहे.त्यांनी'विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन (कालखंड २०१३-१४ ते २०२२-२३)' या महत्त्वपूर्ण विषयावर सखोल संशोधन केले. या संशोधनामध्ये विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती, उत्पादन खर्च, कर्जबाजारीपणा, बाजारपेठेतील अडचणी, हवामान बदलाचा परिणाम तसेच शेतकऱ्यांच्या सामाजिक जीवनमानाचा अभ्यास करण्यात आला असून संत्रा उत्पादन क्षेत्र अधिक सक्षम व शाश्वत करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योग, बाजारपेठेपर्यंत थेट पोहोच आणि शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक असल्याचे या संशोधनातून अधोरेखित करण्यात आलेले आहे. याप्रसंगी त्यांचा या यशाबद्दल अभिनंदन करतांना संस्थेचे संचालक डॉ.सतीश माळोदे, मार्गदर्शक डॉ.लक्ष्मण म्हस्के, निर्मला म्हस्के,बहिस्थ परीक्षक डॉ. शिवाजी पाते, परीक्षा नियंत्रक डॉ.संतोष पवार, डॉ.सुनील इंगळे, डॉ.किशोरसिंह चुंगडे, डॉ.बी.आर.मस्के, डॉ.काशिनाथ मस्के, डॉ. सातभाई, डॉ.वैभव ठाकरे आणि डॉ.कपिल गिरी आदी मान्यवर तसेच अर्थशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. सावन राठोड यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक व संशोधनात्मक वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.



## कृषी क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व विलासराव इंगोले यांचे निधन

**अमरावती-** जिल्ह्यातील कृषी क्षेत्राला दिशा देणारे ज्येष्ठ मार्गदर्शक, प्रगती कृषी सेवा केंद्रचे संचालक तथा अमरावती जिल्हा कृषी साहित्य विक्रेता संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कै. श्री विलासरावजी इंगोले यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनामुळे कृषी क्षेत्रात शोककळा पसरली आहे.कै. इंगोले यांनी अमरावती जिल्ह्यात प्रथम कृषी सेवा केंद्र सुरू करून कृषी व्यवसायाला नवी दिशा दिली. शेतकरी, कृषी सेवा केंद्र चालक आणि कृषी क्षेत्राशी संबंधित अनेकांना त्यांनी मार्गदर्शन केले. कृषी क्षेत्रातील त्यांच्या दूरदृष्टी, प्रामाणिकपणा आणि संघटनात्मक कार्यामुळे त्यांना 'कृषी व्यवसायातील भीष्म पितामह' म्हणून ओळखले जात होते.ते प्रगती कृषी सेवा केंद्रचे संचालक, सिद्धिविनायक गणपती संस्थान, वायगावचे अध्यक्ष तसेच अमरावती जिल्हा कृषी साहित्य विक्रेता संघटनेचे संस्थापक अध्यक्ष होते. समाजकार्य, धार्मिक कार्य आणि कृषी क्षेत्रातील त्यांचे योगदान उल्लेखनीय राहिले.त्यांच्या साधेपणा, प्रेमळ स्वभाव आणि सर्वांना आपुलकीने जोडून ठेवण्याच्या वृत्तीमुळे त्यांनी समाजात अढळ स्थान निर्माण केले होते. त्यांच्या निधनाने कृषी क्षेत्रातील एक अनुभवी, प्रेरणादायी आणि प्रेमळ व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.त्यांच्या पश्चात परिवार, नातेवाईक तसेच मोठा मित्रपरिवार असा परिवार आहे. विविध सामाजिक, कृषी व व्यापारी संघटनांकडून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



## ऑनलाइन औषध विक्रीवर तात्काळ नियंत्रण आणून बेकायदेशीर विक्री बंद करावी

# तालुका मेडिकल असोसिएशनचे तहसीलदार यांना निवेदन

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

ऑनलाइन औषध विक्रीवर तात्काळ नियंत्रण आणावे, डॉक्टरांच्या वैध प्रिस्क्रिप्शनशिवाय होणारी औषध विक्री थांबवावी तसेच स्थानिक मेडिकल व्यवसायाचे संरक्षण करावे, अशी मागणी अंजनगाव तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने करण्यात आली आहे. या मागण्यांसाठी २० मे रोजी अंजनगाव येथील तहसीलदार यांना निवेदन सादर करण्यात आले.

देशभरातील औषध विक्रेत्यांनी ऑनलाइन फार्मसी आणि मोठ्या कॉर्पोरेट मेडिकल कंपन्यांविरोधात पुकारलेल्या देशव्यापी संपात अंजनगाव तालुक्यातील औषध विक्रेत्यांनीही सक्रिय सहभाग नोंदविला. या आंदोलनात अंजनगाव शहरासह तालुक्यातील सर्व औषध विक्रेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामुळे शहर व तालुक्यातील बहुतांश मेडिकल दुकाने दिवसभर बंद ठेवण्यात आली होती.औषध विक्रेत्यांनी सांगितले की, ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरून औषधांची विक्री मोठ्या प्रमाणावर वाढत असून त्यामुळे पारंपरिक मेडिकल दुकानदारांचे आर्थिक



नुकसान होत आहे तसेच ऑनलाईन औषधी खरेदी मुळे ग्राहकांची सुद्धा त्यामध्ये फसवणूक होत असल्याने छोट्या व्यावसायिकांसमोर प्रश्न निर्माण झाला आहे.संघटनेने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात ऑनलाइन औषध विक्रीमुळे होणाऱ्या गंभीर धोक्यांकडे लक्ष वेधले आहे. त्यानुसार ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरून बनावट, निकृष्ट दर्जाची किंवा एक्सपायरी झालेली औषधे मिळण्याचा धोका वाढला आहे. डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय सहज उपलब्ध होणाऱ्या औषधांमुळे सेल्फ-मेडिकेशनचे प्रमाण वाढत असून चुकीच्या आजारावर चुकीचे उपचार होऊन गंभीर दुष्परिणाम होऊ शकतात.तसेच काही वेबसाइट्सवर गर्भपाताच्या गोळ्या सहज उपलब्ध होत असल्याने महिलांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली. वजन कमी करण्यासाठी ऑनलाइन मागवल्या जाणाऱ्या औषधांमुळे मूत्रपिंड निकामी होणे किंवा मृत्यू ओढवण्याच्या घटनाही घडल्याचा दावा संघटनेने केला आहे.याशिवाय काही ई-फार्मसी कंपन्या विनापरवाना औषध विक्री करत असून औषधांच्या साठवणुकीची योग्य पद्धत पाळली जात नसल्याने औषधांचा दर्जा खालावत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. औषधे सहज उपलब्ध होत असल्यामुळे अनेक तरुण नशा आणणाऱ्या इंजेक्शन, कफ सिरप आणि इतर औषधांच्या व्यसनाधीन होत असल्याची गंभीर बाबही समोर येत आहे.असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी हा विषय केवळ व्यवसायापुरता मर्यादित नसून नागरिकांच्या आरोग्य सुरक्षेशी थेट संबंधित असल्याचे स्पष्ट केले. सरकारने ई-फार्मसी संदर्भातील नियम अधिक कठोर करून बेकायदेशीर औषध विक्रीवर तातडीने कारवाई करावी,अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## बीडीएस हायस्कूलने रचला इतिहास, शिष्यवृत्ती परीक्षेत ५३ विद्यार्थी उत्तीर्ण

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा(इयत्ता ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी) परीक्षेचा निकाल नुकताच जाहिर झाला असून त्यामध्ये श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित चांदूर रेल्वे येथील बापूसाहेब देशमुख शिवाजी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट व चमकदार कामगिरी करून इतिहास रचला आहे. विद्यालयाचे वर्ग ५ वी चे ६८ विद्यार्थ्यांपैकी ११ शिष्यवृत्ती करिता पात्र झाले आहेत.तर वर्ग आठवीच्या ७४ विद्यार्थ्यांपैकी ५३ विद्यार्थी शिष्यवृत्ती करिता पात्र झाले आहेत. हा निकाल चांदूर रेल्वे तालुक्यातून व जिल्ह्यातून सर्वाधिक आहे.

विद्यालयाचे वर्ग पाचवी चे ६८ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेला बसले होते. त्यापैकी ११ विद्यार्थी शिष्यवृत्ती करिता पात्र झाले आहेत. तसेच पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये वर्ग आठवीचे ७४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते.त्यामधून ५३ विद्यार्थी शिष्यवृत्ती करिता पात्र झाले आहेत.शाळेने दरवर्षी प्रमाणे यावर्षीसुद्धा शिष्यवृत्ती तसेच इतर परीक्षेमध्ये उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत दमदार कामगिरी केली आहे. याकरिता दरवर्षी विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती तसेच स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन नियमित केल्या जाते.

यावर्षी दररोज शाळा सुरू होण्यापुर्वी एक तास अगोदर अतिरिक्त वर्ग घेण्यात आले होते तसेच दर रविवारी सकाळी ९ ते ११ या वेळेत शिष्यवृत्तीचे वर्ग व टेक्नो क्लासेसचे वर्ग शाळेतील काही शिक्षकांनी व तालुक्यातील इतर चार तज्ज्ञ शिक्षकांनी घेतल्यामुळे शाळेने यावर्षी उत्तुंग यश मिळविले आहे. शाळेच्या इतिहासात पहिल्यांदाच ५३ विद्यार्थी उत्तीर्ण व पात्र झाले आहेत. विद्यार्थ्यांना मिळालेल्या या उत्तुंग यशाबद्दल मुख्याध्यापक डॉ.अतुल ठाकरे, संस्थेचे आजीव सभासद अशोक देशमुख, शाळा तपासणी अधिकारी नंदकुमार मानकर, शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय आईवडिलांसह मार्गदर्शक शिक्षक तसेच मुख्याध्यापक यांना दिले आहे. या यशाबद्दल सर्व स्तरातून विद्यार्थ्यांवर कौतुकांचा वर्षाव होत आहे.

## भारतरत्न राजीव गांधी यांची पुण्यतिथी



**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांची पुण्यतिथी दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन म्हणून झाली.

याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले व उपस्थितांना दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त प्रतिज्ञा दिली. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, सहा. कुलसचिव श्री विलास काकडे तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.संचालन व माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

## विदर्भातील जनतेला वीज युनिटमध्ये ५०% सूट शासनाने देण्याची आवश्यकता

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

विदर्भात आलेली उष्णतेची लाट आणि त्यामुळे झालेले अतिउष्णतामान ही एक नैसर्गिक आपत्ती असल्याने विजेचे उत्पादन करणाऱ्या विदर्भाला वीज युनिटमध्ये इतर महाराष्ट्र पेक्षा पन्नास टक्के सूट शासनाने देण्याची मागणी अंजनगाव सुर्जी तालूक्यातील प्रसिद्ध सोशल मिडीया गृप अंजनगाव विचारमंचवर गृप सदस्य तथा माजी नगराध्यक्ष ॲड कमलकांत लाडोळे यांनी मांडली असता तालुक्यातील नागरिकांनी या मागणीला प्रचंड प्रतिसाद दिला आहे.

याबाबत वृत्त असे की, विदर्भात उष्णतेची लाट येणार असल्याचे शासनाने सांगितले होते. विदर्भात अतिउष्णतामान गेल्या मार्च पासूनच सुरू झाल्याने ते पुढे सतत वाढत गेले. विदर्भातील अति उष्णतामान ही प्रामुख्याने नैसर्गिक आपत्ती असल्याने याचा परिणाम विदर्भातील जनतेवर मोठ्या प्रमाणात झाला. संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले असून विदर्भातील उद्योगधंदे, रोजगार, शेती, आरोग्य या सर्वांवर या उष्णता मानाचा परिणाम झाला असून प्रचंड उन्हामुळे व्यक्तीच्या कार्यक्षमते वर परिणाम होत असल्याने आर्थिक उत्पन्न कमी झाल्यागत स्थिती आहे, प्रचंड उष्णतेमुळे पंखे, कुलर एसी याचाही वापर मोठ्या प्रमाणात झाला आहे. त्यामुळे युनिट ची संख्या वाढली. वीज वितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे प्रत्येक काही युनीट मागे विज दराचे स्लब बदलतात. उष्णतेची लाट ही नैसर्गिक आपत्ती समजून महाराष्ट्र शासनाने ५०३ युनिट आधारित सवलत देणे अतिशय गरजेचे आहे. विदर्भात आलेल्या या प्रचंड उष्णतेच्या लाटेचा सामना आबाल, वृद्ध, स्त्री, पुरुष करीत आहे.विदर्भात वीज निर्मिती होते परंतू त्याचा फायदा ऊर्वरीत महाराष्ट्रालाच जास्त होत असतो. त्यामुळे विदर्भातील जनतेला या आलेल्या नैसर्गिक आपत्तीच्या वेळी वीज युनिटमध्ये ५०३ सूट शासनाने देणे अतिशय गरजेचे असल्याची चर्चा विचारमंचवर झाली असुन या चर्चेत तालूक्यात सर्वच सदस्यानी सहभाग घेतला हे विषेश. याबाबतची मागणी मोठ्या प्रमाणात शासनाकडे करण्यासाठी गृपमधील सदस्य पवन सारडा यांनी एक अर्जच तयार करून तो नागरिकांनी तहसीलदार अंजनगाव यांना देण्यासाठी विनंती केली असुन हा अर्ज विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यात पोहचवावा यासाठी सुद्धा प्रयत्न करावे अशी मागणी होत असुन शासनाने तात्काळ विचार करावी अशी मागणी जोर धरत आहे.

## बैलगाडीतून निघणाऱ्या वरातींची परंपरा लोप पावताना

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

लग्न हा दोन जीवांच्या मनोमिलनाचा आणि सामाजिक ऐक्याचा आनंदोत्सव मानला जातो. पूर्वी ग्रामीण भागातील लग्नसोहळ्यांमध्ये बैलगाडी आणि बैलजोडी यांना विशेष महत्त्व होते. नवरदेवाची वरात सजविलेल्या बैलगाडीतून निघणे ही एक मानाची आणि आकर्षणाची बाब मानली जायची. मात्र, आधुनिक चारचाकी वाहनांच्या वाढत्या वापरामुळे ही पारंपरिक प्रथा आता हळूहळू लुप्त होत चालली आहे.


काही दशकांपूर्वी ग्रामीण भागात दुचाकी आणि चारचाकी वाहने फारच कमी प्रमाणात होती. त्यामुळे लग्नातील वर-वधू, वऱ्हाडी आणि पाहुण्यांच्या प्रवासासाठी बैलगाडी, रेंगी, खासर आणि दमणी हीच प्रमुख साधने होती. गावातील नातेवाईक, शेजारी आणि परिचित आपल्या बैलगाड्या सजवून वरातीत सहभागी होत असत. विशेषतः नवरदेवासाठी सजविलेली बैलगाडी आणि देखणी बैलजोडी हे वरातीचे मुख्य आकर्षण असायचे.लग्नाची तारीख ठरल्यानंतर वरात किती अंतरावर जाणार, किती बैलगाड्या लागणार याचे नियोजन आधीच केले जाई. बैलांना सजविणे, गाड्यांची दुरुस्ती आणि प्रवासाची तयारी यासाठी गावभर उत्साहाचे वातावरण असायचे. कुलदैवताची



पूजा आणि गावातील हनुमान मंदिरात दर्शन घेतल्यानंतरच वरात मार्गस्थ होत असे.त्या काळातील बैलगाड्यांच्या लांबलचक ताफ्याने गावातील रस्ते गजबजून जात.वरातीत सहभागी झालेल्या वऱ्हाडींसाठी हा प्रवास आनंददायी आणि अविस्मरणीय अनुभव ठरायचा. वाटेत बैलांना तलाव किंवा पाणवठ्यावर पाणी पाजले जाई. लांबच्या गावात वरात पोहोचण्यास उशीर झाल्यास मधल्या गावात मुक्कामही केला जाई. यामुळे परस्पर सहकार्य, सामूहिक भावना आणि एकोप्याचे दर्शन घडत असे.आज पन्नाशी ओलांडलेल्या अनेक ज्येष्ठांच्या आठवणीत बैलगाडीतून निघालेल्या वरातींचे चित्र अजूनही जिवंत आहे.मात्र,काळाच्या ओघात आधुनिक वाहनांनी बैलगाडीची जागा घेतली असून ग्रामीण संस्कृतीतील ही वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आता इतिहासजमा होत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे.

## शिबीरात व्यसनमुक्त जीवन जगण्याचा सल्ला

**तिवसा-** हल्लीच्या काळात समाजात विविध नशिली व अंमली पदार्थ सेवन करण्याचे आणि दुर्व्यसनांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले असून तंबाखू, गुटखा, दारू इत्यादी मादक द्रव्ये पिल्याने कॅन्सरसारखा भयानक रोग होण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे अशा दुर्धर आजारांपासून दूर राहण्याचा सल्ला देत, दूरदर्शन व आकाशवाणी लोक-कलावंत प्रमोद पोकळे गुरुजी यांनी शिबिरार्थ्यांना व्यसनांपासून होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती भजनाच्या माध्यमातून समजावून सांगून व्यसनमुक्त जीवन जगण्याचा सल्ला दिला.तालुक्यातील गुरुकुंज-मोझरी नजिकच्या राष्ट्रसंत अध्यात्म केंद्र, दासटेकडी येथे १ मेपासून सुरू असलेल्या श्रीगुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार



शिबिरात संस्थेचे सचिव प्रमोद पोकळे गुरुजी यांनी यावेळी शिबिरार्थ्यांसमोर रचलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रचित भजनाचे गायन करून मागाहून विद्यार्थ्यांकडून वदवून घेतले. सोबतच आरोग्य व स्वच्छता याबाबतही मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित शिबिरार्थ्यांनी स्वेच्छेने आपापले हात वर करून मी आयुष्यभर कधीच कोणतेही व्यसन करणार नाही व माझ्या संपर्कात येणाऱ्या मित्रांनाही याबद्दल माहिती देईल, अशी पुढे येऊन शपथ घेतली.श्रीगुरुदेव राष्ट्रधर्म प्रचार संस्थेद्वारा आयोजित आचार्य हरिभाऊ वेरूळकर गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या या शिबिरात यावर्षी विदर्भातील विविध जिल्ह्यांमधून सहभागी झालेले १०३ शिबिरार्थ्यांसह शिबिराचे शिक्षक रवींद्र ढवळे, रुपेश मोरे, कुणाल खडसे, गणेश दरवरे, मयुर इंगळे, देवागुरू जांभुळे, नयन प-हाड, पुष्कर गुडधे, कुलदीप बोधाने, चेतन पारधी, कुंदन गुडधे व व्यवस्थापक रवींद्र वानखडे उपस्थित होते.

# ट्रॅक्टरद्वारे शेतीच्या मशागत खर्चात मोठी वाढ

## डिझेल दरवाढीचा फटका; शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी वाढली

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

परिसरात खरीप हंगामाची चाहूल लागताच शेती मशागतीची कामे वेगाने सुरू झाली आहेत. परंतु डिझेल दरवाढ, सुटे भागांचे दर आणि मजुरीतील वाढ यामुळे ट्रॅक्टरद्वारे शेती तयारीचा खर्च ग्रामीण भागात प्रचंड वाढलेला दिसत आहे. त्यामुळे आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या अनेक शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे.ग्रामीण भागातील बहुसंख्य शेतकरी नांगरणी, वखरणी, रोटाव्हेटर आणि इतर मशागत कामांसाठी ट्रॅक्टरवर अवलंबून आहेत. मागील काही दिवसांमध्ये झालेल्या डिझेल दरवाढीमुळे ट्रॅक्टर धारकांनी प्रतितास भाड्यात वाढ केली असून, हा अतिरिक्त खर्च शेतकऱ्यांच्या तोंडाला आलेला आहे.ट्रॅक्टरचालकांची मागणी वाढल्याने भाडेदरही वाढले आहेत. नांगरणीसाठी प्रतितास ७०० ते ८०० रुपये, तर वखरणीसाठी ६०० ते ७०० रुपये आकारले जात असल्याचे स्थानिक शेतकरी सांगतात. काही भागांत तर वेगळ्या पद्धतीने ८०० पेक्षाही अधिक रक्कम आकारली जात असल्याची चर्चा आहे.याशिवाय, सुटे भाग महाग, दुरुस्तीसाठी लागणारा खर्च आणि डिझेलमुळे वाढलेला



ऑपरेटिंग कॉस्ट यामुळे ट्रॅक्टर मालकही भाडे वाढविण्यास भाग पडत आहेत. दुसरीकडे मजुरांच्या उपलब्धतेची कमतरता व मजुरीचा वाढलेला खर्च यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले आहे. सरकारच्या पेट्रोल–डिझेल दरवाढीचा सर्वत्र निषेध व्यक्त केला जात असून, जनतेने सरकारवर तीव्र ताशेरे ओढले आहेत. सतत वाढणाऱ्या इंधनदरामुळे वाहतूक, शेती आणि घरगुती खर्चात मोठी भर पडली आहे. महागाईचे ओझे वाढत असताना सरकार दरकपात करण्याऐवजी जनतेच्या खिशावरच डल्ला मारत असल्याची टीका नागरिकांनी केली आहे. इंधनदर नियंत्रणात ठेवण्यात सरकार अपयशी ठरल्याचा आरोपही करण्यात येत आहे. दरवाढ तातडीने मागे घेऊन सर्वसामान्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकरीवर्गाकडून होत आहे.

'दरवर्षी खरीपपूर्व मशागत काही प्रमाणात परवडायची. पण यंदा ट्रॅक्टरचे तासाचे भाडेच २०–२५% वाढले आहे. डिझेल महाग, मजुरी महाग, बियाणे-खतेही महागष्ठ शेतकऱ्यांसमोर खरोखरच मोठे संकट उभे राहिले आहे.'

**-नामदेव पाटील,** शेतकरी, अंजनगाव बारी

'आमच्यासारखे लहान शेतकरी पूर्णपणे ट्रॅक्टरवर अवलंबून आहोत. पण एका दिवसाचे मशागत कामही आता किमान ४ ते ५ हजारांवर जात आहे. उत्पादन किती मिळेल याची शाश्वती नाही, पण खर्च मात्र सतत वाढतोय.'

**वासुदेव गवळी,** शेतकरी–ग्रामीण परिसर अंजनगाव बारी

# ‘गाजीपूर फाईल्स’ : प्रशासनाचे मौन अन् लोकप्रतिनिधींनीही घेतले बहिरेपणाचे सोंग

## रात्रीच्या काळोखातही सुरू राहते खनिज उत्खनन, प्रक्रिया आणि ब्लास्टिंग

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** अकोट तालुक्यातील पोपटखेड गट ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या गाजीपूर आणि रुदाळी परिसरात सुरू असलेल्या गौण खनिज उत्खनन, स्टोन क्रशर आणि हॉट मिक्स प्लांटच्या कारभाराने आता केवळ पर्यावरणच नव्हे, तर संपूर्ण महसूल यंत्रणेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. गौण खनिज अधिनियमातील स्पष्ट नियम धाब्यावर बसवत अनेक खदानींमध्ये सूर्यास्तानंतरही उत्खनन, ब्लास्टिंग आणि क्रशर सुरू असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. मात्र या सर्व प्रकाराकडे अकोट महसूल विभागाने जाणीवपूर्वक डोळेझाक केल्याची संतप्त भावना परिसरात व्यक्त होत आहे. तर दुसरीकडे लोकप्रतिनिधींनी सुद्धा या गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष करीत अक्षरशः बहिरेपणाचे सोंग घेतले असल्याची जोरदार टीका होत आहे.



सातपुड्याच्या पायथ्याशी, वनक्षेत्रालगत असलेल्या या आदिवासीबहुल पट्ट्यात गेल्या काही वर्षांत खनिज माफियांचे जाळे अधिक मजबूत झाल्याचे चित्र आहे. आदिवासींच्या नावावर खदान परवाने, रॉयल्टी आणि कागदोपत्री व्यवहार दाखविले जात असले तरी प्रत्यक्ष उत्खनन, वाहतूक आणि आर्थिक व्यवहार गैरआदिवासी व्यावसायिकांकडूनच नियंत्रित होत असल्याचा आरोप पर्यावरणप्रेमींनी केला आहे. विशेष म्हणजे, अवैध उत्खनन प्रकरणी दंड आकारला जातो तेव्हा त्याचे ओझे पुन्हा त्या आदिवासींच्याच माथी मारले जाते आणि संबंधित धनदांडगे दुसऱ्या जागेवर नवा कारभार सुरू करतात, अशी संतापजनक वस्तुस्थिती समोर येत आहे.

या भागात सुरू असलेल्या अनेक खदानी आणि क्रशरमधून अरबो रुपयांचा गौण खनिज साठा विविध सार्वजनिक विकासकामांसाठी पुरविला गेला. अकोट विधानसभा मतदारसंघातील रस्ते, धरण, काँक्रिटीकरण, डांबरीकरण तसेच रेल्वे प्रकल्पांमध्ये याच परिसरातील खनिजाचा मोठ्या प्रमाणावर वापर झाल्याचे सांगितले जाते. मात्र या कामांची गुणवत्ता आता संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. अनेक काँक्रिट रस्ते अल्पावधीतच खचल्याने शासनाचा निधी अक्षरशः पाण्यात गेल्याची टीका नागरिकांकडून होत आहे.

अकोला-अकोट मार्गाची झालेली दुरवस्था अजूनही ताजी असताना आता सुरू असलेल्या अकोट-दर्यापूर मार्गाच्या कोट्यवधी रुपयांच्या कामातही याच परिसरातील खनिजाचा वापर होत असल्याने नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. ‘निकृष्ट दर्जाच्या खनिजामुळे पुन्हा तोच प्रकार घडणार का?’ असा सवाल स्थानिकांकडून उपस्थित होत आहे.

### ■ नियम काय सांगतात?

गौण खनिज अधिनियम २०१३ नुसार सूर्योदय ते सूर्यास्त या कालावधीतच गौण खनिजाचे उत्खनन आणि प्रक्रिया करण्यास परवानगी आहे. तसेच पर्यावरणीय अटी, ध्वनीप्रदूषण नियंत्रण, ब्लास्टिंगचे निकष आणि वाहतुकीसाठी रॉयल्टी अनिवार्य आहे. मात्र गाजीपूर-रुदाळी परिसरात या सर्व नियमांचे उघड उल्लंघन होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमींनी केला आहे. रात्री उशिरापर्यंत सुरू असलेले क्रशर, ब्लास्टिंग आणि डंपर वाहतूक प्रशासनाच्या दाव्यांनाच आव्हान देणारी ठरत आहे.

दरम्यान, रात्रीच्या वेळी सुरू असलेल्या गौण खनिज वाहतुकीमुळे महसूल चोरीचाही मुद्दा ऐरणीवर आला आहे. अनेक वाहनांची वाहतूक रॉयल्टीविना होत असल्याचा आरोप असून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असल्याची चर्चा आहे. मात्र महसूल यंत्रणा, पोलिस आणि संबंधित विभाग या प्रकारावर कारवाई करण्याऐवजी मौन बाळगत असल्याने संशय अधिक गडद होत आहे.

स्थानिक पर्यावरणप्रेमींच्या मते, या भागात दिवस-रात्र सुरू असलेल्या ब्लास्टिंगमुळे भूगर्भीय संतुलन बिघडत आहे. ध्वनी आणि वायू प्रदूषणामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले असून शेती आणि जलस्रोतांवरही परिणाम होत आहे. वनक्षेत्रालगत सुरू असलेल्या या अनियंत्रित उत्खननामुळे वन्यजीवांच्या अधिवासालाही धोका निर्माण झाला आहे. याहून गंभीर बाब म्हणजे, या सर्व प्रकरणावर लोकप्रतिनिधींची भूमिकाही संशयास्पद मानली जात आहे. निवडणुकांमध्ये विकासाच्या घोषणा करणारे नेते आता या मुद्द्यावर मौन का बाळगत आहेत, असा सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे. ‘अकोटचा वाली नेमका कोण?’ हा प्रश्न आता उघडपणे उपस्थित केला जात आहे.

# भरधाव कारची दुचाकीला धडक; वडिलांचा जागीच मृत्यू

## आई व मुलगा जखमी -लोणीजवळ भीषण अपघात

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती-अकोला मार्गावरील लोणी गावाजवळ भरधाव कारने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघातात वडिलांचा जागीच मृत्यू झाला, तर आई आणि मुलगा जखमी झाले. ही घटना गुरुवारी घडली.





मृत व्यक्तीचे नाव मोहम्मद नौशाद कुरेशी (वय ४०, रा. ताजनगर, अमरावती) असे असून जखमींमध्ये त्यांची पत्नी गुलनाज अंजुम मोहम्मद नौशाद (वय ३५) आणि मुलगा मोहम्मद अबदान (वय ८) यांचा समावेश आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मोहम्मद नौशाद हे पत्नीसमवेत मुलाला आणण्यासाठी☞ **(पान २ वर)**

# दर्यापुरातील मुलीवरील चाकू हल्ल्याची घटना ठरली बनावट

### पोलिसांच्या तपासात सत्य समोर; सोशल मीडियावरील चर्चांना पूर्णविराम

**अमरावती/प्रतिनिधीः-** दर्यापुर शहरातील आनंदनगर परिसरात अल्पवयीन मुलीवर दोन अज्ञात तरुणांनी चाकूहल्ला करण्याचा प्रयत्न केल्याची घटना अखेर बनावट असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे. या घटनेची सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू होती. मात्र पोलिसांनी तातडीने तपास करत संपूर्ण प्रकरणाची सत्यता उघडकीस आणली. २० मे रोजी दुपारी एका अल्पवयीन मुलीने दर्यापुर पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली होती. दोन अज्ञात युवक मोटारसायकलवर आले आणि त्यांनी चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचा दावा करण्यात आला होता. या घटनेनंतर सोशल मीडियावर विविध बातम्या आणि अफवा वेगाने पसरू लागल्या. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत सतीश कुलकर्णी आणि पोलीस निरीक्षक सुनिल वानखडे यांनी तातडीने दोन स्वतंत्र पथके तयार करून तपास सुरू केला. तपासादरम्यान महिला पोलीस अधिकारी नम्रता राठोड यांनी मुलगी व तिच्या आईची विश्वासात घेऊन चौकशी केली. सुरुवातीला मुलीने हल्ल्याची घटना खरी असल्याचे सांगितले. मात्र पोलिसांना संशय आल्याने संबंधित परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. ☞ **(पान २ वर)**

# स्थानिक प्राधिकारी मतदारसंघात ४५३ मतदार, ७ मतदान केंद्र

### विभागांनी समन्वयाने काम करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी सोमवार, दि. २५ मे रोजी अधिसुचना प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर १ जूनपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहे. या निवडणुकीसाठी जिल्ह्यात ४५३ मतदार असून उपविभागीय अधिकारी स्तरावर मतदान केंद्र राहणार आहे, निवडणुकीसाठी अल्प कालावधी असल्याने सर्व विभागांनी समन्वाने कार्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.



स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या निवडणूक निमित्ताने जिल्हाधिकारी येरेकर यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे निवडणुकीशी संबंधित विभाग प्रमुखांची बैठक घेतली. बैठकीसाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंदा दानेज, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, उपजिल्हाधिकारी दुर्गा देवरे आणि उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी सांगीतले, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीसाठी लागणारी आचारसंहिता जशीच्या तशी लागू करण्यात आली आहे. याची नोंद निवडणुकीशी संबंधितांनी घ्यावी. मतदान प्रक्रिया सुलभ होण्यासाठी उपविभागीय☞ **(पान २ वर)**

# पोस्टमार्टमसाठी डॉक्टर नसल्याने इर्विनमध्ये कुटुंबियांचा आक्रोश

### -जिल्हा शल्य चिकित्सकांच्या मध्यस्थीनंतर शवविच्छेदन

**अमरावती/प्रतिनिधीः-** नेहमी वादात असणारे जिल्हा सामान्य रुग्णालय गुरुवारी एकदा पुन्हा चर्चेत आले. जेव्हा आत्महत्या करणाऱ्या मुलाच्या पोस्टमार्टमसाठी कुटुंबीयांना तासंतास तात्कळत बसावे लागले.तरीही डॉक्टर न आल्याने कुटुंबीय संतापले आणि त्यांनी आक्रोश व्यक्त केला. यानंतर जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या मध्यस्थितीने पोस्टमार्टम झाले. या घटनेमुळे शासकीय कार्यप्रणालीवार पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



माहितीनुसार चपरासीपुरा येथील वीरेंद्र प्रल्हाद गवळी याने बुधवारी आपल्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली होती. घटनेची ☞ **(पान २ वर)**

# रेती तस्करी : ट्रकसह ५०.७० लाखांचा मुद्देमाल जप्त

### -तिघांविरुद्ध गुन्हा दाखल
### -शिरजगाव कसबा पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** शिरजगाव कसबा पोलिसांनी अवैध रेती वाहतुकीविरोधात मोठी कारवाई करत तब्बल ५० लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत विनारॉयल्टी १० ब्रास कन्हान रेती वाहतूक करणारा ट्रक पकडण्यात आला असून तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार शिरजगाव कसबा पोलीस स्टेशनचे पथक पोलीस हद्दीत गस्त घालत असताना गुप्त माहितीच्या आधारे २० मे रोजी सायंकाळी खोमई ते पाळा रोडवर सापळा रचण्यात आला. कारवाईदरम्यान एमएच-२७-डीटी-१४४६ क्रमांकाचा टाटा सिग्ना ट्रक संशयित अवस्थेत आढळून आला. पंचांसमक्ष तपासणी केली असता ट्रकमध्ये विनारॉयल्टी १० ब्रास कन्हान रेती आढळून☞ **(पान २ वर)**

# ७ अवैध वरली मटका अड्ड्यांवर गुन्हे शाखेची धाड

### ८ आरोपींना अटक, हजारोंचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील विविध पोलीस ठाणे हद्दीत चालणाऱ्या अवैध वरली मटका अड्डूयावर गुन्हे शाखेच्या पथकाने धाड मारून ८ आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्या कडून हजारोंचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. बडनेरा पोलीस ठाणे हद्दीत वरुडा पुलाखाली सार्वजनिक ठिकाणी धाड मारून आरोपी गौतम चक्रधर चिंचखेडे (वय ४५, सारशी नांदगाव खंडेश्वर) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून १३६० रूपयाचे साहित्य जप्त करण्यात आले. त्याचा दुसरा साथीदार अमित यादव ( बडनेरा ) फरार आहे. तसेच वरुडा मध्येच दुसरी कारवाई करून राजेश गुलाबराव भालेकर (वय ४५,सारशी नांदगाव खंडेश्वर ) याला ताब्यात घेऊन मुद्देमाल जप्त करण्यात आला. फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीत शुक्रवार बाजार येथे कारवाई करून शेखर संजय गडलिंग (वय २८,राहुल नगर ) याच्याकडून १५१० रुपयाचे जुगार साहित्य☞ **(पान २ वर)**

# समाजसेवक चंद्रकुमार जाजोदिया (लप्पीभैया) यांच्या वाढदिवसानिमित्त आज अमरावतीत कौटुंबिक सोहळा

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती येथील लोकप्रिय, सर्वांसोबत मिळून-मिसळून राहणारे समाजसेवक चंद्रकुमार जाजोदिया उर्फ लप्पीभैया यांच्या वाढदिवसानिमित्त एका विशेष कौटुंबिक कार्यक्रमाचे आयोजन आज (दि.२२) करण्यात आले आहे. या सोहळ्याला शहरातील अनेक संत-महात्मा, सामाजिक कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक आणि त्यांचा मित्रपरिवार प्रामुख्याने उपस्थित राहणार आहे. हा कार्यक्रम हॉटेल हरीगंगा द लेक एटिट्यूड, छत्री तलाव, अमरावती येथे दि. २२ मे २०२६ शुक्रवारी सायंकाळी ७:०० ते रात्री ११:०० वाजेपर्यंत पार पडेल. या कार्यक्रमात उपस्थित संत-महंतांच्या हस्ते लप्पीभैया यांना



### संत-महंतांची लाभणार उपस्थिती

शुभाशीर्वाद व साधुवाद देण्यात येतील. तसेच समाजसेवा, सुसंस्कार आणि जनहित या विषयांवर प्रेरणादायी संदेशही दिले जाणार आहेत. या वाढदिवसाचे औचित्य साधून अमरावती शहरात विविध सामाजिक आणि धार्मिक उपक्रमांचेही आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजन समितीच्या वतीने देण्यात आली आहे. लप्पीभैया यांना भावी आयुष्यात अधिक जोमाने देश-सेवा आणि जन-सेवा करण्याची प्रेरणा मिळावी, यासाठी सर्व नागरिक, मित्र आणि शुभचिंतकांनी या सोहळ्याला उपस्थित राहून त्यांना आशीर्वाद द्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गहाळ ४७ मोबाईलचा शोध

### गाडगेनगर पोलिसांची कामगिरी

### ९.४० लाखांचा मुद्देमाल मालकांना परत

**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगेनगर पोलीसांनी गहाळ झालेल्या मोबाईलच्या शोध मोहिमेत उल्लेखनीय यश मिळवले असून तब्बल ९ लाख ४० हजार रुपये किमतीचे ४७ मोबाईल शोधून तक्रारदारांना परत केले आहेत. गाडगेनगर पोलीस स्टेशन येथे मोबाईल हरवल्याबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानंतर पोलिसांनी एप्रिल २०२६ दरम्यान सीईआयआर पोर्टलच्या माध्यमातून विशेष शोध मोहीम राबवली. या मोहिमेत ४७ गहाळ मोबाईलचा यशस्वी शोध घेण्यात आला.



२१ मे २०२६ रोजी आयोजित कार्यक्रमात पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपआयुक्त रमेश धुमाळ, सहायक पोलीस आयुक्त शिवाजीराव बचाटे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव तसेच पोलीस निरीक्षक समाधान वाठोरे यांच्या हस्ते संबंधित तक्रारदारांना त्यांचे मोबाईल परत करण्यात आले. हरवलेले मोबाईल सुरक्षितपणे परत मिळाल्याने नागरिकांनी समाधान ☞ **(पान २ वर)**

# सोशल मीडियावरील पोस्टवर सायबर पोलिसांची करडी नजर -पोलीस आयुक्त राकेश ओला

### -बकरी ईदपूर्वी अमरावतीत शांतता समितीची बैठक -अफवांवर विश्वास ठेवू नका

**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी २८ मे रोजी साजऱ्या होणाऱ्या बकरी ईद उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी गुरुवारी २१ मे रोजी सकाळी पोलीस आयुक्त कार्यालयात शांतता समितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी सीपी राकेश ओला हे होते.




बैठकीला मुस्लिम समाजातील मौलवी, मशिदी व ईदगाह ट्रस्टचे पदाधिकारी, कुरेशी समाजाचे प्रतिनिधी, शांतता समिती सदस्य, प्रतिष्ठित नागरिक तसेच महानगरपालिका, वीज वितरण, अन्न व औषध प्रशासन, अग्निशमन विभाग, पशुसंवर्धन विभाग, पाणीपुरवठा विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय आणि आरोग्य विभागाचे अधिकारी ☞ **(पान २ वर)**

# अमरावती परिक्षेत्रीय पोलीस विभागाची फॉरेन्सिक्स कार्यशाळा

### -वैज्ञानिक तपास पद्धतींवर भर

**अमरावती/प्रतिनिधीः-** गुन्ह्यांच्या तपासात वैज्ञानिक पद्धतींचा प्रभावी वापर वाढवून दोषसिद्धीचे प्रमाण उंचावण्यासाठी अमरावती परिक्षेत्रीय पोलीस विभागाच्या वतीने गुरुवारी २१ मे रोजी विद्याभारती महाविद्यालय येथे विशेष ‘फॉरेन्सिक्स कार्यशाळे’चे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत आधुनिक फॉरेन्सिक तंत्रज्ञान, सायबर गुन्हे तपास आणि डिजिटल पुराव्यांचे महत्त्व यावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यशाळा आयजी रामनाथ पोकळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी विजय ठाकरे, निलेश पाटील, वैषाली महाजन तसेच श्रीकांत पांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यशाळेत डीएनए विश्लेषण, सायबर फॉरेन्सिक्स, दस्तऐवज☞ **(पान २ वर)**

